हे अभ्यासपुस्तक राज्याची स्थापना करण्यासाठी (भाग एक) सेवकांस तयार करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या सात संदेशांचा संग्रह होय.

राज्याची स्थापना करणे, लोकांची प्रगती, सहकार्य, व एकजूट होऊन काम करण्याबाबत आहे. प्रत्येकाचे काम जसेही असेल, ते सारखेच महत्वाचे आहे. परमेश्वराच्या राज्यात प्रत्येक जण सारखाच महत्वाचा आहे. राज्याची स्थापना अथवा उभारणी ख्रिस्तासंबंधाने आहे, जो पाया – आरंभबिंदु होय. परमेश्वर एका व्यक्तीचा उपयोग बी पेरण्यासाठी, दुसऱ्याचा पाणी देण्यासाठी, व तिसऱ्या व्यक्तीचा उपयोग कापणी करण्यासाठी करतो. परमेश्वर एका व्यक्तीचा उपयोग पाया घालण्यासाठी, दुसऱ्याचा उपयोग त्याच्यावर उभारणी करण्यासाठी करतो, व आणखी दुसऱ्या व्यक्तीचा उपयोग ते निर्माणकार्य पुढे वाढविण्यासाठी करतो.

राज्याची स्थापना करीत असतांना आम्हास हे लक्षात ठेवावयाचे आहे की सर्व काही त्याच्याचपासून, त्याच्याचद्वारे व त्याच्याप्रीत्यर्थ आहे. सर्व गोष्टींत तो श्रेष्ठ आहे, प्रथम स्थानी आहे. जे काही आम्ही करतो, त्यात जर परमेश्वर सर्वश्रेष्ठ नसेल, तर जे कार्य आम्ही करीत आहोत, त्याला ख्रिस्ताच्या राज्याची स्थापना करणे म्हणता येणार नाही. जर आम्ही सर्व सेवक राज्याची उभारणी, स्थापना करणारे म्हणून परिश्रम करू, तर ख्रिस्ताची मंडळी खरोखर भिन्न होईल. राज्याची स्थापना करणारे बना!

आशीष रायचूर

राज्याची स्थापना करणारे

आशीष रायचूर




# राज्याची स्थापना करणारे

आशीष रायचूर

मुद्रण और वितरणः **ऑल पीपल्स चर्च एवं विश्व सुसमाचार सम्पर्क, बंगलौर**
प्रथम संस्करण मार्च 2012

प्रबन्ध सम्पादक/मुख्य प्रकाशक : वैलेन्टीना हूबर्ट
अनुवाद एवं प्रूफरीडिंग : डॉर्थी शरदकान्त वाघमारे
मुख पृष्ठ एवं ग्राफिक्स डिज़ाइन : करुणा जयरोम, बाईफेथ डिज़ाइन्स

**Contact Information:**
All Peoples Church & World Outreach
2nd Floor, No. 7M, 2nd Block,
HRBR Layout, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-65970617
Email: contact@apcwo.org
Website: www.apcwo.org

Unless otherwise indicated, all Scripture quotations are taken from the Holy Bible, New King James Version.

विनामूल्य वाटपासाठी
ह्या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहकारी व मित्रांच्या आर्थिक मदतीद्वारे शक्य झालेले आहे.

(Marathi book - Kingdom Builders)

राज्याची स्थापना

# राज्याची स्थापना करणारे

# विषय सूची


| | | |
|---|---|---|
| **प्रस्तावना** | | **01** |
| **1.** | **ख्रिस्त – राज्याचा राजा** | **05** |
| 1.1 | परिचय | 05 |
| 1.2 | त्याच्याबरोबर आमचे नाते फार महत्वाचे आहे | 06 |
| 1.3 | राज्य माझे नाही, आपले ही नाही, परंतु त्याचे आहे | 07 |
| 1.4 | आम्हास केवळ देवाचे गौरव पहावयाचे आहे | 08 |
| 1.5 | पृथ्वीवर आमचा जो अधिकार आहे, तो राजाप्रत अधीनतेवर अवलंबून आहे | 12 |
| 1.6 | आम्ही मनुष्याचा अभिमान बाळगता कामा नये | 12 |
| 1.7 | आम्ही प्रभुस जाब देणार आहोत जो सर्व गोष्टींची पारख करतो | 13 |
| 1.8 | राज्याची स्थापना करणाऱ्यांचे अंतःकरण | 15 |
| 2. | संचालक पवित्र आत्मा | 19 |
| 2.1 | जे परमेश्वर पित्याची इच्छा पूर्ण करतात, ते सार्वकालिक जीवनात आशीर्वाद पावतील | 19 |
| 2.2 | पृथ्वीवर पित्याची इच्छा काय आहे ते पवित्र आत्मा आम्हावर प्रकट करतो | 20 |
| 2.3 | देहापासून जन्मलेले देह आहे आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहे | 21 |
| 2.4 | पवित्र आत्मा प्रकट करतो ‘कोठे’, ‘केव्हा’ आणि ‘कसे | 24 |

2.5 आत्म्याची प्रेरणा अनेकप्रकारे होते 26

2.6 पवित्र आत्म्याशी एक अखंड संवाद स्थापित करण्याची गरज आहे 27

2.7 आत्म्याची वेळ ओळखणे 27

2.8 आत्म्यात प्रार्थना करणे महत्वाचे आहे 27

2.8.1 आत्म्यात प्रार्थना करण्याद्वारे माझा आत्मा परमेश्वराचे हेतू समजण्यास तयार होता 27

2.8.2 आत्माने प्रार्थना केल्याने माझी इच्छा परमेश्वराच्या इच्छेनुसार होते 28

2.9 आत्म्याच्या कार्यांस जन्म देणे – 'मरियेच्या जीवनात घडलेल्या' चमत्कारातून काही पाठ. 30

2.9.1 पृथ्वीवर योग्य समयी मुक्त केला गेला. 30

2.9.2 सामान्य लोकांद्वारे मुक्त केले गेले. 30

2.9.3 शुद्ध असले पाहिजे – केवळ त्याच्या आत्म्याने जन्मलेले 31

2.9.4 लज्जेचे कारण ठरू शकते 31

2.9.5 सामान्य स्वाभाविक प्रक्रियांद्वारे मुक्त 31

2.9.6 परमेश्वराच्या नेमलेल्या वेळेपर्यंत जाऊन पोहोचेपर्यंत बंद दारे मिळू शकतात 32

2.9.7 त्याचे रक्षण व पोषण होणे अगत्याचे आहे 32

3. परमेश्वराद्वारे देण्यात आलेल्या दृष्टांताचे स्वरूप 37

3.1 परमेश्वराद्वारे देण्यात आलेला दृष्टांत एक ईश्वरीय आदेश व अधिकारप्राप्ती आहे 38

3.2 परमेश्वराद्वारे देण्यात आलेल्या दृष्टांताची सुरूवात करण्याची व तो कार्यान्वित करण्याची एक नेमलेली वेळ असते 40

| | | |
|---|---|---|
| 3.3 | परमेश्वराद्वारे देण्यात आलेला दृष्टांत आमच्या अंतःकरणातील थोड्याशा हालचालीने ओळखता येतो | 45 |
| 3.4 | जेव्हा आम्ही प्रयत्न करतो, तेव्हा आमच्या कैरोस श्ङ्मंपतवेश क्षणात विलंब होतो | 46 |
| 3.5 | परमेश्वराद्वारे दिलेला दृष्टांत प्रत्येकास समजावा हे जरूरी नाही | 47 |
| 3.6 | परमेश्वराद्वारे दिल्या गेलेल्या दृष्टांताचा दुरात्मे विरोध करतील | 47 |
| 3.7 | परमेश्वराद्वारे देण्यात आलेला दृष्टांत नेहमी व्यक्तीपेक्षा मोठा असतो | 48 |
| 3.8 | इतर लोक परमेश्वराद्वारे देण्यात आलेल्या दृष्टांतात सहभागी होऊन आपल्या जीवनाचे पाचारण शोधून काढतात व ते पूर्ण करतात | 49 |
| 3.9 | ख्रिस्ताच्या देहास देण्यात आलेली स्वप्ने व दृष्टांत परस्पर निगडीत असतात | 49 |
| 3.10 | परमेश्वरास विनंती करावी की त्याने आपणास एक विशाल हृदय द्यावे | 50 |
| **4.** | **आत्म्याच्या मदतीने लोकांची उभारणी** | 53 |
| 4.1 | राज्याची स्थापना लोकांच्या उभारणी (प्रगती) करण्याशी संबंधित आहे | 53 |
| 4.2 | राज्याची स्थापना करणाऱ्यांच्या अंतःकरणात लोक असले पाहिजेत | 53 |
| 4.3 | आम्ही आत्म्याच्या मदतीने लोकांची उभारणी (प्रगती) करतो | 54 |
| 4.4 | परमेश्वर अपरिपक्व लोकांस परिपूर्ण बनविण्यासाठी अपरिपूर्ण लोकांचा उपयोग करतो | 55 |

| | | |
|---|---|---|
| 4.5 | आत्म्याच्या मदतीने लोकांची उभारणी करण्याची किल्ली | 55 |
| 4.5.1 | व्यक्तीप्रीत्यर्थ परमेश्वराचा हेतू ओळखणें | 55 |
| 4.5.2 | दैवी क्षमता मुक्त करण्यासाठी लोकांस स्थिर करणे | 57 |
| 4.5.3 | त्यांची कृपादाने ओळखणे व त्यांस उत्तेजन देणे | 58 |
| 4.5.4 | आपल्या उदाहरणाद्वारे मार्गदर्शन करणे | 59 |
| 4.5.5 | असुरक्षिततेच्या भावनेपासून दूर राहा | 60 |
| 4.5.6 | गरज भासल्यास ताडन करा (सुधारणा) | 64 |
| 4.5.7 | सर्व बाबतीत परिपक्वता घडवून आणा | 72 |
| 4.5.8 | त्यांस त्यांच्या पाचारणात कार्य करण्यासाठी मोकळे करा | 74 |
| 4.5.9 | त्यांची मदत करणारे बना | 75 |
| 4.5.10 | जे पडतात, त्यांना पुन्हा स्थिर करा | 75 |
| 4.5.11 | पडलेल्यांस सांभाळणे | 76 |
| 5. | राज्याच्या स्थापना करणाऱ्यांची जीवनशैली | 81 |
| 5.1 | आमचे ध्येय ख्रिस्ताची समानता | 81 |
| 5.2 | चारित्र्य महत्वाचे आहे | 81 |
| 5.2.1 | चारित्र्य काय आहे? | 81 |
| 5.2.2 | चारित्र्याचा विकास कसा घडून येतो? | 83 |
| 5.2.3 | चारित्र्य महत्वाचे का आहे? | 84 |
| 5.3 | आत्मिकतेऐवजी आध्यात्मिक पूर्णतेकडे लक्ष द्या | 87 |
| 5.3.1 | आध्यात्मिक परिपूर्णतेची सात वैशिष्ट्ये | 89 |

| | | |
|---|---|---|
| 5.4 | आम्ही कारभारी आहोत | 93 |
| 5.4.1 | परमेश्वराचा कारभारी होण्याचा अर्थ काय? | 94 |
| 5.4.2 | परमेश्वराचा दास या नात्याने, मी कोणत्या गोष्टींचा कारभारी आहे? | 95 |
| 5.4.3 | उत्तम कारभाऱ्याची वैशिष्ट्ये | 96 |
| 6. | सहकार्य – राज्यात सहकारी बनावयास शिकणे | 101 |
| 6.1 | आपसात फूट पडलेले राज्य दुर्बळ व कमकुवत असते | 101 |
| 6.2 | आम्हास आत्म्यात ऐक्य राखावयास पाचारण करण्यात आलेले आहे | 101 |
| 6.3 | राज्याची मनोवृत्ती असणारे बनणे | 102 |
| 6.4 | आम्हास एकमेकांशी जुळून राहणे व एकमेकांसोबत काम करणे शिकावयाचे आहे | 103 |
| 6.4.1 | भागीदारी अथवा सहकार्य करण्याप्रीत्यर्थ रचण्यात आलेले | 103 |
| 6.4.2 | पौलाचे सहकारी | 105 |
| 6.5 | आम्ही इतरांस दोष देता कामा नये | 107 |
| 6.6 | प्रत्येकास वेगवेगळी कृपादाने लाभलेली आहेत | 108 |
| 6.7 | लहानसहान बाबींकडे लक्ष देता कामा नये | 109 |
| 6.8 | राज्यात सहकार्य अथवा भागिदारीचे मोल | 109 |
| 6.8.1 | व्यवहारिकदृष्ट्या सहकार्य म्हणजे ऐक्य | 109 |
| 6.8.2 | सहकार्याद्वारे बल प्राप्त होते | 110 |
| 6.8.3 | सहकार्याद्वारे देवाच्या राज्याची वाढ होते | 110 |
| 6.9 | राज्याच्या सहकार्यात अडखळण आणणाऱ्या गोष्टी | 110 |
| 6.9.1 | ‘मी व माझे’ ही प्रवृत्ती | 110 |

| | | |
|---|---|---|
| 6.9.2 | ‘यात माझ्यासाठी काय आहे?’ ही प्रवृत्ती | 110 |
| 6.9.3 | तुलना व प्रतिस्पर्धा करणे | 110 |
| 6.9.4 | जाणूनबुजून किंवा नकळत फूट पाडण्याचा प्रयत्न करणे | 110 |
| 7. | राज्याच्या सेवेसाठी पुढील पिढीस तयार करणे | 113 |
| 7.1 | दैवी संबंध | 115 |
| 7.2 | विशेष नाते | 116 |
| 7.3 | विशेष समीपता व पारदर्शित्व | 117 |
| 7.4 | विशिष्ट आज्ञांची देवाणघेवाण | 118 |
| 7.5 | प्रोत्साहन, उपदेश व सुधारणा यांची देवाणघेवाण | 118 |
| 7.6 | खऱ्या किंमतीची देवाणघेवाण | 119 |
| 7.7 | आदरयुक्त संभाषण | 119 |
| 7.8 | प्रतिनिधित्व | 120 |
| 7.9 | सकारात्मक अनुमोदन | 121 |
| 7.10 | त्याच्या पाचारणात मुक्त केलेले | 121 |

# प्रस्तावना

सप्टेंबर 2005 रोजी, ग्लोबल सॅल्वेशन मिनिस्ट्रीजच्या सुधीर किरबी यांनी कर्नाटक, भारतच्या बेलगांव येथे पाळक व ख्रिस्ती पुढाऱ्यांच्या तीन दिवसांच्या महासभेचे आयोजन केले. देवाने त्यांच्या अंतःकरणात ह्या कॉन्फ्रन्सचा विषय दिला होता 'राज्याची स्थापना करणारे' (किंग्डम बिल्डर्स).

जेव्हा मी किंग्डम बिल्डर्स कॉफ्रन्समध्ये संदेश देण्याची तयारी करीत होतो, तेव्हा आम्हा सुवार्तेच्या सेवकांची राज्याची स्थापना करणारे बनविण्यात मदत करणारे सत्य व अंतर्दृष्टी मांडणारे अनेक संदेश माझ्या आत्म्यात तयार झाले. जेव्हा शिकवण देण्यात आली, आणि आम्ही सेवा करू लागलो, तेव्हा आम्हास या सत्यांचे व त्यांच्या व्यवहारिक अर्थाचे महत्त्व कळून आले. आम्हास असे वाटू लागले की प्रभू असे काही जन्मास घालत आहे जे पाळकांस व विश्वासणाऱ्यांस समान रूपात कळविण्याची गरज आहे. किंग्डम बिल्डर्स कॉफ्रन्स देशाच्या इतर भागातही आयोजित करण्यात आलेली आहे.

अभ्यास पुस्तिका (भाग 1) सात संदेशांचा संग्रह आहे ज्याचा हेतू ख्रिस्ताच्या सेवकांस राज्याची स्थापना करणारे बनण्यात मदत करणे हा आहे.

जर आपण सर्व राज्याची स्थापना करणारे बनलो, तर ख्रिस्ताच्या मंडळीत बदल घडून येईल.

राज्याची स्थापना करणारे बना!

आशीष रायचूर




# राज्याची स्थापना करणारे

# 1
# ख्रिस्त – राज्याचा राजा

## 1.1 परिचय

1 करिंथ. 3:6, 9–11

**6 मी लाविले, अपुल्लोसाने पाणी घातले, पण देव वाढवीत गेला. 9 कारण
आम्ही देवाचे सहकारी आहो; तुम्ही देवाचे शेत, देवाची इमारत असे
आहा. 10 माझ्यावर झालेल्या देवाच्या अनुग्रहाच्या मानाने मी कुशल
कारागिराच्या पद्धतीप्रमाणे पाया घातला; आणि दुसरा त्यावर इमारत बांध
ीत आहे तर त्यावरचे बांधकाम आपण कसे करीत आहो ह्याविषयी
प्रत्येकाने जपावे. 11 येशू ख्रिस्त हा जो घातलेला पाया, त्याच्यावांचून
दुसरा पाया कोणाला घालता येत नाही.**

येथे काही महत्वाच्या गोष्टींकडे लक्ष देऊ या :

- राज्याची स्थापना करणे लोकांची प्रगती करण्यासारखे आहे, आपण "देवाची इमारत असे आहा" (वचन 9).
- राज्याची स्थापना करण्याचा संबंध सहकार्याशी आहे, एकत्र मिळून काम करण्याशी आहे (वचन 6,9,10).
- परमेश्वर एका व्यक्तीचा उपयोग बी पेरण्यासाठी, दुसऱ्याचा पाणी देण्यासाठी, व तिसऱ्या व्यक्तीचा उपयोग कापणी करण्यासाठी करतो. परमेश्वर एका व्यक्तीचा उपयोग पाया घालण्यासाठी, दुसऱ्याचा उपयोग त्याच्यावर उभारणी करण्यासाठी करतो, व आणखी दुसऱ्या व्यक्तीचा उपयोग ते निर्माणकार्य पुढे वाढविण्यासाठी करतो. काम कोणतेही का असेना, प्रत्येक कार्य सारखेच महत्वाचे आहे. प्रत्येक व्यक्ती सारखीच महत्वपूर्ण आहे.
- राज्याच्या स्थापनेचा संबंध ख्रिस्ताशी आहे (वचन 11). ख्रिस्त पाया किंवा आरंभबिन्दु आहे.

## 1.2 त्याच्याबरोबर आमचे नाते फार महत्वाचे आहे

1 करिंथ. 3:11

**11 येशू ख्रिस्त हा जो घातलेला पाया, त्याच्यावांचून दुसरा पाया कोणाला घालता येत नाही.**

राज्याची स्थापना करीत असतांना आम्ही ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ख्रिस्त हा पाया आहे, प्रमुख व शिरोमणी आहे.

राज्याची स्थापना करण्यासाठी राजाबरोबर आमचे नाते अत्यंत महत्वाचे ठरते. सर्व काही त्याच्यापासून सुरू होते.

आमच्यापैकी अनेक सेवक 'डिनॉमिनेशन,' 'पाळकांचे नेटवर्क,' 'आध्यात्मिक आच्छादन' (कवरिंग), 'पाळकसंघ,' किंवा 'सेवकांचे सहभागित्व' इत्यादी गोष्टींत गुंतलेले आहेत, आणि त्यापेक्षा कितीतरी अधिक महत्वपूर्ण बाबींकडे आम्ही दुर्लक्ष केले आहे – म्हणजे राजाबरोबर आमच्या वैय्यक्तिक नात्याची गंभीरता.

'डिनॉमिनेशन,' 'पाळकांचे नेटवर्क,' 'आध्यात्मिक आच्छादन' (कवरिंग), 'पाळकसंघ,' किंवा 'सेवकांचे सहभागित्व' या गोष्टी राजाबरोबर आमच्या वैय्यक्तिक नात्याचे स्थान घेऊ शकत नाही.

आमच्या सोबतच्या सेवकांशी सुदृढ नाते ठेवणे महत्वाचे आहे, पण राज्याचा संस्थापक बनण्याची पात्रता आम्हास देणारी महत्वाची गोष्ट म्हणजे राजाबरोबर आमचे नाते.

कलस्सै. 1:16–18

**16 कारण आकांशात व पृथ्वीवर असलेले, दृश्य व अदृश्य असलेले, राजे अधिपति, सत्ताधिश किंवा अधिकारी असलेले, जे काही आहे ते सर्व त्याच्यामध्ये निर्माण झाले; सर्व काही त्याच्याद्वारे व त्याच्यासाठी निर्माण झाले आहे; 17 तो सर्वांच्या पूर्वीचा आहे व त्याच्यामध्ये सर्व काही अस्तित्वांत आहे. 18 तो शरीरांचे म्हणजे मंडळीचे मस्तक आहे; तो आदि,**

**मृतांतून प्रथम जन्मलेला आहे; अशासाठी की, सर्वांमध्ये त्याला प्राधान्य मिळावे.**

राज्याची स्थापना करीत असतांना आम्हास हे लक्षात ठेविले पाहिजे की सर्व काही त्याच्याचपासून, त्याच्याचद्वारे व त्याच्याप्रीत्यर्थ आहे. सर्व बाबतींत त्याला वर्चस्व, प्रथम स्थान लाभावयास हवे.

जे काही आम्ही करतो, त्यात जर परमेश्वर सर्वश्रेष्ठ नसेल, तर जे कार्य आम्ही करीत आहोत, त्याला ख्रिस्ताच्या राज्याची स्थापना करणे म्हणता येणार नाही.

जर माझ्या संदेशाच्या शेवटी लोक परमेश्वर व त्याच्या वचनापेक्षा माझ्या बाबतीत जास्त उत्तेजित होत असतील, तर माझ्या प्रचाराद्वारे खरोखर राज्याच्या स्थापनेस मदत मिळालेली नाही. मी राज्याची उभारणी अथवा स्थापना करणारा या नात्याने सेवा केलेली नाही.

## 1.3 राज्य माझे नाही, आपलेही नाही, परंतु त्याचे आहे

मत्तय 6:10

**10 तुझे राज्य येवो. जसे स्वर्गांत तसे पृथ्वीवरहि तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.**

हे राज्य त्याचे आहे. हे 'माझी सेवा,' 'माझी मंडळी,' 'तुमची सेवा,' किंवा 'तुमची मंडळी' याविषयी नाही. जे काही आमच्याजवळ आहे आणि जे काही आम्ही करतो, त्याचे आहे! आम्ही सर्व एकजूट होऊन त्याच्या राज्याची स्थापना करीत आहोत.

आमची इच्छा त्याचे राज्य येतांना पाहणे ही असली पाहिजे. आमच्यापैकी अनेक जण 'माझी सेवा यावी' या गोष्टीकडे अधिक लक्ष देत आहेत आणि ही योग्य प्रवृत्ती नाही!

परमेश्वर येथे पृथ्वीवर जे कार्य पूर्ण होतांना पाहू इच्छितो, ते कार्य करण्यासाठी आम्ही येथे आहोत. स्वर्गात परमेश्वर आपली इच्छा व्यक्त करतो. ती पूर्ण करण्यासाठी तो पृथ्वीवरील लोकांची आशा धरतो.

## 1.4 आम्हास केवळ परमेश्वराचे गौरव पाहावयाचे आहे

मत्तय 6:13 ब

**13 कारण की राज्य, सामर्थ्य आणि गौरव, ही सर्वकाळ तुझी आहेत; आमेन.**

सर्व गौरव केवळ परमेश्वराचे आहे.

राज्याची स्थापना करणारे म्हणून आमचा हेतू स्पष्ट आहे, केवळ परमेश्वराचा गौरव करणे. आम्ही गौरवाची इच्छा बाळगता कामा नये – गौरवाचा थोडासा भागही आम्ही स्वतःसाठी इच्छिता कामा नये.

योहान 7:18

**18 जो आपल्या मनचे बोलतो, तो स्वतःचेंच गौरव पाहतो; परंतु आपणाला ज्याने पाठविले त्याचे गौरव जो पाहतो तो खरा आहे व त्याच्यामध्ये अनीति नाही.**

जेव्हा आम्ही खऱ्या अंतःकरणाने केवळ परमेश्वरास गौरव देण्याचा प्रयत्न करू, तेव्हा आमची अंतःकरणे शुद्ध होतील आणि आमच्यात कोणत्याही प्रकारची अनीति आढळून येणार नाही.

बहुधा आमच्या अंतःकरणात मिश्रित भावना असतात, त्यांत परमेश्वरास जास्तीत जास्त गौरव देण्याची इच्छा असते, पण त्या गौरवाचा काही भाग आम्हास स्वतःसाठी हवा असतो. आम्ही येथून निघून अशा ठिकाणी पुढे वाढू लागतो जेथे आम्ही सर्व गौरव प्रभुला देऊ.

यशया 42:8

**8 मी परमेश्वर आहे, हे माझे नाम आहे, मी आपले गौरव दुसऱ्यास देऊ देणार नाही, मी आपले प्रशंसा मूर्तीस प्राप्त होऊ देणार नाही.**

परमेश्वर ईर्ष्यावान आहे, तो आपले गौरव दुसऱ्यास देऊ देत नाही (निर्गम 20:5; 34:14). मग आम्ही सेवकांनी इतरांचे लक्ष स्वतःकडे ओढून घेण्यास मागे पुढे का पाहू नये, जणू आमच्या सामर्थ्याने, आमच्या प्रार्थनेमुळे किंवा आमच्या गुणकौशल्यांमुळे, हे चमत्कार घडून आले आहेत? आमचे शब्द, आमच्या चतुर जाहिराती, आमचे हावभाव, आमचे सेवेचे रिपोर्ट आणि आमची साक्ष ह्या सर्वांचा हेतू लोकांची दृष्टी स्वतःकडे आकर्षित करणे असतो.

जर लोक क्षणभर दुसरीकडे पाहू लागतात, तर आम्ही घाबरून जातो! पेत्र व योहान यांच्यात ही भावना नव्हती, जेव्हा पांगळा इसम बरा झाला, तेव्हा त्यांनी गर्दीस म्हटले,"अहो इस्त्राएल लोकांनो, ह्याचे आश्चर्य का करिता? अथवा आम्ही आपल्या सामर्थ्याने किंवा सुभक्तीने ह्याला चालावयास लाविले आहे असे समजून आम्हाकडे निरखून का पाहता?" (प्रेषितांचे कृत्ये 3:12). मग त्यांनी जिवंत परमेश्वराकडे आणि त्याच्या पुत्र प्रभु येशूकडे अंगुलीनिर्देश केला.

योहान 5:41

**41 मी मनुष्यांकडून प्रशंसा करून घेत नाही.**

आम्हास परमेश्वरासमक्ष अशा ठिकाणी यावयाचे आहे जेथे आम्ही मनुष्यांकडून सन्मान प्राप्त करण्याची इच्छा धरणार नाही. आमच्या अंतःकरणात मनुष्याची स्तुती प्राप्त करण्याची मुळीच इच्छा नसेल. राज्याची स्थापना करणारा खरा व्यक्ती हाच आहे.

योहान 6:54 अ

**54जो माझा देह खातो व माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे.**

स्वतः मिळविलेला सन्मान खरा सन्मान नव्हे, आणि त्याचे काही मोल नाही.

योहान 5:44

**44 जे तुम्ही एकमेकांकडून प्रशंसा करून घेता आणि जो एकच देव त्याच्याकडून प्रशंसा करून घेण्याची खटपट करीत नाही, त्या तुम्हाला विश्वास ठेविता येणे कसे शक्य आहे?**

परमेश्वराच्या राज्याची स्थापना करणारे म्हणून, आम्हास अशा ठिकाणी येण्याची गरज आहे जेथे आम्ही मनुष्यांतर्फे सन्मान मिळविण्याची इच्छा धरणार नाही, पण केवळ परमेश्वराकडून सन्मान मिळविण्याची इच्छा बाळगू.

जेव्हा आम्ही केवळ स्वर्गाकडून प्रशंसा मिळविण्यासाठी जगत असतो, मनुष्याकडून मिळणाऱ्या बक्षिसाची अभिलाषा करीत नाही, तेव्हा आम्ही खरोखर परमेश्वराचा गौरव करू पाहतो. परूशी व पाखंडी लोक मनुष्यापुढे बडेजाव मिरविण्याचा प्रयत्न करतात, आणि बक्षिस म्हणून मनुष्यांची प्रशंसा प्राप्त करतात. येशूने अशा हेतूविरुद्ध इशारा दिला आहे, आणि आम्हास आज्ञा दिली आहे की आम्ही आपली कामे परमेश्वरास दाखविण्यासाठी करावी आणि स्वर्गाकडून प्रतिफळ प्राप्त करण्याची इच्छा बाळगावी (मत्तय 6:1—6; 23:5).

योहान 12:42—43

**42 असे असूनहि अधिकाऱ्यांतून देखील पुष्कळ जणांनी त्याच्यावर विश्वास ठेविला, परंतु आपण सभाबहिष्कृत होऊ नये म्हणून परूश्यांमुळे ते तसे कबूल करीत नव्हते; 43 कारण त्यांना देवाकडील गौरवापेक्षा मानवाकडील गौरव अधिक प्रिय वाटले.**

मनुष्य आणि परमेश्वराची स्तुती आणि प्रशंसा याबाबत आमचे अंतःकरण कोठे आहे या गोष्टीची खरी ओळख यात आहे की आम्ही अशा परिस्थितीत काय करण्याची निवड करतो जेथे मनुष्यांची मान्यता हरवून बसण्याचा धोका असतो आणि त्याऐवजी तिरस्कारास तोंड द्यावे लागते. काय तरीही आम्ही अशा परिस्थितीत 'मनुष्यांच्या प्रशंसेऐवजी परमेश्वराकडून प्रशंसा' मिळविण्याचा प्रयत्न कराल?

गलती. 1:10

**[10]मी अजूनपर्यंत मनुष्यांना संतुष्ट करीत राहिलो असतो तर मी ख्रिस्ताचा दास नसतो.**

जर आपण मनुष्यांकडून प्रशंसा मिळविण्याचा प्रयत्न करणारे असाल, तर आपण परमेश्वराचे सेवक बनू शकत नाही.

1 थेस्सल. 2:4—6अ

**[4] तर सुवार्ता आमच्यावर सोपवून देण्यास देवाने आम्हाला पारखून पसंत केल्यामुळे आम्ही ती सांगतो; आम्ही माणसांना खुश करण्यासारखे न बोलता आमची 'अंतःकरणे पारखणारा' देव हा ज्यामुळे खुश होईल असे बोलतो. [5] कारण आम्ही आर्जवाचे भाषण कधी करीत नव्हतो, हे तुम्हास माहीत आहे; तसेच लोभाने कपटवेष धारण करीत नव्हतो, देव साक्षी आहे; [6] आम्ही ख्रिस्ताचे प्रेषित असल्यामुळे जरी आमचे वजन पडण्यासारखे होते तरी माणसांपासून म्हणजे तुम्हांपासून किंवा दुसऱ्यापासून गौरव मिळविण्याची खटपट आम्ही करीत नव्हतो.**

जेव्हा आपण सुवार्ता सांगतो/शिकवितो/सेवा करतो, तेव्हा आमचा हेतू फक्त परमेश्वरास प्रसन्न करणे हा असला पाहिजे, मनुष्यांस नव्हे. जे काही आम्ही करतो, ते जर आम्ही मनुष्यास गौरव मिळावा अशा पद्धतीने करतो, तर आमच्या अंतःकरणाचा हेतू शुद्ध नाही.

स्तोत्र. 115:1

**[1] हे परमेश्वरा आमचे नको, आमचे नको, तर आपल्या नावाचे गौरव कर, कारण तू दयाळू व सत्य आहेस.**

आम्ही ही प्रार्थना नेहमी करू शकतो. ती आमच्या अंतःकरणास शुद्ध राखील व आम्हास योग्य दिशेत राखून ठेविल.

## 1.5 पृथ्वीवर आमचा जो अधिकार आहे तो राजाप्रत आमच्या अधीनतेवर अवलंबून आहे

पृथ्वीवर आमचा अधिकार केवळ त्या क्षेत्रापर्यंत प्रभावी राहील जेथवर आम्ही आपल्या राजाच्या अधीनतेत राहू.

याकोब 4:7

**7 ह्यास्तव देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुम्हांपासून पळून जाईल.**

एदेन बागेत दोन झाडे होती. एका झाडाचे फळ खाऊन मनुष्यास दीर्घायुष्य लाभले. दुसऱ्या झाडाचे फळ न खाल्याने मनुष्यास पृथ्वीवर वर्चस्व गाजविण्याचे सामर्थ्य मिळाले. ज्या दिवशी त्याने त्या झाडाचे फळ खाल्ले जे त्याला खावयास नको होते, त्या दिवशी तो आपले प्रभुत्व गमावून बसला.

देवाप्रत आमचा आज्ञाधारकपणा आणि अधीनता राज्याच्या अधिकाराची किल्ली आहे.

## 1.6 आम्ही मनुष्याचा अभिमान बाळगता कामा नये

1 करिंथ. 3:21

21 ह्यास्तव माणसाविषयी कोणी अभिमान बाळगू नये, कारण सर्व काही तुमचे आहे.

1 करिंथ. 4:6

**6 बंधुजनहो, मी तुमच्याकरिता ह्या गोष्टी अलंकारिक रीतीने स्वतःला व अपुल्लोसाला लागू केल्या आहेत; ह्यासाठी की, शास्त्रलेखापलीकडे कोणी जाऊ नये हा धडा तुम्ही आम्हापासून शिकावा, म्हणजे तुम्हापैकी कोणीहि एकासाठी दुसऱ्यावर फुगणार नाही.**

आम्हास ख्रिस्ती पुढाऱ्यांचा मान व आदर राखला पाहिजे, परंतु त्याचवेळी आम्हास सावध असले पाहिजे की आम्ही एकाच्या बाजूने व दुसऱ्याच्या विरोधात अहंकार बाळगता कामा नये.

जेव्हा आम्ही मनुष्यास त्याच्या योग्य जागेपेक्षा अधिक उंच स्थान देतो, तेव्हा आम्ही देवाच्या राज्यात विभाजन व फूट पाडतो. तेव्हा आम्ही राज्याची स्थापना करणारे ठरणार नाही, पण राज्यात फूट पाडणारे बनतो.

हा विचार करून जेव्हा आपण स्वतःविषयी अभिमान बाळगता की सर्व काही आपल्यामुळे आहे किंवा जे काही आपण करीत आहात त्यामुळे घडत आहे, तर आपण मनुष्याचा अभिमान बाळगत आहात.

हा विचार करून जेव्हा आपण स्वतःविषयी अभिमान बाळगता की आपण इतरांपेक्षा अधिक आध्यात्मिक आहात, देवाप्रत अधिक संवेदनशील आहात, अधिक प्रार्थनाशील व अधिक अभिषिक्त आहात, तेव्हा आपण मनुष्याबाबत अभिमान बाळगत आहात.

## 1.7 आम्ही प्रभुस जाब देणार आहोत जो सर्व गोष्टींची पारख करतो

1 करिंथ. 4:3–5

**3 तरी तुमच्याकडून किंवा मानवी न्यायाधीशाकडून माझा न्यायनिवाडा व्हावा, ह्याचे मला काहीच वाटत नाही, मी स्वतःचा देखील न्यायनिवाडा करीत नाही; 4 कारण जरी माझे मन माझ्याविरूद्ध मला साक्ष देत नाही, तरी तेवढ्यावरून मी निर्दोष ठरतो असे नाही; माझा न्यायनिवाडा करणारा प्रभु आहे. 5 ह्यास्तव त्या समयापूर्वी म्हणजे प्रभूच्या येण्यापूर्वी तुम्ही न्यायनिवाडा करूच नका; तो अंधारांतील गुप्त गोष्टी प्रकाशांत आणील आणि अंतःकरणांतील संकल्पहि उघड करील; आणि मग प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणे देव त्याची वाहवा करील.**

1 करिंथ. 5:9—11

**[9] तुम्ही जारकर्म्यांची संगत धरू नये, असे मी आपल्या पत्रांत तुम्हास लिहिले होते; [10] तथापि ह्या जगाचे जारकर्मी, लोभी, वित्त हरण करणारे व मूर्तिपूजक ह्याची संगत मुळीच धरू नये असे माझे म्हणणे नाही; कारण तसे कराल तर तुम्हास जगातून निघून जावे लागेल. [11] ह्यास्तव मी तुम्हास जे लिहिले होते त्याचा अर्थ असा की, बंधु म्हटलेला असा कोणी जर जारकर्मी, लोभी, मूर्तिपूजक, चहाड, मद्यपी, किंवा वित्त हरण करणारा असला तर तशाची संगत धरू नये; त्याच्या पंक्तीसहि बसू नये.**

देवाने आपल्या सभोवताली ज्या लोकांस ठेविले आहे, त्यांच्याप्रत जबाबदार राहणे महत्वाचे आहे, देवाप्रत जबाबदार राहणे महत्वाचे आहे. शेवटी, आम्हास त्या प्रभूप्रत जबाबदार राहावयाचे आहे, जो सर्व गोष्टींची पारख करतो.

सोप्या शब्दांत, जबाबदार राहणे म्हणजे :

- देवाप्रत खरेपणा बाळगणे
- स्वतःप्रत खरेपणा बाळगणे
- कुटूंबाप्रत खरेपणा बाळगणे
- ज्यांची आम्ही सेवा करतो त्यांच्याप्रत खरेपणा बाळगणे
- जे आमच्या जीवनाविषयी काळजी करतात, त्यांच्याप्रत खरेपणा बाळगणे

जर आम्ही पहिल्या दोन गोष्टींत चुकतो, तर इतर तीन गोष्टींतही आम्ही चुकल्यावाचून राहणार नाही, हे शक्य आहे.

जे आम्ही प्राप्त केलेले आहे, त्याचा व्याप किती आहे याद्वारे आम्हास पारखले जाणार नाही, पण आम्ही ते काम कोणत्या हेतूने केले या आधारे आमची पारख केली जाईल (1 करिंथ. 4:5).

जी महत्कृत्ये आम्ही केली, त्यांच्या थोरवीच्या आधारे आमची पारख केली जाणार नाही, पण परमेश्वर पित्याच्या इच्छेप्रत आमच्या आज्ञाधारकपणाच्या आधारे आम्हास पारखले जाईल (मत्तय 7:21–23).

आमचे पाचारण अथवा कृपादाने यांच्या महत्वाच्या आधारे आम्हास पारखले जाणार नाही, पण ज्या विश्वासूपणाने आम्ही ते पूर्ण केले, त्या आधारे आम्हास पारखले जाईल (मत्तय 25:21).

प्रकटीकरण 3:1–2

**1 सार्दीस येथील मंडळीच्या दूताला लिही: ज्याच्याजवळ देवाचे सात आत्मे आहेत व सात तारे आहेत तो असे म्हणतो: तुझी कृत्ये मला ठाऊक आहेत; तू जिवंत आहेस असे तुझ्याविषयी म्हणतात, पण तू मेलेला आहेस. 2 जागृत हो, आणि जे मरणाच्या पंथास लागले आहे ते सावरून धर; कारण तुझी कृत्ये माझ्या देवाच्या दृष्टीने पूर्ण अशी माझ्या पाहण्यात आली नाहीत.**

मनुष्यांत आमचे नाव असेल की आम्ही जिवंत आहोत, पण परमेश्वराच्या दृष्टीने आम्ही मेलेले आढळावे अशी शक्यता आहे.

लोकांनी आम्हास अभिषिक्त मानावे, पण परमेश्वर आमच्याबाबत निराश आहे अशी शक्यता असू शकते.

आमची ही इच्छा असली पाहिजे की आमचे काम व सेवा परमेश्वराच्या दृष्टीने परिपूर्ण असावी.

## 1.8 राज्याची स्थापना करणाऱ्याचे अंतःकरण

राज्याची स्थापना करणाऱ्याचे अंतःकरण पूर्णपणे ख्रिस्त राजाप्रत समर्पित असे अंतःकरण आहे.

राज्याची स्थापना करणाऱ्याचे अंतःकरण केवळ ख्रिस्ताच्या गौरवाच्या शोधार्थ असते.

राज्याची स्थापना करणाऱ्याचे अंतःकरण मनुष्याकडून गौरव प्राप्त करू इच्छित नाही.


राज्याची स्थापना करणाऱ्याचे अंतःकरण मनुष्याचा अभिमान बाळगत नाही.

राज्याची स्थापना करणाऱ्याचे अंतःकरण असे अंतःकरण आहे ज्याचा हेतु शुद्ध आहे.

प्रार्थना करू या की आपल्या अंतरात्म्यात राज्याची स्थापना करणाऱ्याचे अंतःकरण देव उत्पन्न करो.

येथे संपूर्ण राज्याच्या स्थापनेची सुरूवात होते.

"प्रभु, मला राज्याची स्थापना करणारे अंतःकरण दे."




# राज्याची स्थापना करणारे

# 2
# संचालक पवित्र आत्मा

परमेश्वराच्या राज्याच्या निर्मितीसाठी आम्ही पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाखाली व त्याच्या नेतृत्वाधीन राहावे हे अगत्याचे आहे.

## 2.1 जे परमेश्वर पित्याची इच्छा पूर्ण करतात, ते सार्वकालिक जीवनात आशीर्वाद पावतील

आपली नव्हे, परंतु केवळ परमेश्वर पित्याची इच्छा पूर्ण करणारे सार्वकालिक जीवनात आशीर्वाद पावतील.

मत्तय 7:21—23

**21 मला प्रभूजी, प्रभूजी, असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यांत हाईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल.
22 त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, प्रभो, प्रभो 'आम्ही तुझ्या नांवाने संदेश दिला,' तुझ्या नांवाने भुते घालविली, व तुझ्या नांवाने पुष्कळ महत्कृत्ये केली नाहीत काय?
23 तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगेन की, मला तुमची कधीच ओळख नव्हती; 'अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा.'**

आम्ही त्याच्या 'नावाने' अनेक चमत्कार करीत असू, पण तरीही त्याच्याशी आमचे वैय्यक्तिक नाते नसण्याची शक्यता आहे.

आम्ही त्याच्या 'नावाने' अनेक चमत्कार करीत असू, पण तरीही त्याने आम्हास अनाचार करणारे म्हणावे अशी शक्यता आहे.

आम्ही त्याच्या 'नावाने' अनेक चमत्कार करीत असू, पण तरीही शक्यता आहे की आम्ही त्याची इच्छा पूर्ण करण्याच्या बाबतीत चुकत असू.

कित्येकदा आम्ही योजना, कार्यक्रम, सेवा यांची सुरूवात करतो आणि प्रभूचे नाव त्यांच्याशी जोडतो, आम्हास असे वाटते की असे केल्याने आम्ही त्यास परमेश्वराच्या इच्छेत बदलू शकतो.

आम्हास ह्या गोष्टीस प्राधान्य दिले पाहिजे की आम्ही त्याची इच्छा जाणावी, नीतिमत्वाचे पालन करावे आणि मग अद्भुत कृत्ये करण्यासाठी पुढे वाढावे, जी त्याच्या नावांत करण्यासाठी आम्हास पाचारण करण्यात आले आहे.

जेव्हा आम्ही वृक्षाची निगा राखून चांगला वृक्ष तयार करतो, तेव्हा फळेही चांगली येतात.

## 2.2 पृथ्वीवर पित्याची इच्छा काय आहे ते पवित्र आत्मा आम्हावर प्रगट करतो

योहान 16:13–15

**13 तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो तुम्हाला मार्ग दाखवून सर्व**
**सत्यांत नेईल; कारण तो आपल्या स्वतःचे सांगणार नाही; तर जे काही**
**ऐकेल, तेच सांगेल; आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हास कळवील. 14 तो माझे**
**गौरव करील; कारण जे माझे आहे त्यांतून घेऊन ते तुम्हास कळवील.**
**15 जे काही पित्याचे आहे ते सर्व माझे आहे; म्हणून मी म्हणालो की, जे**
**माझे आहे त्यांतून ते तुम्हास कळवील.**

पवित्र आत्मा आमच्याशी तेच बोलतो जे प्रभू येशू बोलतो.परमेश्वर पिता ते येशूवर प्रगट करतो आणि पवित्र आत्मा ते आमच्या अंतःकरणाशी बोलतो.

रोम. 8:14

**14कारण जितक्यांना परमेश्वराचा आत्मा चालवीत आहे तितके परमेश्वराचे पुत्र आहेत.**

परमेश्वराची मुले व मुली या नात्याने परमेश्वराच्या आत्म्याने आमचे मार्गदर्शन करावे हे सौभाग्य आम्हास लाभले आहे.

म्हणून आम्ही परमेश्वराचे अंतःकरण व मन जाणू शकतो. पवित्र आत्म्याद्वारे आम्हावर प्रगट करण्यात आलेली पित्याची इच्छा आम्ही जाणू शकतो.

आत्म्याद्वारे चालविले जाणे व पित्याच्या इच्छेनुसार कार्य करण्याचे महत्व आम्ही समजले पाहिजे.

## 2.3 देहापासून जन्मलेले देह आहे आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहे

योहान 3:6

**6 देहापासून जन्मलेले देह आहे आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहे.**

जे देहापासून आहे, त्यास आत्म्याच्या कार्यात बदलता येत नाही.

कित्येकदा आम्ही आपल्या दैहिक शक्तीद्वारे काही गोष्टींना जन्म देतो आणि आशा करतो की कसेतरी त्यांनी आत्म्याचे कार्य बनावे. असे करता येत नाही.

निर्गम 30:22–33

**22 मग परमेश्वर मोशेला म्हणाला, 23 तू उत्तम प्रकारचे मसाले घे, म्हणजे पवित्र स्थानांतल्या चलनाप्रमाणे पाचशे शेकेल प्रवाही गंधरस, त्याच्या निम्मे म्हणजे अडीचशे शेकेल सुगंधी दालचिनी, अडीचशे शेकेल सुगंधी बच, 24 पांचशे शेकेल तज, आणि एक हिनभर जैतुनाचे तेल ही घेऊन,**
**25 त्यांचे अभिषेकाचे पवित्र तेल म्हणजे गांध्यांच्या कसबाप्रमाणे मिसळलेले सुगंधी तेल तयार कर; हे अभिषेकाचे पवित्र तेल होय. 26 या तेलाने दर्शनमंडप व साक्षीकोश, 27 मेज व त्यावरील सर्व सामान, दीपवृक्ष व त्याची उपकरणे, धूपवेदी, 28 होमवेदी व तिचे सर्व सामान व बैठकीसह**

**गंगाळ ह्यांना अभिषेक करावा. [29] त्यांना पवित्र करावे म्हणजे ती परमपवित्र ठरतील, ज्याचा स्पर्श त्यांना होईल ते पवित्र होईल. [30] आणि याजक ह्या नात्याने माझी सेवा करण्यासाठी अहरोन व त्याचे मुलगे ह्यांना अभिषेक करून पवित्र कर. [31] इस्त्राएल लोकांना सांग की, पीढ्यानपीढ्या तुम्हाला माझ्याप्रीत्यर्थ हेच पवित्र अभिषेकाचे तेल असणार. [32] हे तेल कोणाहि व्यक्तीच्या अंगाला लावावयाचे नाही व ह्या प्रकारचे मिश्रण कोणी करावयाचे नाही; हे पवित्र आहे; आणि तुम्ही ह्याला पवित्रच लेखावे. [33] जो कोणी त्याच्यासारखे मिश्रण तयार करीत किंवा कोणा परक्याला ते लावील त्याचा स्वजनांतून उच्छेद व्हावा.**

जुन्या करारातील पवित्र अभिषेकाचे तेल नव्या करारातील पवित्र आत्म्याच्या अभिषेकाचे, पवित्र आत्म्याच्या तेलाचे "प्रतीक व छाया" होते.

आम्ही पवित्र आत्म्याच्या अभिषेकाचे "प्रतीक व छाया" याद्वारे काही पाठ शिकू या :

- परमेश्वराच्या सेवेत ज्या गोष्टींचा उपयोग करावयाचा आहे, त्यांचा परमेश्वराद्वारे अभिषेक करण्यात आलेला असावा (वचन 23–28).
- परमेश्वराद्वारे ज्याचा अभिषेक होतो, ते परमेश्वराप्रत समर्पित होते (वचन 29,30).
- जे देहाने जन्मले आहे, त्यास परमेश्वर अभिषेक करणार नाही (वचन 32).
- परमेश्वर अभिषेकाची कुठलीही नकल सहन करणार नाही (वचन 33).

जे देहाने जन्मले आहे, त्यास परमेश्वर अभिषेक करू शकत नाही. जे देहाने जन्मले आहे, ते परमेश्वराच्या कार्याची केवळ नकल होय. त्यास परमेश्वराच्या जीवनातून, उपस्थितीतून व अभिषेकातून "दूर केले" जाईल.

गलती. 4:29

**29 परंतु त्या वेळेस देहस्वभावानुसार जन्मलेल्या मुलाने आत्म्यानुसार जन्मलेल्या मुलाचा छळ केला, तसा आताहि होत आहे.**

ज्या गोष्टी देहाने जन्मल्या आहेत, त्या आत्म्याने आम्ही ज्या गोष्टींस जन्म दिला, त्या कामांत अडखळण उत्पन्न करतील व त्या कामांचा नाश करतील.

कित्येकदा, ज्या मोठमोठ्या संघर्षांस आम्ही तोंड देतो, त्या शत्रूच्या युक्त्या नसतात, तर ज्यांस आम्ही देहात जन्म दिला आहे, त्या गोष्टी अडखळण उत्पन्न करतात.

गलती. 5:17

**17 कारण देहवासना आत्म्याविरुद्ध आहे व आत्मा देहवासनेविरुद्ध आहे; ही परस्परविरुद्ध आहेत, ह्यासाठी की, जे काही तुम्ही इच्छिता ते तुमच्या हातून घडू नये.**

जे देहापासून आहे, ते आत्मिक गोष्टींचा विरोध करील. नकल नेहमी खऱ्याचा विरोध करील. असत्य नेहमी सत्याचा विरोध करील. म्हणून आम्ही सावध असले पाहिजे की आम्ही दैहिक गोष्टींना जन्म देता कामा नये.

योहान 6:63

**63 आत्मा हा जिवंत करणारा आहे, देहापासून काही लाभ नाही; मी जी वचने तुम्हास सांगितली आहेत ती आत्मा व जीवन अशी आहेत.**

जे देहापासून जन्मले आहे, त्याद्वारे लोकांस फायदा होणार नाही. त्यात जीवन निर्माण करण्याचे सामर्थ्य नसते.

स्तोत्र. 127:1

**[1] परमेश्वर जर घर बांधीत नाही तर ते बांधणाऱ्यांचे श्रम व्यर्थ आहेत; परमेश्वर जर नगर रक्षीत नाही तर पहारेकऱ्यांचे जाग्रण व्यर्थ आहे.**

जर प्रभू बांधणी करीत नसेल, तर जे काही बांधण्यात आले आहे, ते व्यर्थ आहे. ते जरी भव्य, वैभवशाली दिसत असेल, आणि लोक त्याची प्रशंसा करीत असतील, तरीही अशाप्रकारच्या इमारतीविषयी किंवा बांधकामाविषयी पौलाने म्हटले आहे की "हे पाषाण, लाकूड, गवत, पेंढा" यांचे काम आहे. ते डोळ्यासमोर टिकून राहणार नाही (1 करिंथ. 3:12—13).

राज्याची स्थापना करणारा म्हणून, माझी एकमेव इच्छा ही आहे की मी आपल्या पित्याची इच्छा पूर्ण करावी – आत्मिक गोष्टी जन्मास घालाव्या.

## 2.4 पवित्र आत्मा प्रकट करतो 'कोठे', 'केव्हा' आणि 'कसे'

प्रे. कृत्ये 8:29

**[29] तेव्हा आत्म्याने फिलिप्पाला सांगितले, तू जाऊन त्याचा रथ गांठ.**

पवित्र आत्म्याद्वारे हब्शी षंढाची भेट घेण्यासाठी फिलिप्पाचे मार्गदर्शन करणे फार महत्वाचे होते. यावेळी हब्शी कूशी अधिकारी अशा स्थितीत होता ज्यात फिलिप्पास त्याला परमेश्वराचे वचन ऐकविता येणार होते आणि त्याला तो येशूकडे आणू शकत होता.

प्रे. कृत्ये 10:19

**[19] पेत्र त्या दृष्टांताविषयी विचार करीत असता आत्मा त्याला म्हणाला, पाहा, तीन माणसे तुझा शोध करीत आहेत.**

प्रे. कृत्ये 11:12

**[12] तेव्हा आत्म्याने मला सांगितले की, काही संशय न धरिता त्यांच्याबरोबर जा. मग हे सहा बंधुहि माझ्याबरोबर आले आणि आम्ही त्या माणसाच्या घरी गेलो.**

कुठलाही संशय न धरता, कर्नेल्याची भेट घेण्यासाठी पवित्र आत्म्याने पेत्राचे मार्गदर्शन केले. याद्वारे यहूदेतर लोकांसाठी शुभवर्तमानाची दारे उघडली.

प्रे. कृत्ये 13:2—4

**[2] ते प्रभूची सेवा व उपास करीत असता पवित्र आत्मा म्हणाला की, बर्णबा
व शौल ह्यांना ज्या कार्यासाठी मी बोलाविले आहे त्यासाठी त्यांना
माझ्याकरिता वेगळे करून ठेवा. [3] तेव्हा त्यांनी उपास व प्रार्थना करून
आणि त्यांच्यावर हात ठेवून त्यांची रवानगी केली. [4] ह्याप्रमाणे पवित्र
आत्म्याच्या द्वारे त्यांची रवानगी झाल्यावर ते सलूकीयांत येऊन तारवांतून
कुप्रास गेले.**

पवित्र आत्म्याने बर्णबा व शौल यांस सेवेसाठी पाचारण केले जी त्याने त्यांच्यासाठी नेमिली होती. पवित्र आत्म्याने त्यांस पाठविले होते.

प्रे. कृत्ये 16:6—10

**[6] नंतर आशिया प्रांतांत वचन सांगण्यास त्यांना पवित्र आत्म्याकडून
प्रतिबंध झाल्यामुळे ते फ्रुगिया व गलतिया ह्या प्रांतांमधून गेले; [7] आणि
मुसियापर्यंत आल्यावर बिथूनियास जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु
येशूच्या आत्म्याने त्यांना जाऊ दिले नाही. [8] मग ते मुसियाजवळून जाऊन
त्रोवसाला खाली गेले. [9] तेथे रात्री पौलाला असा दृष्टांत झाला की,
मासेदोनियाचा कोणीएक माणूस उभा राहून आपणाला विनंती करीत आहे
की, इकडे मासेदोनियांत येऊन आम्हाला साहाय्य कर. [10] त्याला असा
दृष्टांत झाल्यानंतर त्या लोकांना सुवार्ता सांगावयास परमेश्वराने आम्हाला
बोलाविले आहे असे अनुमान करून आम्ही मासेदोनियांत जाण्याचा
लागलाच विचार केला.**

प्रभू येशूने आज्ञा दिली होती की संपूर्ण जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करावी. तरीही आम्ही येथे पाहतो की पवित्र आत्मा त्या विशिष्ट समयी पौल व त्याच्या सहकाऱ्यांस आशिया व बिथूनिया येथे जाण्यास मनाई करतो.

याऐवजी तो त्यांस मासेदोनियास जावयास सांगतो. पवित्र आत्म्यास हे माहीत होते की राज्याच्या कामानिमित्ताने आम्हास केव्हा, कोठे व कसे जावयाचे आहे.

2 करिंथ. 1:15—17

**15 असा भरंवसा बाळगून तुम्हास दोनदा कृपादान मिळावे म्हणून पहिल्याने तुम्हाकडे यावे, 16 तुम्हाकडून मासेदोनियास जावे, नंतर पुन्हा मासेदोनियाहून तुम्हाकडे यावे, आणि तुम्ही मला यहूदीयाकडे वाटेस लावावे, असा माझा बेत होता. 17 तर असा बेत असता मी चंचलपणा केला काय? अथवा मला होय होय, नाही नाही अशी धरसोड करता यावी म्हणून जे मी योजितो ते देहस्वभावाप्रमाणे योजितो काय?**

आम्हास पवित्र आत्म्याने प्रेरित योजने अनुसार चालावयाची गरज आहे. ज्या गोष्टींची योजना आम्ही आखतो ती व आमचा हेतू पवित्र आत्म्याद्वारे प्रेरित असला पाहिजे.

## 2.5 आत्म्याची प्रेरणा अनेक प्रकारे येते

- लिखित वचन आम्हास संजीवन देते.
- एक हळूच अंतरातील वाणी (विचार).
- आत्म्याची एखादी माहिती अथवा सूचना चमकून उठणे
- अंतःकरणात जाणून घेणे
- परमेश्वराचा हेतू प्रकट करणारे विचार अथवा चित्र.
- भविष्यद्वाणीच्या द्वारे

- स्वप्न व दर्शन.
- बाह्य अथवा भौतिक प्रकटीकरण.
- इतर पद्धती.

## 2.6 पवित्र आत्म्याशी एक अखंड संवाद स्थापित करण्याची गरज आहे

पवित्र आत्म्याशी एक अखंड संवाद स्थापित करण्याची गरज आहे. अर्थात् आम्हास हे जाणता यावे की तो केव्हा बोलला आहे.

## 2.7 आत्म्याची वेळ ओळखणे

कामासाठी आत्म्याची वेळ ओळखणे महत्वाचे आहे – मग ती क्रिया लगेच होत असावी, अथवा नंतर अथवा भविष्यात फार पुढे.

अशी वेळ येते, जेव्हा तो म्हणतो, “तू जाऊन त्याचा रथ गांठ” (प्रे. कृत्ये 8:29). आम्ही कुठलाही प्रश्न न विचारता लगेच आज्ञेचे पालन केले पाहिजे, नाहीतर आम्ही परमेश्वराच्या योजनेत चुकणार.

अशीही वेळ येते जेव्हा तो आमच्याशी बोलतो आणि आमच्याजवळ प्रार्थनेसाठी, तयारी करण्यासाठी व त्याच्या आज्ञेनुसार कार्य करण्यासाठी वेळ असतो (प्रे.कृत्ये 13:1–4).

## 2.8 आत्म्यात प्रार्थना करणे महत्वाचे आहे

### 2.8.1 आत्म्यात प्रार्थना करण्याद्वारे माझा आत्मा परमेश्वराचे हेतू समजण्यास तयार होतो

1 करिंथ. 2:9,10,16

**9 हे तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणे आहेः ‘डोळ्याने जे पाहिले नाही, कानाने जे ऐकले नाही’ व माणसाच्या ‘मनांत जे आले नाही, ते आपणावर प्रीति करणाऱ्यांसाठी परमेश्वराने’ सिद्ध केले आहे; 10 कारण परमेश्वराने ते**

**आत्म्याच्या द्वारे आपल्याला प्रगट केले, कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व परमेश्वराच्या गहन गोष्टींचाहि शोध घेतो. [16] 'प्रभूचे मन असे कोणी ओळखिले आहे की त्याने त्याला शिकवावे?' आपल्याला तर ख्रिस्ताचे मन आहे.**

पवित्र आत्मा मजवर त्या गोष्टी प्रकट करतो ज्या आत्म्याने माझ्यासाठी तयार केल्या आहेत. आरंभी, हे माझ्यासाठी रहस्यमय असेल – अशा गोष्टी ज्या डोळ्यांनी पाहिल्या नाहीत, कानांनी ज्या ऐकल्या नाहीत व माणसाच्या 'मनांत ज्या आल्या नाहीत. परंतु पवित्र आत्म्याने ती रहस्ये मजवर प्रकट केली आहेत. म्हणून मला ख्रिस्ताचे मन आहे – मी ते विचार, योजना आणि हेतू जाणतो जे त्याच्या मनात आहेत.

1 करिंथ. 14:2

**[2] कारण भाषा बोलणारा माणसांबरोबर नव्हे, तर परमेश्वराबरोबर बोलतो; कारण ते माणसाला समजत नाही; तो आत्म्याने गूढ गोष्टी बोलतो.**

जेव्हा मी आत्म्याने प्रार्थना करतो, तेव्हा मी गूढ गोष्टी बोलतो. असा अंदाज लावणे सुरक्षित होईल की या रहस्यातील काही गोष्टी परमेश्वराने माझ्यासाठी तयार केलेल्या असतील, माझ्या जीवनासाठी परमेश्वराचे विचार, योजना व हेतू.

## 2.8.2 आत्म्याने प्रार्थना केल्याने माझी इच्छा परमेश्वराच्या इच्छेनुसार होते

इब्री. 5:7–9

**[7] आपल्याला मरणांतून तारावयास जो समर्थ आहे त्याच्याजवळ त्याने आपल्या देहावस्थेच्या दिवसांत, मोठा आक्रोश करीत व अश्रु गाळीत प्रार्थना व विनवणी केली, आणि ती त्याच्या सद्भक्तिमुळे ऐकण्यांत आली;**

**[8] तो पुत्र असूनहि त्याने जे दुःख सोशिले तेणेंकरून तो आज्ञाधारकपणा शिकला; [9] आणि परिपूर्ण केला जाऊन तो आपल्या आज्ञेंत राहणाऱ्या सर्वांचा युगानुयुगींच्या तारणाचा कर्ता झाला.**

आम्ही हे लक्षात घ्यावे की वचन आम्हास हे सांगते की प्रभू येशूने जे दुःख सोशिले तेणेकरून तो "आज्ञाधारकपणा शिकला" – हे पित्याच्या इच्छेनुसार आपल्या इच्छेची मांडणी करणे होय.

आम्हास हे माहीत आहे की हे गेथशेमाने बागेत घडले.

मत्तय 26:38,39,42

**[38] तेव्हा त्याने त्यांस म्हटले, 'माझा जीव' मरणप्राय, 'अति खिन्न झाला आहे,' तुम्ही येथे थांबा व माझ्याबरोबर जागे राहा. [39] मग तो थोडासा पुढे जाऊन पालथा पडला आणि त्याने अशी प्रार्थना केलीः हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो. [42] आणखी त्याने दुसऱ्यांदा जाऊन अशी प्रार्थना केली, हे माझ्या बापा, हे मी प्यालाशिवाय टळून जात नाही तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.**

प्रार्थना माझ्यात बदल घडवून आणते. प्रार्थना मी पित्याच्या इच्छेनुसार स्वतःच्या इच्छेची मांडणी करावी म्हणून माझे सहाय्य करते. प्रार्थनेच्या वेळी परमेश्वर माझ्या अंतःकरणात कार्य करतो, माझ्या इच्छेस व स्वप्नांस तो त्याच्या इच्छेनुसार, योजनेनुसार व हेतूनुसार घडवितो.

रोम. 8:26,27

**[26]तसेच आत्माहि आपल्या अशक्तपणांत आपल्याला हातभार लावितो; कारण आपण यथायोग्य प्रार्थना कशासाठी केली पाहिजे हे आपल्याला ठाऊक नाही; पण आत्मा स्वतः अनिर्वाच्य कण्हण्याने मध्यस्थी करितो; [27]पण अंतर्यामे पारखणाऱ्याला त्या आत्म्याचा मनोभाव काय हे ठाऊक आहे; कारण हा आत्मा पवित्र जनांसाठी परमेश्वराच्या मर्जीप्रमाणे मध्यस्थी करितो.**

मी आपल्या भाषेत प्रार्थना करू शकतो, परंतु परमेश्वराने प्रार्थनेत माझी मदत करण्यासाठी एक सामर्थ्यवान सहाय्यक दिलेला आहे – स्वतः पवित्र आत्मा – जो प्रार्थना करण्यात माझी मदत करतो. जेव्हा मी अन्य अन्य भाषेत प्रार्थना करतो, तेव्हा मी आत्म्याने प्रार्थना करतो. मला माहीत आहे की जी प्रार्थना आत्म्यातून येते, ती नेहमी परमेश्वराच्या इच्छेनुसार असते. म्हणून आत्म्याने प्रार्थना करण्याची वेळ आमच्या इच्छेस त्याच्या इच्छेनुसार मांडण्याची योग्य वेळ असते.

## 2.9 आत्म्याच्या कार्यांस जन्म देणे – 'मरियेच्या जीवनात घडलेल्या' चमत्कारातून काही पाठ

### 2.9.1 पृथ्वीवर योग्य समयी मुक्त केला गेला

उत्पत्ती 3:15

**[3] आणि तू व स्त्री, तुझी संतति व तिची संतति यामध्ये मी परस्पर वैर स्थापीन; ती तुझे डोके फोडील, व तू तिची टांच फोडिशील.**

गलती. 4:4

**[4] परंतु काळाची पूर्णता झाली तेव्हा परमेश्वराने आपल्या पुत्राला पाठविले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता.**

जरी स्त्रीच्या 'संततीचे' येणे एदेन बागेत भविष्यवाणीच्या रूपात सांगण्यात आले, तरीही चार हजार वर्षे ख्रिस्त या जगात आला नाही.

वेळ पूर्ण झाल्यावर परमेश्वराचे कार्य ह्या पृथ्वीवर मुक्त होते.

### 2.9.2 सामान्य लोकांद्वारे मुक्त केले गेले

यशया 7:14

**[14] यास्तव प्रभू स्वतः तुम्हास चिन्ह देत आहे; पाहा, कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याचे नाव इम्मानुएल (आमच्यासान्निध परमेश्वर) असे ठेवील.**

जेव्हा परमेश्वरास या जगात तारणारा पाठवावयाचा होता, तेव्हा त्याने एखाद्या राजकुमारीची अथवा खूप शिकलेल्या स्त्रीची निवड केली नाही. परंतु त्याऐवजी त्याने लहानश्या, सर्वसाधारण मरीया नावाच्या कुमारिकेची निवड केली.

आपले सार्वकालिक राज्याचे कार्य सर्वसाधारण लोकांच्या हाती देण्यास परमेश्वराला भीती वाटत नाही.

### 2.9.3 शुद्ध असले पाहिजे – केवळ त्याच्या आत्म्याने जन्मलेले

लूक 1:35

**35 परमेश्वरदूताने उत्तर दिले, पवित्र आत्मा तुझ्यावर येईल आणि परात्पराचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील; ह्या कारणाने ज्याचा जन्म होईल त्याला 'पवित्र,' परमेश्वराचा पुत्र, असे 'म्हणतील'.**

आमच्याद्वारे परमेश्वर जे कार्य करतो, ते केवळ आत्म्याने जन्मलेले असावे, देहाच्या कार्याने कलुषित वा मलिन झालेले नसावे.

### 2.9.4 लज्जेचे कारण ठरू शकते

मत्तय 1:19

**19 तिचा पति योसेफ नीतिमान् होता व तिची बेअब्रू करण्याची त्याची इच्छा नसल्यामुळे तिला गुप्तपणे सोडण्याचा त्याने विचार केला.**

जरी मरियेच्या गर्भात परमेश्वराचा पुत्र होता, तरीही याद्वारे तिला लज्जेस तोंड द्यावे लागले.

### 2.9.5 सामान्य स्वाभाविक प्रक्रियांद्वारे मुक्त

1 करिंथ. 15:10

**10 तरी जो काही मी आहे तो परमेश्वराच्या कृपेने आहे आणि माझ्यावर त्याची जी कृपा झाली आहे ती व्यर्थ झाली नाही; परंतु त्या सर्वांपेक्षा मी**

**अतिशय श्रम केले ते मी केले असे नाही, तर माझ्याबरोबर असणाऱ्या परमेश्वराच्या कृपेने केले.**

जरी मरियेचे गर्भधारण एक चमत्कार होता, तरीही त्या बाळाची वेळ पूर्ण होईपर्यंत त्याला गर्भात ठेवावे लागले.

## 2.9.6 परमेश्वराच्या नेमलेल्या वेळेपर्यंत जाऊन पोहोचेपर्यंत बंद दारे मिळू शकतात

लूक 2:7

**7 आणि तिला तिचा प्रथमपुत्र झाला; त्याला तिने बाळंत्याने गुंडाळून गव्हाणींत ठेविले, कारण त्यांस उतारशाळेत जागा नव्हती.**

ही आश्चर्याची गोष्ट आहे की जरी परमेश्वर पित्यास हे माहीत होते की येशूचा जन्म विशिष्ट समयी होईल, तरीही त्याने त्याच्यासाठी उतारशाळेत जागा राखून ठेविली नाही. जेथे येशूचा जन्म होणार होता, त्या गव्हाणीत पोहोचेपर्यंत, मरीया व योसेफ यांना अनेक उतारशाळेची दारे ठोठावी लागली.

बंद दारांचा अर्थ हा नाही की आपण जे मोकळे करीत आहात ते परमेश्वराचे खरे कार्य नाही. बंद दाराचा अर्थ, परमेश्वर केवळ अशा ठिकाणाकडे आपले मार्गदर्शन करणार आहे, जेथे त्याची इच्छा आहे की आपण त्या कार्यास मुक्त करावे जो तो आपल्याद्वारे उत्पन्न करणार आहे.

## 2.9.7 त्याचे रक्षण व पोषण होणे अगत्याचे आहे

लूक 2:40

**40 तो बाळक वाढत वाढत बलवान् होत गेला व ज्ञानाने पूर्ण होत गेला; आणि त्याच्यावर परमेश्वराची कृपा होती.**

मत्तय 2:12—16

**12 मग हेरोदाकडे परत जाऊ नका, अशी स्वप्नांत सूचना मिळाल्यामुळे ते
दुसऱ्या मार्गाने आपल्या देशास निघून गेले. 13 ते गेल्यावर, पाहा,
प्रभूचा दूत योसेफास स्वप्नांत दर्शन देऊन म्हणाला, ऊठ, बाळक व
त्याची आई ह्यांना घेऊन मिसर देशांस पळून जा, आणि मी तुला
सांगेपर्यंत तेथेच राहा; कारण बाळकाचा घात करण्यासाठी हेरोद त्याचा
शोध करणार आहे. 14 मग तो उठला आणि बाळक व त्याची आई ह्यांना
घेऊन रातोरात मिसर देशास निघून गेला; 15 आणि हेरोदाच्या मरणापर्यंत
तेथे राहिला; 'मी आपल्या पुत्राला मिसर देशांतून बोलाविले आहे' हे जे
प्रभूने संदेष्ट्याच्या द्वारे सांगितले होते ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले.
16 तेव्हा मागी, लोकांनी आपणाला फसविले हे पाहून हेरोद अतिशय
संतापला आणि जी वेळ त्याने मागी लोकापासून नीट विचारून घेतली
होती तिच्याप्रमाणे त्याने बेथलहेमांत व आसपासच्या सर्व प्रदेशांत जे
दोन वर्षाचे व त्याहून कमी वयाचे बाळक होते त्या सर्वांना त्याने माणसे
पाठवून त्यांच्याकडून जिवें मारले.**

परमेश्वराचे प्रत्येक कार्य जे आम्ही पृथ्वीवर मोकळे करतो, त्याचे पोषण व रक्षण करणे जरूरी आहे.




# राज्याची स्थापना करणारे

# 3
# परमेश्वराद्वारे देण्यात आलेल्या दृष्टांताचे स्वरूप

ही वेळ दृष्टांतांची व स्वप्नांची आहे.

प्रे.कृत्ये 2:17–18

**17 देव म्हणतो, शेवटल्या दिवसांत 'असे होईल की, मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन; तेव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील, तुमच्या तरूणांस दृष्टांत होतील, व तुमच्या वृद्धांस स्वप्ने पडतील; 18 आणखी त्या दिवसांत मी आपल्या दासांवर व आपल्या दासींवर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन;' म्हणजे ते संदेश देतील.**

आमचे केवळ 'स्वर्गीय मनोरंजन' करण्यासाठी परमेश्वर दृष्टांत आणि स्वप्न देत नाही.

प्रत्येक स्वप्नाचा, दृष्टांताचा एक हेतू असतो. बहुधा, आम्ही ह्या पृथ्वीवर काय करावे असे परमेश्वराला वाटते, ते तो आमच्यावर प्रगट करतो.

आमच्यापैकी कित्येकांजवळ परमेश्वरातर्फे दृष्टांत / स्वप्न / इच्छा असतात की आम्ही त्याच्यासाठी काही करावे. आम्ही अर्थपूर्ण जीवन घालवू इच्छितो आणि असे काही करावयाची आमची इच्छा असते की त्याद्वारे परमेश्वराच्या राज्यात बदल घडून यावा. आम्ही राज्याची स्थापना करणारे बनू इच्छितो.

परमेश्वराद्वारे देण्यात आलेल्या दृष्टांतासंबंधाने येथे काही यथार्थ ज्ञान देण्यात आलेले आहे.

## 3.1 परमेश्वराद्वारे देण्यात आलेला दृष्टांत एक ईश्वरीय आदेश व अधिकारप्राप्ती आहे

परमेश्वराद्वारे देण्यात आलेला दृष्टांत ह्या पृथ्वीवर परमेश्वराच्या अधिराज्याच्या स्थापनेसाठी व वाढीसाठी एक ईश्वरीय आदेश आणि अधिकारप्राप्ती आहे.

- ही एक आज्ञा अथवा आदेश आहे, ज्याचे पालन आम्हास करावयाचे आहे.

प्रे. कृत्ये 26:15—19

**15 मी म्हटले, प्रभो, तू कोण आहेस? प्रभु म्हणाला, ज्या येशूचा तू छळ**
**करितोस तोच मी आहे. 16 तर ऊठ व 'आपल्या पायावर उभा राहा;'**
**कारण मी तुला एवढ्यासाठी दर्शन दिले आहे की, तू जे माझ्याविषयी पाहिले आहे व ज्याबाबत मी तुला दर्शन देणार आहे, त्याचा सेवक व**
**साक्षी असे तुला नेमावे. 17 ह्या लोकांपासून व 'परराष्ट्रीयांपासून मी तुझे**
**रक्षण करीन. 18 मी तुला त्यांच्याकडे पाठवितो, ह्यासाठी की, त्यांनी अंधारांतून उजेडाकडे' व सैतानाच्या अधिकारांतून देवाकडे वळावे, म्हणून तू त्यांचे 'डोळे उघडावे' आणि त्यांना पापांची क्षमा व्हावी व माझ्यावरील**
**विश्वासाने पवित्र झालेल्या लोकांमध्ये वतन मिळावे. 19 म्हणून, हे राजा**
**अग्रिप्पा, मी तो स्वर्गीय दृष्टांत अवमानिला नाही.**

- हा स्वर्गातून मिळालेला अधिकार आहे जो आम्हास धैर्यवान, निर्भय, व आत्मविश्वासी बनवितो.
- आपण दृष्टांत घेऊन चालणार आहात.
- जेव्हा परमेश्वर पृथ्वीवर काही करू इच्छितो, तेव्हा तो सामान्यतया, विशिष्ट ठिकाणच्या (जगाच्या पाठीवरील एखादा भाग) काही लोकांस शोधून काढतो अथवा त्यांस एकत्र करतो, ज्यांस त्याने आपला दैवी हेतू पूर्ण करण्यासाठी तयार केलेले असते. ह्या लोकांत तो सामान्यतः अशा व्यक्तीस (पुरुष किंवा स्त्री) उभारतो ज्याचे मिशन दैवी हेतू पूर्ण करणे असते. परमेश्वर ह्या व्यक्तीचा

> उपयोग आपल्या (संदेश) दृष्टांताची घोषणा करण्यासाठी करतो आणि त्यांस एक सेवा सोपवितो. हा मनुष्य दृष्टांताचे वहन करणारा अथवा लोकांपुढे दृष्टांत मांडणारा ठरतो. परमेश्वर ह्या व्यक्तीस आपली शैली सोपवितो ज्यावर त्यास अमल करावयाचा आहे आणि ती पूर्ण करण्यासाठी साधन देखील पुरवितो यासाठी की त्याला दैवी हेतू पूर्णत्वास आणता यावा.

खालील मुख्य शब्दांवर लक्ष द्या :

व्यक्ती, स्थान, घोषणा, लोक, हेतू.

मिशन, संदेश, सेवा, कार्यशैली अथवा पद्धत, माध्यम.

प्रे.कृत्ये 7:17—36

**17 मग देवाने अब्राहामाला जे अभिवचन दिले होते ते पूर्ण होण्याचा समय
जसजसा जवळ आला तसतसे ते लोक मिसर देशांत 'वाढून संख्येने
पुष्कळ झाले. 18 योसेफाची माहिती नसलेला असा दुसरा राजा मिसर
देशाच्या गादीवर बसेपर्यंत' असे चालले. 19 तो राजा आपल्या 'लोकांबरोबर
कपटाने वागला' आणि त्यांची बाळके 'जगू' नयेत म्हणून ती बाहेर
टाकून देण्यास त्याने त्यांस भाग पाडिले; असे त्याने आपल्या पूर्वजांस
'छळले.' 20 ह्याच काळांत मोशेचा जन्म झाला. तो देवाच्या दृष्टीने
'अतिशय सुंदर' होता; त्याचे पालनपोषण 'तीन महिनेपर्यंत' त्याच्या
बापाच्या घरी झाले; 21 मग त्याला बाहेर टाकून देण्यांत आले असता
'फारोच्या कन्येने त्याला घेऊन आपला पुत्र म्हणून' त्याचे संगोपन केले.
22 मोशेला मिसरी लोकांच्या सर्व विद्यांचे शिक्षण मिळाले आणि तो
भाषणांत व कृतींत पराक्रमी होता. 23 मग तो जवळजवळ चाळीस वर्षांचा
झाला तेव्हा 'आपले बांधव म्हणजे इस्राएलाचे संतान' ह्यांची भेट घ्यावी
असे त्याच्या मनांत आले. 24 तेव्हां मोशेने त्यांतील कोणाएकावर अन्याय
होत आहे असे पाहून त्या जाचलेल्या माणसाचा कैवार घेतला आणि
'मिसऱ्याला मारून' त्याचा सूड उगविला. 25 तेव्हा देव त्याच्या हाताने
त्याच्या बांधवांची सुटका करीत आहे हे त्यांस समजले असेल असे त्याला
वाटले होते, पण ते त्यांस समजले नाही. 26 मग दुसऱ्या दिवशी कोणी**

भांडत असता तो त्यांच्यापुढे येऊन उभा राहिला व त्यांची समजूत घालण्याकरिता त्यांस म्हणाला, गृहस्थांनो तुम्ही भाऊबंद आहा; एकमेकांवर अन्याय का करिता? [27] तेव्हा 'जो आपल्या शेजाऱ्यावर अन्याय करीत होता तो' त्याला ढकलून देऊन म्हणाला, 'तुला आम्हांवर अधिकारी व न्यायाधीश कोणी केले? [28] काल तू मिसऱ्याला ठार मारिले तसे मलाहि मारावयास पाहतोस काय? [29] हे शब्द ऐकतांच मोशे पळून गेला आणि मिद्यान देशांत उपरी झाला;' तेथे त्याला दोन मुलगे झाले. [30] मग चाळीस वर्षे भरल्यावर सीनाय पर्वताच्या रानांत एका झुडपांतील अग्निज्वालेत एक देवदूत त्याच्या दृष्टीस पडला.' [31] हे दृश्य पाहून मोशेला आश्चर्य वाटले आणि ते काय आहे हे पाहण्याकरिता तो जवळ गेला; तेव्हा प्रभूची वाणी झाली की, [32] 'मी तुझ्या पूर्वजांचा देव, अब्राहामाचा, इसहाकाचा व याकोबाचा देव आहे.' तेव्हा मोशे कंपित झाला व त्याला तिकडे पाहावयाचे धैर्य झाले नाही. [33] 'कारण प्रभूने त्याला म्हटले, तू आपल्या पायांतले जोडे काढ; कारण की, ज्या जागेवर तू उभा आहेस ती पवित्र भूमि आहे. [34] मिसर देशांतल्या माझ्या लोकांची विपत्ति मी खरोखर पाहिली आहे, त्यांचे हुंदके मी ऐकले आहेत आणि त्यांस सोडवून घेण्यासाठी मी उतरलो आहे; तर आता चल, मी तुला मिसर देशाला पाठवितो.' [35] 'तुला अधिकारी व न्यायाधीश कोणी केले,' असे म्हणून ज्या मोशेला त्यांनी झिडकारिले होते, त्यालाच, झुडपांत दर्शन झालेल्या देवदूताच्या हस्ते, देवाने अधिकारी व मुक्तिदाता म्हणून पाठविले. [36] 'त्याने मिसर देशांत,' तांबड्या समुद्रांत व 'रानांत चाळीस वर्षे अद्भुत कृत्ये करून व चिन्हे दाखवून' त्या लोकांस बाहेर नेले.

## 3.2 परमेश्वराद्वारे देण्यात आलेल्या दृष्टांताची सुरूवात करण्याची व तो कार्यान्वित करण्याची एक नेमलेली वेळ असते

प्रे.कृत्ये 7:17, 20

[17] मग देवाने अब्राहामाला जे अभिवचन दिले होते ते पूर्ण होण्याचा समय जसजसा जवळ आला तसतसे ते लोक मिसर देशांत 'वाढून संख्येने पुष्कळ झाले. [20] ह्याच काळांत मोशेचा जन्म झाला. तो देवाच्या दृष्टीने

**'अतिशय सुंदर' होता; त्याचे पालनपोषण 'तीन महिनेपर्यंत' त्याच्या बापाच्या घरी झाले.**

*'क्रोनोस' 'Chronos'* – कालावधी, काही दिवस.

*'कैरोस' 'Kairos'* – "वेळेची पूर्णता", पृथ्वीवरील एक अवस्था आहे. "वेळेच्या पूर्णतेचा" संबंध काही गोष्टींच्या एकत्र होण्याशी आहे – बाहेरील व आतील दोन्ही.

बाह्य कारणांत खालील गोष्टींचा समावेश आहे :

- लोक
- स्थान
- दृष्टांतांचे वहन करणाऱ्या सभोवतालच्या गोष्टी

परमेश्वरास ह्या कारणांस एकत्र करावयाचे आहे, यासाठी की त्याचा हेतू पूर्ण व्हावा.

आंतरिक कारणांत जीवनाशी संबंधित परिस्थिती, दृष्टांत घेऊन चालणाऱ्या व्यक्तीची तयारी व तत्परता यांचा समावेश आहे.

अशाप्रकारची परिस्थिती :

- अंतःकरणाची योग्य प्रवृत्ती
- लोकांसोबत योग्य नाते
- सर्व बाबतीत परिपक्वता
- घरात व्यवस्था
- सेवकाचे अंतःकरण अथवा सेवाभावी वृत्ती
- लहान गोष्टींत विश्वासूपणा
- ख्रिस्तासमान चारित्र्य

आपण आपला दृष्टांत, पाचारण व कृपादाने प्रकट करावी यापूर्वी परमेश्वरास आपणास तयार करण्यासाठी व घडविण्यासाठी वेळ लागतो.

पवित्र शास्त्रात आपण याची अनेक उदाहरणे पाहतो :

## योसेफ

## मोशे

- परमेश्वराने अलौकिकरित्या ही व्यवस्था केली की मोशेचे शिक्षण व प्रशिक्षण फारोच्या राजदरबारी व्हावे. हे मोशेच्या जीवनातील परमेश्वराने ठरविलेल्या 'आध्यात्मिक भवितव्याचे बीज' (प्रे.काम 7:22) होते. त्याच्या स्वर्गीय हेतूच्या पूर्णतेसाठी मोशेची ही प्रारम्भिक तयारी आणि स्थाननिश्चिती होती.
- 40 वर्षांच्या वयात मोशे आपले दैवी उद्दिष्ट्य अथवा हेतू समजू लागला. पण त्याने एक चूक केली, त्याने हा हेतू आपल्या पद्धतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.
- जेव्हा आम्ही आपल्या सामर्थ्याने काही करण्याचा प्रयत्न करतो – तेव्हा आम्ही परमेश्वराची योजना प्रकट होण्याच्या मार्गात विलंब उत्पन्न करतो. मोशेने स्वतः तो हेतू पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आणि तो पूर्ण होण्यास 40 वर्षे लागली.
- मोशेला अरण्यात 40 वर्षे घालवावी लागली (प्रे.कृत्ये 7:29,30; निर्गम 2:15,23), याचे कारण केवळ हे होते की ज्या राजास त्याने क्रोधित केले होते त्याच्या मृत्यूची त्याला वाट पाहावी लागली.
- 80 वर्षाच्या वयात मोशेने आपले दैवी मिशन पुन्हा सुरू केले.
- पुढील 40 वर्षे, तो आपल्या जीवनाचे उद्दिष्ट्य अथवा हेतू पूर्ण करीत राहिला.

## दावीद

- दावीद जेव्हा लहान होता, तेव्हापासून त्याला राजा होण्यासाठी अभिषेक करण्यात आला. त्यावेळी त्याचे वय 17 वर्षांचे असावे असे समजून या.
- आपल्या पित्याच्या मेंढरांची राखण करीत असतांना त्याने प्रारम्भिक प्रशिक्षण प्राप्त केले. याच वेळी तो संगीतकलेत पारंगत झाला.

त्याने सिंह व अस्वलाचा वध केला आणि इस्राएली लोकांत मोठी ख्याती प्राप्त केली.

- आरंभी त्याला यश मिळाले, जेव्हा त्याने गल्याथाला मारले व तो त्या राष्ट्राचा वीर नेता बनला.
- वेळ बदलली आणि दाविदाला आपला जीव घेऊन पळ काढावा लागला कारण शौल राजाने त्याचा वध करण्याचा निर्धार केला होता.
- पुढील 5–6 वर्षे दाविदाने भटक्या व्यक्तीप्रमाणे आपले जीवन घालविले (1 शमूवेल 22:1,2). ज्या इसमास राजा होण्यासाठी अभिषेक करण्यात आला होता त्याला आपले जीवन गुहाकंदरांत घालवावे लागले!
- परंतु, यावेळी परमेश्वराने काही लोकांस दाविदाच्या सोबतीस पाठविले आणि ते त्याच्या शक्तीशाली सैन्याचे सेनापती ठरले!
- ज्यावेळी दाविदाचे वय 23 वर्षांचे होते, तेव्हा तो यहूदाचा राजा बनला (2 शमूवेल 2:1–4).
- 30 वर्षांचा झाल्यावर दावीद शेवटी इस्राएल व यहूदाचा राजा बनला (2 शमूवेल 5:4,5). मग त्याने 40 वर्षेपर्यंत राजा म्हणून राज्य केले.
- जवळजवळ 13 वर्षांची तयारी – शमूवेल संद्देष्ट्याद्वारे पाचारण करण्यात आल्यानंतरच्या समयापासून, तो त्या पाचारणात प्रवेश करण्यासाठी जेव्हा त्यास नेमण्यात आले तेव्हापर्यंत.

## पौल

- दमिश्काच्या मार्गावर प्रभू येशू ख्रिस्ताशी जेव्हा त्याची भेट घडून आली, त्यावेळी पौलाचे वय 33 वर्षांचे असेल. त्याला प्रशिक्षण प्राप्त करण्यासाठी अनेक वर्षे लागली.
- त्याच्या भेटीच्या वेळी येशू ख्रिस्ताने त्यास हे प्रकट केले की त्यास यहूदेतर लोकांचा प्रकाश व विश्वासाचा प्रेषित होण्यासाठी पाचारण करण्यात आले होते.

- पौलाने आरंभी दिमिष्क व अरबस्तानात 3 वर्षे घालविली (गलती. 1:16—17; प्रे.कृत्ये 9:19—25). दिमिष्क येथे लोकांनी त्याला मारून टाकण्याचा प्रयत्न केला, म्हणून तो अरबस्तानास पळून गेला व नंतर परतला. याचवेळी त्याला शुभवर्तमानाचे बरेच प्रकटीकरण लाभले असावे अशी शक्यता आहे ज्याचा त्याने नंतर प्रचार केला.
- त्यानंतर त्याने 15 दिवस यरूशलेमेस भेट दिली (गलती. 1:18; प्रे. कृत्ये 9:26—30), यावेळी त्याने मोठ्या धैर्याने सुवार्ता गाजविली, परंतु पुन्हा एकदा लोकांनी त्याचा वध करण्याचा प्रयत्न केला व तार्स येथून निघून गेला.
- त्याने तार्स, सूरिया व किलिकिया येथे 13 वर्षे घालविली (गलती. 1:21—24; 2:1).
- ह्या 13 वर्षांच्या शेवटी बर्णबा तार्स येथे आला व शौलास अंत्युखिया येथे घेऊन गेला (प्रे.कृत्ये 11:25,26).
- पौलाने एक वर्ष अंत्युखियाच्या मंडळीत शिकवण देण्यात घालविले.
- ह्या वर्षाच्या शेवटी पौलाने बर्णबासोबत यरूशलेमेचा दुसरा प्रवास केला आणि दुष्काळ पीडितांसाठी मदत घेऊन गेला (प्रे.कृत्ये 11:29,30). अशाप्रकारे 14 वर्षांनंतर तो पुन्हा यरूशलेमेस जातो (गलती. 2:1).
- आतापर्यंत दिमिष्काच्या मार्गावर प्रभू येशूशी त्याची भेट घडून येण्यास 17 वर्षे झाली आहेत. यावेळी पौलाचे वय जवळपास 50 वर्षांचे असेल.
- पौलाचे ख्रिस्ती जीवन व परमेश्वरासोबत त्याच्या वाटचालीच्या पहिल्या 17 वर्षांबद्दल काहीही लिहिण्यात आलेले नाही. अर्थात्, आम्हास हे माहीत आहे की या दरम्यान पौलाने सुवार्ता गाजविली व शिकवण दिली. आम्हास हे माहीत आहे की त्याला प्रकटीकरण लाभले आणि परमेश्वराच्या गूढ गोष्टींसंबंधाने समज देण्यात आली. परंतु यावेळी जे काही त्याने केले व जो प्रचार केला त्याविषयी फारसे काही लिहिण्यात आलेले नाही. या वर्षांस पौलाच्या जीवनाचा 'शांततेचा काळ' असे म्हटले जाते. यहूदी

धर्मांतर्गत त्याच्या शिकवणीसोबतच ह्या वर्षांनीही त्याच्या प्रशिक्षणास हातभार लावला.

- शेवटी प्रे. कृत्ये 13 मध्ये, पौलास 17 वर्षांनंतर बर्णबासोबत मिशनरी यात्रेसाठी पाचारण करण्यात येते (प्रे. कृत्ये 13:1—4).
- प्रे. कृत्ये 14:14 मध्ये, पहिल्यांदा बर्णबासोबत पौलाला प्रेषित म्हटले गेले आहे.
- प्रभूसोबत झालेल्या भेटीनंतर 17 वर्षांनी पौलाने खऱ्या अर्थाने प्रेषिताच्या सेवेत प्रवेश केला. प्रेषित पौलास 17 वर्षांच्या तयारीची व प्रशिक्षणाची गरज भासली! परमेश्वराला घाई नाही!

### यिर्मया

जन्म होण्याआधीच यिर्मयास संदेष्टा म्हणून पाचारण घडून आले. परमेश्वराने त्यास म्हटले की त्याने लोकांस असे म्हणू देता कामा नये की तो लहान आहे. तरीही इतिहासावरून आम्हास कळून येते की प्रभूशी त्याची भेट घडून आली तेव्हापासून यिर्मया 1 मध्ये त्याच्या पहिल्या भविष्यवाणीच्या समयापर्यंत त्याला 16 वर्षे वाट पाहावी लागली.

परमेश्वराने दिलेल्या प्रत्येक दृष्टांताची सुरूवात होण्याचा, ती अमलात आणण्याचा आणि पूर्णत्वास आणण्याचा नेमलेला समय असतो. आता आणि ज्यावेळी परमेश्वराने दिलेला दृष्टांत आरंभ होतो, या दरम्यानच्या काळात आम्हास आणखी कोणाच्या स्वप्नात व दृष्टांतात पाऊल ठेवावयाचे आहे आणि विश्वासूपणे त्यांची सेवा करावयाची आहे. कारण आणखी कोणास त्याचा दृष्टांत पूर्ण करण्यात मदत करण्याद्वारे, आम्ही आपल्या जीवनासाठी परमेश्वराने दिलेला दृष्टांतपूर्ण करण्याची तयारी करीत असतो व त्यासाठी प्रशिक्षण प्राप्त करीत असतो.

## 3.3 परमेश्वराद्वारे देण्यात आलेला दृष्टांत आमच्या अंतःकरणातील थोड्याशा हालचालीने ओळखता येतो

स्वर्गीय दृष्टांताची ओळख आमच्या अंतःकरणात होणाऱ्या लहानशा हालचालीने ओळखता येते. मोशे व नहेम्या यांचे जीवन लक्षात घ्या.

प्रे.कृत्ये 7:23

**[23] मग तो जवळजवळ चाळीस वर्षांचा झाला तेव्हा 'आपले बांधव म्हणजे इस्त्राएलाचे संतान' ह्यांची भेट घ्यावी असे त्याच्या मनांत आले.**

नहेम्या 1:1—4

**[1] हखल्याचा पुत्र नहेम्या याचा वृत्तांतः विसाव्या वर्षी किसलेव महिन्यांत
मी शूशन राजवाड्यांत होतो, [2] तेव्हा हनानी नावाचा माझा एक बांधव
आणि इतर काही लोक यहूदांतून आले; बंदिवासातून सुटलेल्यापैकी जे
यहूदी शेष राहिले होते त्यांच्याविषयी व यरुशलेमेविषयी त्याजकडे मी
पुसतपास केला. [3] त्यांनी मला सांगितले, बंदिवासातले जे अवशिष्ट लोक त्या
प्रांतांत राहिले ते मोठ्या दुर्दशेत असून त्यांची अप्रतिष्ठा होत आहे,
यरुशलेमेचा तटहि पडला आहे, व त्याच्या वेशी आग लावून जाळून टाकिल्या
आहेत. [4] हे ऐकताच मी खाली बसून रडू लागलो आणि बरेच दिवसपर्यंत
विलाप करीत राहिलो, मी उपास करून स्वर्गीच्या देवाची प्रार्थना केली.**

नहेम्या 2:12

**[12] मी रात्रीचा उठून थोडीशी माणसे बरोबर घेतली, यरुशलेमेसंबंधाने काय करावे याविषयी माझ्या देवाने माझ्या मनात घातलेला विचार मी कोणा मनुष्यास सांगितला नाही, आणि माझ्या बसावयाच्या पाठाळाखेरीज माझ्याबरोबर दुसरे कोणतेहि जनावर नव्हते.**

## 3.4 जेव्हा आम्ही प्रयत्न करतो, तेव्हा आमच्या कैरोस श्झंपतवेश क्षणात विलंब होतो

जेव्हा आपण आपल्या योग्यतेच्या बळावर काही करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आपण त्याद्वारे आपल्या कैरोस शंपतवेश वेळेत विलंब घडवून आणतो. मोशेने सर्व काही स्वतः करण्याचा प्रयत्न केला आणि त्याला 40 वर्षे विलंब झाला!

प्रे. कृत्ये 7:29—30

**[29] हे शब्द ऐकतांच मोशे पळून गेला आणि मिद्यान देशांत उपरी झाला;'
तेथे त्याला दोन मुलगे झाले. 30 मग चाळीस वर्षे भरल्यावर सीनाय
पर्वताच्या रानांत एका झुडपांतील अग्निज्वालेत एक देवदूत त्याच्या**

**दृष्टीस पडला.'**

निर्गम 2:15,23

**[15] फारोच्या कानी ती गोष्ट गेली तेव्हा मोशेला मारून टाकण्याचे त्याने योजिले; पण मोशे फारोपुढून पळून मिद्यान देशात जाऊन पोहचला आणि तेथे एका विहिरीपाशी बसला. [23] बराच काळ लोटल्यावर मिसराचा राजा मृत्यु पावला; इकडे इस्त्राएलवंशज विकट दास्यामुळे उसासे टाकून आक्रोश करीत आणि त्या दास्यामुळे त्यांनी केलेली आरोळी वर देवापर्यंत जाऊन पोहचली.**

## 3.5 परमेश्वराद्वारे दिलेला दृष्टांत प्रत्येकास समजावा हे जरूरी नाही

प्रे. कृत्ये 7:23–25

**[23] मग तो जवळजवळ चाळीस वर्षांचा झाला तेव्हा 'आपले बांधव म्हणजे इस्त्राएलाचे संतान' ह्यांची भेट घ्यावी असे त्याच्या मनांत आले. [24] तेव्हां मोशेने त्यांतील कोणाएकावर अन्याय होत आहे असे पाहून त्या जाचलेल्या माणसाचा कैवार घेतला आणि 'मिसऱ्याला मारून' त्याचा सूड उगविला.**
**[25] तेव्हा देव त्याच्या हाताने त्याच्या बांधवांची सुटका करीत आहे हे त्यांस समजले असेल असे त्याला वाटले होते, पण ते त्यांस समजले नाही.**

गलती. 1:15–16

**[15] तरी ज्या देवाने मला 'माझ्या मातेच्या उदरांतून' जन्मल्यापासून वेगळे केले व आपल्या कृपेने 'बोलाविले,' [16] त्याला आपल्या पुत्राला माझ्या ठायी प्रगट करणे बरे वाटले, अशासाठी की, मी परराष्ट्रीयांमध्ये त्याच्या सुवार्तेची घोषणा करावी. तेव्हा मानवांची मसलत न घेता.**

## 3.6 परमेश्वराद्वारे दिल्या गेलेल्या दृष्टांताचा दुरात्मे विरोध करतील

नहेम्या 2:18–20

**[18] माझ्या देवाचा वरदहस्त मजवर आहे हे मी त्यांस सांगितले. तेव्हा ते म्हणाले, चला, आपण उठून बांधण्याच्या कामास लागू, तेव्हा त्यांनी ते**

**सत्कार्य करण्याची हिमत बांधिली. [19] हे ऐकून होरोनी सनबल्लट आणि अम्मोनी तोबीया नावाचा दास आणि गेशेम अरबी यांनी आमची निर्भर्त्सना केली; आम्हास तुच्छ लेखून ते म्हणाले, तुम्ही हे काय मांडिले आहे? राजाविरुद्ध बंड करिता काय? [20] मी त्यांस उत्तर दिले की स्वर्गीचा देव आम्हास यश देईल, म्हणून आम्ही त्याचे सेवक कमर कसून हे बांधणार, पण यरुशलेमेत तुमचा हिस्सा, हक्क किंवा यादगिरी काहीएक नाही.**

## 3.7 परमेश्वराद्वारे देण्यात आलेला दृष्टांत नेहमी व्यक्तीपेक्षा मोठा असतो

परमेश्वराद्वारे देण्यात आलेला प्रत्येक दृष्टांत व्यक्तीपेक्षा मोठा असतो. व्यक्तीने तो दृष्टांत एकट्याने पूर्ण करावा अशी परमेश्वराची योजना नाही.

नहेम्या 2:12

**[12] मी रात्रीचा उठून थोडीशी माणसे बरोबर घेतली; यरुशलेमेसंबंधाने काय करावे याविषयी माझ्या देवाने माझ्या मनात घातलेला विचार मी कोणा मनुष्यास सांगितला नाही, आणि माझ्या बसावयाच्या पाठाळाखेरीज माझ्याबरोबर दुसरे कोणतेही जनावर नव्हते.**

नहेम्या 2:17—18

**[17] मग मी त्यांस म्हणालो, आपण केवढ्या दुर्दशेत आहो हे तुम्हास दिसतच आहे, यरुशलेम उजाड झाले आहे व त्याच्या वेशी अग्नीने जळून गेल्या आहेत; तर चला, आपण यरुशलेमेचा कोट बांधू म्हणजे यापुढे आपली अप्रतिष्ठा व्हावयाची नाही. 18 माझ्या देवाचा वरदहस्त मजवर आहे हे मी त्यांस सांगितले. तेव्हा ते म्हणाले, चला, आपण उठून बांधण्याच्या कामास लागू, तेव्हा त्यांनी ते सत्कार्य करण्याची हिमत बांधिली.**

प्रेषितांच्या कृत्यांमध्ये व पत्रांमध्ये अनेक ठिकाणी आम्ही पौलाच्या सहाकाऱ्यांविषयी वाचतो. स्वतः पौलाने आपल्या सहकाऱ्यांची यादी तयार केली आहे. बर्णबा, सिलास, लूक्य, अन्द्रोनीक, जुनिया, तीमथ्य, एपफ्रास, लुशियस, जेसन, सोसिपेतर, तीत, क्लेमेंत, तुखिक, अरिस्तार्ख,

मार्कस, युस्त, फिलेमोन, अफिया, अर्खिप्प, देमास, आणखी काही "बांध व," "ह्या स्त्रियां ज्यांनी माझ्याबरोबर सुवार्तेसाठी श्रम केले" आणि "ज्यांची नांवे 'जीवनाच्या पुस्तकांत' आहेत असे माझे बाकीचे सहकारी" या लोकांचा उल्लेख पौल "सहबंदिवान," "सहकारी," "सहसैनिक," "सहकारी व सहायक" म्हणून करतो.

## 3.8 इतर लोक परमेश्वराद्वारे देण्यात आलेल्या दृष्टांतात सहभागी होऊन आपल्या जीवनाचे पाचारण शोधून काढतात व ते पूर्ण करतात

बहुतेक जण जेव्हा परमेश्वराद्वारे देण्यात आलेल्या दृष्टांतात प्रवेश करतात व त्यात सहभागी होतात तेव्हा ते आपल्या जीवनाचे पाचारण शोधून घेतात व ते पूर्ण करतात.

## 3.9 खिस्ताच्या देहास देण्यात आलेली स्वप्ने व दृष्टांत परस्पर निगडीत असतात

आम्ही ख्रिस्ताचा देह आहोत, म्हणून परमेश्वर आपल्या लोकांस जे दृष्टांत देतो ते एकमेकावर अवलंबून व परस्पर निगडीत असतात.

इफिस. 4:4

**4 तुम्हास झालेल्या पाचारणापासून निर्माण होणारी आशा जशी एकच आहे, तसे शरीरहि एकच व आत्मा एकच आहे.**

आपण देहाबाहेर अर्थात मंडळीबाहेर आपले पाचारण पूर्ण करू शकत नाही. आम्हा सर्वांस एकाच आशेसाठी पाचारण घडले आहे.

इफिस. 4:16

**16 त्याच्यापासून पुरवठा करणाऱ्या प्रत्येक सांध्याच्या योगे, सबंध शरीराची जुळवणूक व जमवाजमव होत असते, आणि प्रत्येक अंग आपआपल्या परिमाणाने कार्य करीत असता आपली रचना प्रीतीमध्ये होण्यासाठी शरीर आपली वृद्धि करून घेते.**

आमच्यापैकी प्रत्येक जण एकमेकाची गरज पुरवीत असतो, यासाठी की आम्ही सर्व मिळून एका देहाची रचना करावी.

जेव्हा आपण दुसऱ्या व्यक्तीच्या दृष्टांतात पाऊल ठेविता, आणि त्यांचा दृष्टांत पूर्ण करण्यात मदत करता – तेव्हा परिणामी आपण आपल्या जीवनासाठी देवाचा दृष्टांत पूर्ण कराल.

## 3.10 परमेश्वरास विनंती करावी की त्याने आपणास एक विशाल हृदय द्यावे

आमच्यापैकी अनेकांजवळ मोठा दृष्टांत आहे, परंतु लहानसे अंतःकरण आहे. त्यात केवळ एका व्यक्तीसाठी जागा आहे, अर्थात! 'स्व' साठी.

माझ्या अंतःकरणात केवळ माझ्यापेक्षा जास्त लोकांसाठी जागा असली पाहिजे.

मोठ्या दृष्टांतासाठी मोठ्या अंतःकरणाची गरज आहे.


आमच्याजवळ असे अंतःकरण असले पाहिजे ज्यात त्या प्रत्येकासाठी जागा असली पाहिजे ज्यास परमेश्वराने त्या दृष्टांताचा भागी होण्यासाठी घडविले आहे जो दृष्टांत त्याने आम्हास दिला आहे.

## उपसंहार

पपरमेश्वराची वाणी ऐकण्यासाठी आपले स्थान ग्रहण करा!

हबक्कूक 2:1

**1 मी आपल्या पहाऱ्यावर उभा राहीन, किल्ल्यावर पहारा करीन; तो मजबरोबर काय बोलेल आणि माझ्या गाऱ्हाण्याविषयी त्यास मला काय उत्तर देता येईल ते मी पाहीन.**




# राज्याची स्थापना करणारे

# 4
# आत्म्याच्या मदतीने लोकांची उभारणी

## 4.1 राज्याची स्थापना लोकांच्या उभारणी (प्रगती) करण्याशी संबंधित आहे

1 करिंथ. 9:1

**9 कारण आम्ही देवाचे सहकारी आहो; तुम्ही देवाचे शेत, देवाची इमारत असे आहा.**

1 कुरिन्थियों 9:1

**1 मी स्वतंत्र नाही काय? मी प्रेषित नाही काय? आपल्या प्रभु येशूला मी पाहिलेले नाही काय? प्रभूमध्ये तुम्ही माझे काम नाही काय?**

1 पेत्र 2:5

**5 तुम्हीहि स्वतः जिवंत धोंड्यासारिखे आध्यात्मिक मंदिर असे रचिले जात आहा; ह्यासाठी की, येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाला आवडणारे आध्यात्मिक यज्ञ अर्पिण्यासाठी तुम्ही पवित्र याजकगण व्हावे.**

"जिवंत धोंड्यांसोबत" काम करणे "मृत धोंड्यांसोबत" काम करण्यापासून वेगळे आहे.

## 4.2 राज्याची स्थापना करणाऱ्यांच्या अंतःकरणात लोक असले पाहिजेत

2 करिंथ. 7:3

**3 दोषी ठरविण्यासाठी मी हे म्हणत आहे असे नाही; कारण मी पूर्वीच सांगितले आहे की, तुम्हाला आमच्या अंतःकरणांत असे स्थान आहे की आम्ही मरणार तुम्हाबरोबर व जगणारहि तुम्हाबरोबर.**

1 थेस्सल. 2:19–20

**[19] कारण आमची आशा किंवा आमचा आनंद किंवा आमचा अभिमानाचा मुगूट काय आहे? आपला प्रभु येशू ह्याच्या आगमनसमयी त्याच्यासमोर तुम्हीच आहा ना? 20 कारण तुम्ही आमचे गौरव व आमचा आनंद आहा.**

2 करिंथ. 3:1–3

**[1] आम्ही पुन्हा आपली वाखाणणी करू लागलो आहो काय? अथवा जशी कित्येकांस लागतात तशी आम्हाला तुम्हासाठी किंवा तुमच्यापासून शिफारसपत्रे पाहिजेत काय? [2] तुम्हीच आमचे पत्र, आमच्या अंतःकरणांवर लिहिलेले, सर्व माणसांना कळलेले व त्यांनी वाचलेले, असे आहा;**
**[3] शाईने नव्हे, तर सदाजीवी देवाच्या आत्म्याने 'कोरलेले, दगडी पाट्यांवर' नव्हे, तर 'मांसमय अंतःकरणरूपी पाट्यांवर' कोरलेले. आमच्या सेवेच्या योगे तयार झालेले ख्रिस्ताचे पत्र, असे तुम्ही प्रसिद्ध आहा.**

जेव्हा परमेश्वर आम्हास परवानगी देतो की आम्ही लोकांस आपल्या अंतःकरणरूपी पाट्यांवर 'लिहावे', तेव्हा तो आम्हास त्यांच्या अंतःकरणात लिहिण्याची पात्रता देतो. यावाचून इतर सर्व प्रकारची सेवा केवळ एक बाह्य स्वरूप आहे ज्यात जीवन परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य नाही.

## 4.3 आम्ही आत्म्याच्या मदतीने लोकांची उभारणी (प्रगती) करतो.

2 करिंथ. 3:1–3

**[1] आम्ही पुन्हा आपली वाखाणणी करू लागलो आहो काय? अथवा जशी कित्येकांस लागतात तशी आम्हाला तुम्हासाठी किंवा तुमच्यापासून शिफारसपत्रे पाहिजेत काय? [2] तुम्हीच आमचे पत्र, आमच्या अंतःकरणांवर लिहिलेले, सर्व माणसांना कळलेले व त्यांनी वाचलेले, असे आहा;**
**[3] शाईने नव्हे, तर सदाजीवी देवाच्या आत्म्याने 'कोरलेले, दगडी पाट्यांवर' नव्हे, तर 'मांसमय अंतःकरणरूपी पाट्यांवर' कोरलेले. आमच्या सेवेच्या योगे तयार झालेले ख्रिस्ताचे पत्र, असे तुम्ही प्रसिद्ध आहा.**

योहान 6:63

**[63] आत्मा हा जिवंत करणारा आहे, देहापासून काही लाभ नाही; मी जी वचने तुम्हास सांगितली आहेत ती आत्मा व जीवन अशी आहेत.**

## 4.4 परमेश्वर अपरिपक्व लोकांस परिपूर्ण करण्यासाठी अपरिपूर्ण लोकांचा उपयोग करतो

नीतिसूत्रे 27:17

**[17] तिखे तिख्याला पाणीदार करिते, तसा मनुष्य आपल्या मित्राचा चेहरा पाणीदार करितो.**

केवळ यासाठी की परमेश्वर आणखी कोणास परिपूर्ण बनविण्यासाठी माझा उपयोग करतो, याचा अर्थ हा नाही की मी सिद्ध अथवा परिपूर्ण आहे!

## 4.5 आत्म्याच्या मदतीने लोकांची उभारणी करण्याची किल्ली

### 4.5.1 व्यक्तीप्रीत्यर्थ परमेश्वराचा हेतू ओळखणे

- परमेश्वर व्यक्तीस जे बनवू इच्छित नाही, ते बनविण्याद्वारे परमेश्वराच्या योजनेचा व हेतूचा आपण विरोध करता कामा नये.
- परमेश्वराद्वारे नेमलेले त्यांचे स्थान ओळखा.

1 करिंथ. 12:18

**[18] तर देवाने आपल्या इच्छेप्रमाणे शरीरामध्ये प्रत्येक अवयव लावून ठेविला आहे.**

- परमेश्वराद्वारे नेमलेले त्यांचे कार्य काय आहे ते ओळखा.

**रोम. 12:4–6**

**[4] कारण जसे आपणांला एक शरीर असून त्यांत पुष्कळ अवयव आहेत,**
**तरी त्या सर्व अवयवांचे कार्य एकच नाही. [5] तसे आपण पुष्कळ जण असून**

**ख्रिस्तामध्ये एक शरीर आणि प्रत्येक जण एकमेकांचे अवयव असे आहो. [6] आपल्याला प्राप्त झालेल्या कृपादानांप्रमाणे आपल्याला निरनिराळीं कृपादाने आहेत, म्हणून ईश्वरी संदेश सांगावयाचा असल्यास आपण तो आपल्या विश्वासाच्या प्रमाणाने सांगावा.**

आपल्यावर एक फार मोठी जबाबदारी आहे — परमेश्वराद्वारे ठरविलेला हेतू अथवा उद्दिष्ट्य ओळखण्याप्रीत्यर्थ व तो हेतू पूर्ण करण्याप्रीत्यर्थ पुढे वाटचाल करण्यात लोकांची मदत करणे. ह्या बाबतीत आपणास परमेश्वराच्या आत्म्याच्या मार्गदर्शनाप्रत अत्यंत संवेदनशील असले पाहिजे.

येशूच्या आत्म्याच्या मदतीने लोकांस ओळखता येते.

*(अ) पेत्राबाबत*

योहान 1:41—42

**[41] त्याला त्याचा सख्खा भाऊ शिमोन पहिल्याने भेटला. तेव्हा तो त्याला म्हणाला, मशीहा (म्हणजे ख्रिस्त) आम्हास सांपडला आहे. 42 त्याने त्याला येशूकडे आणिले; येशूने त्याच्याकडे न्याहाळून पाहून म्हटले, तू योहानाचा मुलगा शिमोन आहेस; तुला केफा (म्हणजे पेत्र किंवा खडक) म्हणतील.**

*(ब) नथनेलाबाबत*

योहान 1:47

**[47] नथनेलाला आपणाकडे येतांना पाहून येशू त्याच्याविषयी म्हणाला, पाहा, हा खराखुरा इस्राएली आहे, ह्याच्याठायी कपट नाही!**

आत्म्याद्वारे आम्ही व्यक्तीचे भविष्य पाहू व समजू शकतो, त्यासाठी त्यांस प्रशिक्षण देतो आणि योग्य वेळी त्यांस भविष्यात कार्य करण्यासाठी मोकळे करतो.

### 4.5.2 दैवी क्षमता मुक्त करण्यासाठी लोकांस स्थानापन्न करणे

लोकांस त्यांच्या पदावर – जागेवर स्थानापन्न करण्याची गरज आहे – समयानुसार, परमेश्वराद्वारे त्यांच्या नेमलेल्या स्थानी त्यांस स्थिर करावयाचे आहे जेणेकरून परमेश्वर त्यांस जे बनवू इच्छितो, त्यात त्यांची वाढ व्हावी

*(अ) मोशे व यहोशवाबाबत*

अनुवाद 1:38

**38 पण तुझ्या सेवेस हजर राहणारा नूनाचा मुलगा यहोशवा ह्याचा होईल. तू त्याला धीर दे, कारण तो देश इस्त्राएलास वचन म्हणून तो मिळवून देईल.**

अनुवाद 3:28

**28 आणि यहोशवाला अधिकारारूढ कर व त्याला धीर देऊन दृढ कर कारण तोच ह्या लोकांचा पुढारी होऊन त्यांना पलीकडे नेईल आणि जो देश तुझ्या दृष्टीस पडेल तो त्यांना वतन म्हणून मिळवून देईल.**

*(ब) बर्णबा आणि शौलाबाबत*

प्रे. कृत्ये 11:25–26

**25 नंतर तो शौलाचा शोध करावयाला तार्सास गेला. 26 त्याचा शोध लागल्यावर त्याने त्याला अंत्युखियास आणिले. मग असे झाले की, त्यांनी तेथे वर्षभर मंडळीमध्ये मिळूनमिसळून बऱ्याच लोकांस शिकविले; आणि शिष्यांस ख्रिस्ती हे नांव पहिल्याने अंत्युखियांत मिळाले.**

*(क) पौल, बर्णबा आणि योहान मार्क*

कधी कधी आपण एखाद्या व्यक्तीमध्ये परमेश्वराची समर्थता न ओळखण्याची चूक करू शकतो, जसे की पौलाने सुरूवातीला योहान मार्कच्या संबंधाने केली होती, आणि नंतर त्याला आपले मत बदलावे लागले.

प्रे. कृत्ये 13:13

**13 मग पौल व त्याच्या सोबतीचे लोक पफेहून तारवांतून पंफुल्यांतील पिर्गा येथे गेले, आणि योहान त्यांना सोडून यरूशलेमेस परत गेला.**

प्रे. कृत्ये 15:36—41

**36 मग काही दिवसांनंतर पौलाने बर्णबाला म्हटले, ज्या ज्या नगरांत
आपण प्रभूच्या वचनाची घोषणा केली तेथे पुन्हा जाऊन बंधुजनांना भेटून
ते कसे आहेत हे पाहू या. 37 बर्णबाची इच्छा होती की, ज्याला मार्कहि
म्हणत त्या योहानाला बरोबर घ्यावे; 38 परंतु पौलाला वाटले की,
पंफुल्याहून जो आपणांला सोडून गेला होता व आपल्या बरोबर काम
करावयास आला नाही त्याला सोबतींस घेणे योग्य नाही. 39 ह्यावरून
त्यांच्यामध्ये तीव्र मतभेद उपस्थित होऊन ते एकमेकांपासून वेगळे झाले
आणि बर्णबा मार्काला घेऊन तारवांत बसून कुप्रास गेला; 40 पौलाने
सीलाला निवडून घेतले आणि बंधुजनांनी त्याला प्रभूच्या कृपेवर सोंपविल्यावर
तो तेथून निघाला, 41 आणि मंडळ्यांना स्थैर्य देत देत सूरिया व
किलिकिया ह्यांमधून गेला.**

कलस्सै. 4:10

**10 माझ्या सोबतीचा बंदिवान् अरिस्तार्ख तुम्हाला सलाम सांगतो, आणि बर्णबाचा भाऊबंद मार्क हाहि तुम्हाला सलाम सांगतो (त्याच्याविषयीं तुम्हांस आज्ञा मिळाल्या आहेत; तो तुम्हांकडे आला तर त्याचा स्वीकार करा).**

2 तीमथ्य. 4:11

**11 लूक मात्र माझ्याजवळ आहे. मार्काला आपल्याबरोबर घेऊन ये, कारण तो सेवेसाठी मला उपयोगी आहे.**

### 4.5.3 त्यांची कृपादाने ओळखणे व त्यांस उत्तेजन देणे

लोकांस त्यांच्या कृपादानासंबंधाने उत्तेजन देण्याची गरज आहे.

लोकांस अशा ठिकाणी जाण्यापासून रोखावयाचे आहे जे त्यांच्या कृपादानाचे क्षेत्र नाही. मनुष्य या नात्याने आमची स्वाभाविक प्रवृत्ती ही असते की जे इतरांजवळ आहे, ते आम्हासही हवे. (दुरून डोंगर साजरे!)

1 तीमथ्य. 4:14

**14 तुझ्यावर वडीलवर्ग हात ठेवण्याच्या वेळेस संदेशाच्या द्वारें दिलेले असे जे कृपादान तुझ्यामध्ये आहे त्याकडे दुर्लक्ष करू नको.**

2 तीमथ्य. 1:6,7

**6 ह्या कारणास्तव मी तुला आठवण देतो की, देवाचे जे कृपादान माझे हात तुझ्यावर ठेविल्यामुळे तुझ्या ठायी आहे, ते प्रज्ज्वलित कर. 7 कारण देवाने आपल्याला भित्रेपणाचा नव्हे, तर सामर्थ्याचा, प्रीतीचा व संयमनाचा आत्मा दिला आहे.**

### 4.5.4 आपल्या उदाहरणाद्वारे मार्गदर्शन करणे

फिलिप्पै. 4:9

**9 माझ्यापासून जे तुम्ही शिकला, जे स्वीकारिले, व माझे जे ऐकले पाहिले ते आचरीत राहा; म्हणजे शांतिदाता देव तुमच्याबरोबर राहील.**

1 करिंथ. 4:16

**16 ह्यास्तव मी तुम्हास विनंती करितो की, तुम्ही माझे अनुकरण करणारे व्हा.**

1 करिंथ. 11:1

**2 जसा मी ख्रिस्ताचे अनुकरण करणारा आहे, तसे तुम्हीहि माझे अनुकरण करणारे व्हा.**

आपण आपले जीवन कशाप्रकारे घालविले आहे, तोच आपल्या प्रचाराचा सर्वात मोठा संदेश असेल.

मत्तय 5:19

**19 ह्यास्तव जो कोणी ह्या लहान आज्ञांतील एखादी रद्द करील व त्याप्रमाणें लोकांना शिकवील त्याला स्वर्गाच्या राज्यांत अगदी लहान म्हणतील; पण जो कोणी त्या पाळील व शिकवील त्याला स्वर्गाच्या राज्यांत मोठा म्हणतील.**

एखादी गोष्ट शिकविण्यापूर्वी स्वतःच्या जीवनात तिचे पालन करावे.

मत्तय 15:14

**14 त्यांना असू द्या; ते आंधळ्याचे आंधळे वाटाड्ये आहेत आणि आंधळा आंधळ्याला नेऊ लागला तर दोघेहि खाचेंत पडतील.**

जे प्रकाशन आपण प्राप्त केले नाही, त्यात आपण लोकांचे मार्गदर्शन करू शकत नाही. जर आपण असे करण्याचा प्रयत्न कराल, तर जणू एक आंधळा दुसऱ्या आंधळ्यास मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे असे होईल. आणि दोघेही खळग्यात पडतील.

जे आपल्याजवळ नाही, ते आपण इतरांस देऊ शकत नाही.

जेथे आपण गेला नाही, तेथे आपण इतरांस नेऊ शकत नाही.

जर आपण स्वतः ख्रिस्ताठायी परिपूर्ण नसाल, तर आपण लोकांस ख्रिस्ताच्या समानतेत परिपूर्ण करू शकत नाही.

ज्या बाबतीत आपण स्वतः बंधनात आहा, त्यात आपण लोकांस स्वातंत्र्य देऊ शकत नाही.

### 4.5.5 असुरक्षिततेच्या भावनेपासून दूर राहा

लोकांशी व्यवहार करीत असतांना पुढाऱ्यांना जीवनात ज्या सर्वात मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागते, त्याचे कारण म्हणजे असुरक्षिततेची भावना आहे.

ज्या पुढाऱ्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना असते, ते इतरांचा हेवा धरतात, त्यांस नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात, लोकांच्या जीवनात आवश्यकतेपेक्षा अधिक सहभागी होतात, आवश्यकतेपेक्षा अधिक अधिकार गाजविणारे/हुकूमशाही प्रवृत्तीचे बनतात. ह्या चुकांपासून स्वतःचा बचाव करा.

*(अ) ईर्ष्या बाळगू नका*

शौल व दाविदाचे उदाहरणः

1 शमुवेल 18:6—11

**6 त्या पलिष्ट्याच्या वध करून दावीद परतल्यावर लोक माघारी येत
असता इस्त्राएलाच्या सर्व नगरांतून स्त्रिया बाहेर निघाल्या आणि डफ व
झांजा वाजवून मोठ्या आनंदाने गात व नाचत शौल राजास सामोऱ्या
आल्या. 7 नृत्य करणाऱ्या स्त्रिया आळीपाळीने येणेप्रमाणे म्हणत, शौलाने
हजारो वधिले, दाविदाने लाखो वधिले. 8 हे ऐकून शौलास फार क्रोध
आला; हे त्यांचे शब्द त्यास आवडले नाहीत, तो म्हणाला त्यांनी दाविदास
लाखांचे यश दिले व मला केवळ हजारांचे यश दिले, राज्य तेवढे खेरीज
करून त्याला अधिक मिळावयाचे ते काय राहिले? 9 त्या दिवसापासून पुढे
शौलाने दाविदावर डोळा ठेविला. 10 दुसऱ्या दिवशी शौलाच्या ठायी
देवाकडील दुरात्मा जोराने संचरला, व तो आपल्या मंदिरात बडबडू
लागला; दावीद आपल्या नित्यक्रमाप्रमाणे वीणा वाजवीत होता; आणि
शौलाच्या हाती भाला होता. 11 शौलाने त्याला मारावयास भाला उगारिला;
तो म्हणाला की भाला मारून दाविदाला भितीशी खिळावे; पण दावीद
दोनदा त्याच्यासमोरून एकीकडे सरून बचावला.**

1 योहान 4:20—21

**20 मी देवावर प्रीति करितो; असे म्हणून जर कोणी आपल्या बंधूचा द्वेष
करील तर तो लबाड आहे; कारण डोळ्यांपुढे असलेल्या आपल्या बंधूवर
जो प्रीति करीत नाही त्याला न पाहिलेल्या देवावर प्रीति करिता येणे
शक्य नाही. 21 जो देवावर प्रीति करितो त्याने आपल्या बंधूवरहि प्रीति
करावी, ही त्याची आपल्याला आज्ञा आहे.**

शुद्ध अंतःकरण असे अंतःकरण असते जे केवळ परमेश्वराप्रत नव्हे, तर लोकांप्रतही योग्य असते.

*(ब) अति सुरक्षा देऊ नका/नियंत्रण राखणारे बनू नका*

2 करिंथ. 11:1–4

**[1] माझा थोडासा मूढपणा तुम्ही सहन केला तर बरे; आणि ते तुम्ही करीतच आहा. [2] कारण तुम्हाविषयींची माझी आस्था ईश्वरप्रेरित आस्था आहे; मी एका पतीबरोबर तुमचे वाग्दान केले आहे, अशा हेतूने की, तुम्हाला शुद्ध कुमारी असे ख्रिस्ताला सादर करावे. [3] तरी 'सापाने कपट करून' हव्वेला 'ठकविले' तसे तुमची मने कशाने तरी बिघडून ती ख्रिस्ताविषयींचे सरळपण व शुद्धता ह्यांपासून भ्रष्ट होतील असे मला भय आहे. [4] कारण जर कोणी येऊन ज्याची आम्ही घोषणा केली नाही अशा अन्य येशूची घोषणा करितो, किंवा तुम्हास मिळाला नाही असा दुसरा आत्मा जर तुम्ही घेता, अथवा तुम्हीं स्वीकारिली नाही अशी दुसरी सुवार्ता जर स्वीकारिता, तर ह्यांत तुमची कितीतरी सहनशीलता आहे.**

2 करिंथ. 1:24

**[24] आम्ही तुमच्या विश्वासावर सत्ता गाजवितो असे नाही, तर तुमच्या आनंदात साहाय्यकारी आहो; तुमची स्थिति आहे ती विश्वासाने आहे.**

"दैवी ईर्ष्येने लोकांबाबत ईर्ष्यावान होणे" समतोलपणाचे लक्षण आहे. हे स्वस्थतेचे लक्षण आहे. आम्ही त्यांच्या विश्वासाबाबत व परमेश्वरासोबत त्यांच्या वाटचालीसंबंधाने प्रभुत्व न करणे शिकले पाहिजे.

*(क) दुसऱ्यांच्या जीवनात गरजेपेक्षा जास्त सहभागी होता कामा नये*

लोकांस काय योग्य आहे व काय चूक आहे ते शिकवावे व त्यांस स्वतःचा निर्णय घेऊ द्यावा. त्यांच्यासाठी आपण निर्णय घेता कामा नये, नाहीतर त्यांस प्रगती करता येणार नाही व ते स्वतः निर्णय घेण्यास कधीही शिकू शकणार नाहीत.

लंगड्याची कुबडी बनू नका ज्याच्या आधाराने ते चालतात. लोकांस आपल्या पावलांवर उभे राहणे शिकवा. त्यांना आपल्या मदतीवाचून जीवन जगण्यायोग्य बनावयाचे आहे, स्वतःस शिस्त लावावयाची आहे आणि सर्व बाबतीत आपल्या मदतीवाचून कार्य करावयास शिकावयाचे आहे!

*(ड) गरजेपेक्षा अधिकार गाजवू नका*

1 पेत्र 5:1—4

**[1] तुम्हांतील वडिलांना, जो मी सोबतीचा वडील, ख्रिस्ताच्या दुःखांचा साक्षी व प्रगट होणाऱ्या गौरवाचा वांटेकरी तो मी असा बोध करितोः 2 तुम्हांमधील देवाच्या कळपाचे पालन करा; करावे लागते म्हणून नव्हे, तर देवाच्या इच्छेप्रमाणे संतोषाने त्याची देखरेख करा; द्रव्यलोभाने नव्हे तर उत्सुकतेने करा; 3 तुमच्या हाती सोपविलेल्या लोकांवर धनीपण करणारे असे नव्हे, तर कळपाला कित्ते व्हा; 4 मग जेव्हा मुख्य मेंढपाळ प्रगट होईल तेव्हा तुम्हास गौरवाचा व न कोमेजणारा हार प्राप्त होईल.**

1 करिंथ. 9:18

**[18] तर मग माझे वेतन काय? ते हेच की, मी सुवार्ता फुकट सांगावी, अशा हेतूने की, मी सुवार्तेविषयींचा आपला हक्क पूर्णपणे बजावू नये.**

2 करिंथ. 10:8

**[8] आमचा तो अधिकार प्रभूने तुमच्या नाशासाठी नव्हे तर उन्नतीसाठी आम्हास दिला, त्याविषयी मी काहीशी विशेष प्रौढी मिरविली तरी मला संकोच वाटणार नाही.**

2 करिंथ. 12:18—19

**[18] मी तीतास विनंती केली, व त्याच्याबरोबर एका बंधूला पाठविले. तीताने तुमचा गैरफायदा घेतला काय? आम्ही एकाच आत्म्याने, सारख्याच चालीने चाललो नाही काय? [19] तुमच्याशी आम्ही प्रतिवाद करीत आहो**

**असे इतका वेळ तुम्हाला वाटले असेल; पण आम्ही देवासमक्ष ख्रिस्ताच्या ठायी बोलत आहो. प्रियजनहो, हे सर्व तुमच्या उन्नतीसाठी आहे.**

*(इ) भावनात्मक जवळीक टाळा (सोलिश अटॅचमेंट)*

ज्या लोकांस आपण प्रभूमध्ये पुढे वाढवितो, त्यांच्याशी कधी कधी भावनात्मकरित्या जवळीक उत्पन्न होते. आणि जेव्हा त्यांना सेवेसाठी मोकळे करण्याची वेळ येते, तेव्हा भावनात्मक निकटतेमुळे आम्ही त्यांस जाऊ देऊ इच्छित नाही. ही धोक्याची बाब आहे.

**1 शमुवेल 18:1 यात सांगितले आहे की दाविद योनातान यांच्यात विशेष मैत्री होती, तरीही जेव्हा दाविदास पाठवून देण्याची वेळ आली, तेव्हा योनातानाने त्यास जाऊ दिले (1 शमुवेल 20:13).**

### 4.5.6 गरज भासल्यास ताडन करा (सुधारणा)

1 करिंथ. 4:21

**21 तुमची काय इच्छा आहे? मी तुम्हाकडे काठी घेऊन यावे किंवा प्रीतीने व सौम्यतेच्या आत्म्याने यावे?**

2 करिंथ. 7:11—12

**11 कारण पाहा, तुमचे हे दुःख दैवी होते; ह्या एकाच गोष्टीने तुम्हामध्ये केवढी कळकळ, केवढे दोषनिवारण, केवढा संताप, केवढे भय, केवढी उत्कंठा, केवढी आस्था, केवढी शिक्षा करण्याची बुद्धि, उत्पन्न झाली! ह्या बाबतीत तुम्ही सर्व प्रकारे निर्दोष आहा ह्याचे प्रमाण तुम्ही पटवून दिले.**
**12 तथापि मी तुम्हाला लिहिले ते ज्याने अन्याय केला त्याच्यामुळे नव्हे, आणि ज्यावर अन्याय झाला त्याच्यामुळेहि नव्हे, तर आम्हाविषयी तुम्ही दाखवीत असलेल्या कळकळीची जाणीव तुम्हास देवासमक्ष व्हावी म्हणून लिहिले.**

2 करिंथ. 13:10

**10 ह्यामुळे मी जवळ नसतांना हे लिहितो, ते अशासाठी की, जो अधिकार प्रभूने पाडण्यासाठी नव्हे तर उभारण्यासाठी मला दिला, त्या अधिकाराप्रमाणे जवळ आल्यावर मी कडकपणाने वागू नये.**

बहुतेकदा आम्ही परिस्थितीस तोंड देऊ इच्छित नाही कारण नातेसंबंधास दुःख पोहोचविण्याच्या शक्यतेचा धोका आम्ही पत्करू इच्छित नाही.

नीतिसूत्रे 27:6

**6 मित्राने केलेले घाय खऱ्या प्रेमाचे आहेत, पण बैरी चुंबनांची गर्दी उडवितो.**

प्रेमाने सुधारणा करता यावी यासाठी आंतरिक बळ असले पाहिजे. व्यक्तीच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याद्वारे आपण त्यांचे नुकसान न करता, त्याचे कल्याण करीत आहोत हे समजून घ्या. चुकांकडे कानाडोळा करण्याचा आपला निर्धार अशी समस्या बनू शकतो जो त्या व्यक्तीचा नाश घडवून आणू शकतो अथवा आपल्यासाठी समस्या बनू शकतो.

जेव्हा आपण सुधारणा घडवून आणणारी गोष्ट बोलून दाखविता, तेव्हा त्या व्यक्तीस परमेश्वराप्रत त्याची प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य द्यावे. ज्याने आपला सल्ला मान्य केला नाही, त्याला होणाऱ्या यातनेसाठी आपण जबाबदार नाही.

नीतिसूत्रे 17:9

**9 जो इतरांच्या अपराधावर झाकण घालितो तो प्रेमाची वृद्धि करितो; पण जो गत गोष्टी घोकीत बसतो त्याला मित्र अंतरतात.**

लक्षात ठेवा, सुधारणा घडवून आणण्यास आवश्यक ते बोलल्यानंतर त्या व्यक्तीच्या चुकांविषयी वारंवार चर्चा करू नका.

सुधारणा घडवून आणण्याचे कार्य, त्या व्यक्तीच्या प्रगतीसाठी असले पाहिजे, त्याचा नाश करण्यासाठी नव्हे.

*(अ) सौम्यपणे सुधारणा करा*

प्रेमाने सुधारणा घडवून आणणे नेहमीच सोपे नसते कारण त्यात सर्व प्रकारच्या भावना सामावलेल्या असतात (बैचेन होणे, क्रोधित होणे, व्याकूळ होणे इत्यादी). परंतु आम्हास पवित्र आत्म्यास ही परवानगी दिली पाहिजे की त्याने कठीण परिस्थितीत सौम्यतेने, दयाळूपणाने व चागुंलपणाने कार्य करण्यात आमची मदत करावी.

गलती. 5:22

**22 आत्म्याच्याद्वारे निष्पन्न होणारे फळ, प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा.**

2 करिंथ. 6:6

**6 तसेच शुद्धतेने, ज्ञानाने, सहनशीलतेने ममतेने; पवित्र आत्म्याने निष्कपट प्रीतीने.**

1 थेस्सल. 2:7

**7 तर आपल्या मुलांबाळांचे लालनपालन करणाऱ्या दाईसारखे आम्ही तुम्हामध्ये सौम्य वृत्तीचे होतो.**

2 तीमथ्य. 2:24

**24 प्रभूच्या दासाने भांडू नये, तर त्याने सर्वांबरोबर सौम्य, शिकविण्यांत निपुण, सहनशील.**

याकोब 3:17

**17 वरून येणारे ज्ञान हे मुळांत शुद्ध असते; शिवाय ते शांतिप्रिय, सौम्य, समजून होण्याजोगे, दया व सत्फले ह्यांनी पूर्ण, अपक्षपाती, निर्दंभ असे आहे.**

स्तोत्र 18:35

**35 तू मला आपली तारणरूपी ढाल दिली आहे, आपल्या उजव्या हाताने मला उचलून धरिले आहे; तुझ्या लीनतेमुळे मला थोरवी प्राप्त झाली आहे.**

*(ब) आज्ञा देणे विरुद्ध विनंती करणे*

विनंती करणे

पत्रात अशी चोवीस वचने आहेत जेथे पौल व इतर सेवक काही विशिष्ट आज्ञांचे पालन करण्याची आपल्या पाठकांस विनंती करतात : रोम. 12:1; रोम. 15:30; रोम. 16:17; 1 करिंथ. 1:10; 1 करिंथ. 4:16; 1 करिंथ. 16:15; 2 करिंथ. 2:8; 2 करिंथ. 6:1; 2 करिंथ. 10:1,2, गलती. 4:12; इफिस. 4:1; फिलिप्पै. 4:2; 1 थेस्सल. 4:1; 1 थेस्सल. 4:10; 1 थेस्सल. 5:12; 2 थेस्सल. 2:1; फिलमोन. 1:9,10; इब्री. 13:19,22; 1 पेत्र 2:11; 2 योहान 1:5.

विनंती (ग्रीक) पॅराकेलियो चंतांसमव

- जवळ बोलविणे, आमंत्रण देणे, आव्हान करणे,
  उत्तेजन देणे, अनुनय विनय करणे, प्रार्थना करणे.

  (ग्रीक) एरोटाओ मतवजंव

- प्रश्न करणे, विनंती करणे, विचारणे, विनवणी करणे,
  इच्छा बाळगणे, अनुनय विनय करणे, प्रार्थना करणे.

  काही उदाहरणे:

रोम. 16:17

**17 आता बंधुजनहो, मी तुम्हाला विनंती करितो की, तुम्हाला जे शिक्षण मिळाले आहे त्याविरुद्ध जे फुटी व अडथळे घडवून आणीत आहेत त्यांच्यावर लक्ष ठेवा आणि त्यांच्यापासून दूर व्हा.**

फिलिप्पै. 4:2

**[2] मी युवदीयेला विनंती करितो व सुंतुखेला विनंती करितो की, तुम्ही प्रभूच्या ठायी एकचित्त व्हा.**

फिलमोन. 1:9,10

**[9] तरी प्रीतीस्तव विनंती करून सांगणे मला बरे वाटते. मी वृद्ध झालेला पौल, आणि आता ख्रिस्त येशूचा बंदिवान्, [10] मी बंधनांत असता ज्याला आध्यात्मिक जन्म दिला ते माझे लेंकरू अनेसिम ह्याच्याविषयी तुला विनंती करतो.**

### आज्ञाः

परमेश्वराचा सेवक या नात्याने अशी वेळ येईल जेव्हा आपणास लोकांस 'आज्ञा द्यावी लागेल व त्यांस शिकवावे लागेल.'

1 तीमथ्य. 4:11

**[11] ह्या गोष्टी आज्ञारूपाने सांगून शिकीव.**

## आज्ञा देणे (ग्रीक) पॅरागेलो चंतंहहमससव

- संदेश पोहोचविणे, अर्थात हुकूम करणे, आज्ञा देणे, आदेश देणे.

परंतु पौल लोकांस 'विनंती' करण्याच्या तुलनेत (वीसदा) 'आज्ञा' देण्याचा (चारदा) उपयोग फार कमी करतो. यावरून आम्हास कळून येते की शिकविणे, मार्गदर्शन करणे आणि सुधारणा घडवून आणणे लोकांस मोठ्या सौम्यतेने 'विनंती' करण्याद्वारे केले जाते. आपण त्यांस क्वचितच 'आज्ञा' देता.

1 करिंथ. 7:10

**[10] परंतु ज्यांनी लग्न केले आहे त्यांना मी आज्ञा करितो, मी नव्हे तर प्रभु करितो की, पत्नीने पतीपासून वेगळे होऊ नये.**

2 थेस्सल. 3:4,6,12

**4 तुम्हाविषयी प्रभूमध्ये आमचा असा भरंवसा आहे की, आम्ही तुम्हास जे
सांगतो ते तुम्ही करीत असता व पुढेहि करीत असाल. 6 बंधुजनहो,
आम्ही आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या नांवाने तुम्हास आज्ञा करितो की, अव्यवस्थितपणे वागणाऱ्या व आम्हापासून प्राप्त झालेल्या संप्रदायांप्रमाणे न चालणाऱ्या प्रत्येक बंधूंपासून तुम्ही दूर व्हावे. 12 अशा लोकांना आम्ही
प्रभु येशू ख्रिस्ताच्या नांवाने आज्ञा व बोध करितो की, त्यांनी स्वस्थपणे काम करून स्वतःचेच अन्न खावे.**

*(क) अपरिपक्व प्रतिक्रिया सांभाळणे*

विशेषतः जेव्हा आपण सुधारणा घडवून आणता, तेव्हा काही लोक सहजपणे त्याचा स्वीकार करतात. पण काही लोक सकारात्मकरित्या त्याचा स्वीकार करणार नाहीत. ते नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करतील. ज्या लोकांवर आपण प्रीती करता त्यांच्यातर्फे, आत्म्याच्या मदतीने आपण ज्यांची उभारणी करीत आहात त्यांच्यातर्फे, नकारात्मक प्रतिक्रिया प्राप्त करणे, परमेश्वराचा दास या नात्याने आपल्या जीवनातील सर्वात दुखद क्षण असू शकतात. आपण त्यांच्यासाठी सर्व प्रकारचा प्रयत्न करीत आहात, त्यांचे भविष्य आपल्या अंतःकरणात केंद्रस्थानी आहे, तरीही आपण त्यांच्या जीवनात जी सुधारणा घडवून आणली, त्या दुःखामुळे ते नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत.

येथे काही नकारात्मक प्रतिक्रिया दिलेल्या आहेतः

*(अ) तक्रार करणे* – ज्या व्यक्तीची चूक दुरूस्त करण्यात आली आहे, त्याला अचानक जग वेगळे दिसू लागते. जे पूर्वी अद्‌भुत आणि सुंदर होते, ते अचानक अरण्य अथवा वाळवंट दिसू लागते. तो इसम प्रत्येक लहानसहान गोष्टीविषयी तक्रार करू लागतो. भूतकाळातील गोष्टी डोकी वर काढू लागतात आणि लहानशी गोष्ट मोठी होते. त्यांना असे वाटते की जे काही आपण करीत आहात, ते त्यांना तुच्छ लेखण्यासाठी, त्यांच्यावर आळा घालण्यासाठी, त्यांस नियंत्रित करण्यासाठी अथवा

त्यांचे मन दुखविण्यासाठी करीत आहात. *(ब) माघार घेणे* – ज्या व्यक्तीमध्ये आपण सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहात, तो माघार घेतो, वेगळा होतो, अथवा लपून जातो. आता आपल्या बोलचालीत, व्यवहारात ते स्वातंत्र्य नसते. आपणास त्या व्यक्तीजवळ मोठ्या सावधपणे चालावे लागते. आपल्या मनात नेहमी ही भीती असते की आपण त्याचे मन तर दुखविणार नाही. ते आपल्यातर्फे आध यात्मिकरित्या काहीही प्राप्त करण्यास तयार नसतात.

*(क) सूड उगवणे* – व्यक्ती आपल्या समस्या, आपल्या निराशा व असंतोषासाठी आपणास दोषी ठरवितो. अचानक आपल्याबाबत जो मान व आदराची भावना त्याच्याठायी होती, ती भूतकाळाची बाब बनून राहते.

मत्तय 13:57

**57 असे ते त्याच्याविषयी अडखळले. येशूने त्यांस म्हटले, संदेष्ट्याला आपला देश व आपले घर ह्यांत मात्र सन्मान मिळत नाही.**

स्तोत्र 41:9

**9 जो माझा सखा, ज्याच्यावर माझा विश्वास होता, ज्याने माझे अन्न खाल्ले त्यानेही माझ्यावर लाथ उगारिली आहे.**

*(ड) निघून जाणे* – कुठल्याही प्रकारची सूचना न देता तो व्यक्ती अचानक दिसेनासा होतो. ते आपली समस्या घेऊन दुसऱ्या सेवासंस्थेकडे जातात, जेथे काही काळ त्याचे कोडकौतुक केले जाते, आणि मग पुन्हा तोच विषय पुढे येतो.

अशा परिस्थितीत आम्ही काय करावे?

*(अ) यास वैय्यक्तिक बाब समजू नका*

सुधारणा कबूल करण्याची एखाद्या व्यक्तीची अपात्रता, ही त्या व्यक्तीची समस्या आहे. तो सुधारणा मान्य करू शकत नाही आणि म्हणून

अशाप्रकारे प्रतिक्रिया व्यक्त करीत आहे. यात आपण कोण आहात अथवा परमेश्वराचा सेवक या नात्याने आपल्या योग्यतेचा प्रश्न येत नाही.

*(ब) मनास लावून घेऊ नका. आपल्या अंतःकरणाचे रक्षण करा.*

गलती. 4:11,12

**[11] तुमच्यासाठी मी केलेले श्रम कदाचित् व्यर्थ झाले असतील, अशी मला तुमच्यासंबंधी भीति वाटते. [12] बंधुजनहो, मी तुम्हास विनंती करितो, जसा मी आहे तसे तुम्ही व्हा, कारण जसे तुम्ही होता तसा मीहि होतो. तुम्ही माझे काही वाईट केले नाही.**

पौलाच्या जीवनात अशी परिस्थिती घडून आली, जेथे गलतीकरांसाठी अत्यंत परिश्रम केल्यानंतरही असे दिसून येऊ लागले की त्याचे परिश्रम वाया जात आहेत. त्याने त्यांस सुवार्ता सांगितली होती. तो गेल्यानंतर, आणखी काही लोक तेथे आले. गलतीकरांनी पुन्हा नियमशास्त्राचे पालन करावे असे त्यांस वाटत होते. पौलाने या परिस्थितीस कसे तोंड दिले याचे उदाहरण अनुकरणीय आहे.

(बार्नेसच्या समीक्षेतून खालील टिप्पण घेण्यात आलेले आहेः

"ही वैय्यक्तिक बाब नाही. माझ्याजवळ तक्रार करावयाचे कारण नाही. आपण वैय्यक्तिकरित्या माझे वाईट केलेले नाही. आमच्यात कुठलेही शत्रुत्व नाही; कुठल्याही प्रकारची दुर्भावना नाही; वैय्यक्तिकरित्या कुठलेही नुकसान घडलेले नाही. याकारणास्तव मी अधिक स्वातंत्र्याने आपणास विनंती करतो की आपण ही गोष्ट समजून घ्यावी, मी आपणास आश्वासन देत आहे की वैय्यक्तिकरित्या मी मनास लावून घेतलेले नाही. माझ्याजवळ तक्रार करण्यासारखे काही नाही. मी वैय्यक्तिकरित्या आपणास विनंती करतो, हे आपल्या भल्यासाठी आहे, एका महान कार्याच्या हितासाठी आहे." जेव्हा ख्रिस्ती लोक सत्यापासून दूर जातात, आणि जगास समरूप होतात, तेव्हा ही त्यांची वैय्यक्तिक बाब नाही, अथवा त्यांच्यासाठी वैय्यक्तिकरित्या दुखविणारी गोष्ट नाही, मग त्यांस

याचे वाईट का वाटत असेना. ही उच्च प्रतीची बाब आहे. आमचे ध्येय हानी सोसणे आहे. धर्माच्या कार्यास हानी पाहोचते. संपूर्ण मंडळीस दुःख होते आणि तारणाऱ्यास "त्याच्या मित्रांच्या घरी घाय होतात." जगाच्या समरूप होणे, अथवा पापात पडणे हा एक सार्वजनिक अपराध आहे आणि त्यास आमच्या तारणाऱ्याच्या कार्यास हानिकारक मानले पाहिजे. पौलाचे मन मोठे होते, जरी त्यांनी त्याच्या शिकवणीचा त्याग केला, त्याचे प्रेम आणि त्यांच्यासाठी त्याने केलेल्या कष्टांचा त्यांना विसर पडला, तरीही त्याने यास स्वतःचा वैय्यक्तिक तोटा मानले नाही व स्वतःच्या मनास लावून घेतले नाही. महत्वाकांक्षी अथवा दांभिक व्यक्ती या गोष्टीस मुख्य विषय बनवितो.)

*(क) लोकांस बदलण्यासाठी वेळ द्या*

ज्या बाबतीत सुधारणेची गरज आहे, त्या बाबत सुधारणा स्वीकारण्यासाठी लोकांस वेळेची गरज असते.

*(ड) त्यांस शांतपणे पुढे वाढण्याची मोकळीक द्या*

त्यांस परमेश्वराच्या हाती सोपवून द्या. प्रगती व परिपक्वता घडवून आणण्यासाठी केवळ परमेश्वर त्यांच्या जीवनात कार्य करू शकतो.

## 4.5.7 सर्व बाबतीत परिपूर्णता घडवून आणा

आपले ध्येय ख्रिस्ती जीवनाच्या सर्व क्षेत्रात परिपूर्णता घडवून आणण्यात मदत करणे हे आहे.

इफिस. 4:13—15

**[13] देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या व तत्संबंधी परिपूर्ण ज्ञानाच्या एकत्वाप्रत, प्रौढ मनुष्यपणाप्रत, ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा वृद्धीच्या मर्यादेप्रत आपण सर्व येऊन पोहंचू तोपर्यंत दिले; 14 ह्यासाठी की, आपण ह्यापुढे बाळांसारखे असू नये, म्हणजे माणसांच्या धूर्तपणाने, भ्रांतीच्या मार्गास नेणाऱ्या युक्तीने, प्रत्येक शिकवणरूपी वाऱ्याने हेलकावणारे व फिरणारे**

**असे होऊ नये; 15 तर आपण प्रीतीने सत्याला धरून मस्तक असा जो ख्रिस्त त्याच्याप्रत सर्व प्रकारे वाढावे.**

परमेश्वराने आम्हास अभिवचन दिले आहे – “आता मी तुम्हांस प्रभूकडे व त्याच्या कृपेच्या वचनाकडे सोपवितो; तो तुमची वाढ करावयास व ‘पवित्र केलेल्या सर्व लोकांमध्ये तुम्हांला वतन’ द्यावयास समर्थ आहे” (प्रे. कृत्ये 20:32) आणि त्याने आम्हास त्याचा आत्मा दिला आहे – “तर जे तुम्ही आध्यात्मिक दानांविषयी उत्सुक आहां ते तुम्ही, मंडळीच्या उन्नतीसाठी ती दाने विपुल मिळावी म्हणून खटपट करा” (1 करिंथ. 14:12) यासाठी की या गोष्टी पूर्ण करण्यास मदत प्राप्त व्हावी.

बहुधा आम्ही कृपादाने व पाचारण या बाबींवर गरजेपेक्षा अधिक महत्व देण्याची चूक करून बसतो आणि चारित्र्याकडे व इतर व्यावहारिक पैलूंकडे दुलक्ष करतो – जसे लोकांशी संबंधित बाबी, वेळ व पैश्यांची व्यवस्था, उत्तम जोडीदार बनणे, वेळ व विश्रांती यांतील समतोल राखणे इत्यादी.

परमेश्वराच्या पाचारणाच्या विकासातील तीन पैलू:

***पाचारण* –** हा संक्षिप्त पैलू आहे. याचवेळी आपणास आपल्या जीवनावर परमेश्वराच्या पाचारणाचे प्रकटीकरण/समज प्राप्त होतो.

***तयारी* –** येथे आपण आपला जास्तीत जास्त वेळ घालवितो. ही तयारीची वेळ असते. परमेश्वर चारित्र्याच्या बाबींची काळजी घेईल. काही लोक या पैलूपलीकडे वाढू शकत नाहीत.

***जवाबदारी सोपविणे* –** हे तेव्हा घडून येते जेव्हा आपण ख्रिस्ताच्या देहात योग्य स्थानी व कार्यात पाऊल टाकता.

चारित्र्याच्या विषयास तोंड देणे:

- लोकांच्या कृपादानांस सोडून इतर गोष्टींसंबंधानेही बोलावयास शिका. नेहमीच व्यक्तीच्या पाचारणाची व कृपादानांची चर्चा करू

नका. लोक आपल्या कृपादानांमागे व पाचारणामागे स्वतःस लपवून घेतात आणि चारित्र्यासारख्या महत्वपूर्ण विषयाकडे दुर्लक्ष करतात.

- अंतःकरणाच्या विषयांस तोंड देणे. उदाहरणः तिरस्कार, असुरक्षिततेची भावना, भावनात्मक जखम, आंतरिक बंडाळी (कधी कधी लोक बाहेरून विद्रोह करीत नाहीत, पण आतून ते विद्रोही स्वभावाचे असतात) इत्यादी.
- वैय्यक्तिक बाबींस तोंड देणे. उदाहरणः लवकर रागावणे, लोकांशी संबंध ठेवता न येणे, स्वावलंबन इत्यादी.
- जीवनशैली व सवयींस तोंड देणे. उदाहरणः उत्तम साक्ष टिकवून ठेवण्याचे महत्व, वेळेचा व पैश्याची व्यवस्था लावणे इत्यादी.
- ते स्वतःवर ज्या मर्यादा घालतात, त्यांस ओळखणे व तोडणे.
- अपयशाचे चक्र ओळखणे व तोडणे (वारंवार मंडळीचा व सेवेचा त्याग).

### 4.5.8 त्यांस त्यांच्या पाचारणात कार्य करण्यासाठी मोकळे करा

जेव्हा लोकांची वाढ होते व ते परिपक्व होतात, तेव्हा त्यांस त्यांच्या पाचारणात कार्य करण्यासाठी मोकळे करण्याची कृपा आमच्याजवळ असली पाहिजे.

1 तीमथ्य. 1:3

**3 मी मासेदोनियास जातांना तुला इफिसांत राहावयाची विनंती केली, ह्यासाठी की, तू कित्येक लोकांना ताकीद द्यावी की, अन्य शिक्षण देऊ नका.**

तीतास पत्र 1:4,5

**4 देवपित्यापासून व ख्रिस्त येशू आपला तारणारा ह्याच्यापासून कृपा व शांति असो. 5 मी तुला क्रेतांत ह्यासाठी ठेवून आलो की, तू अपुऱ्या**

**राहिलेल्या गोष्टींची व्यवस्था करावी, आणि मी तुला आज्ञा केल्याप्रमाणे तू प्रत्येक नगरांत वडील नेमावे.**

त्यांना स्वतः उडण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे.

## 4.5.9 त्यांची मदत करणारे बना

जेव्हा आम्ही लोकांस मुक्त करतो, तेव्हा आम्ही त्यांचा त्याग करीत नाही – तर आम्ही त्यांच्या मदतीसाठी, त्यांस उत्तेजन देण्यासाठी उपलब्ध राहतो.

2 करिंथ. 12:14,15

**14 पाहा, तिसऱ्यांदा तुम्हाकडे येण्यास मी तयार आहे; आणि मी तुम्हावर भार टाकणार नाही; कारण मी तुमचे काही मागत नाही, तर स्वतः तुम्हीच मला पाहिजे आहा; आईबापांनी मुलांसाठी संग्रह केला पाहिजे, मुलांनी आईबापांसाठी नव्हे. 15 मी तुमच्या जिवांसाठी फार आनंदाने खर्च करीन व मी स्वतः सर्वस्वी खर्ची पडेन. मी तुम्हावर अतिशयच प्रीति करितो म्हणून तुम्ही माझ्यावर कमी प्रीति करिता की काय?**

## 4.5.10 जे पडतात, त्यांना पुन्हा स्थिर करा

गलती. 6:1

**2 बंधुजनहो, कोणी माणूस एखाद्या दोषांत सांपडला तरी जे तुम्ही आध्यात्मिक वृत्तीचे आहा ते तुम्ही अशाला सौम्य वृत्तीने ताळ्यावर आणा; तूहि परीक्षेंत पडू नये म्हणून स्वतःकडे लक्ष दे.**

1 योहान 5:14–16

**14 त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ते ह्यावरून की, आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल; 15 आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या**

**आहेत हेहि आपल्याला ठाऊक आहे. [16] ज्याचा परिणाम मरण नाही असे पाप करितांना आपल्या बंधूला कोणी पाहिले तर त्याने त्याच्याकरिता देवाजवळ मागावे म्हणजे तो त्याला जीवन देईल; अर्थात्, ज्याचा परिणाम मरण नाही असे पाप करणाऱ्यांस ते देईल. ज्याचा परिणाम मरण आहे असेहि पाप आहे; आणि ह्याविषयी मागावे असे मी म्हणत नाही.**

बहुतेकदा आम्ही घायाळांस मारून टाकतो. पण त्याऐवजी, जे चुकतात व पतन पावतात, त्यांस आम्ही प्रेमाने स्थिर करावयास शिकले पाहिजे.

## 4.5.11 पडलेल्यांस सांभाळणे

काही लोक परमेश्वराच्या पाचारणात चुकू शकतात.

फिलेमोन. 1:24

**[24] आणि माझे सहकारी मार्क, अरिस्तार्ख, देमास व लूक हे तुला सलाम सांगतात.**

2 तीमथ्य. 4:10

**[10] कारण देमासला ऐहिक सुख प्रिय असल्यामुळे तो मला सोडून थेस्सलनीकांस गेला; क्रेस्केस गलतीयास, व तीत दालमतियास गेला.**

काही लोक आपल्या विश्वासाचे तारू बुडवून देतात आणि आपले शत्रू म्हणून उभे ठाकतात.,

1 तीमथ्य. 1:19,20

**[19] विश्वास व चांगला विवेकभाव धर; कित्येकांनी हा झुगारून दिल्यामुळे त्याचे विश्वासरूपी तारू फुटले; [20] त्यांत हुमनाय व आलेक्सांद्र हे आहेत; त्यानी निंदा करण्याचे सोडून देण्यास शिकावे म्हणून मी त्यांना सैतानाच्या स्वाधीन केले आहे.**

2 तीमथ्य. 4:14,15

**[14] आलेक्सांद्र तांबटाने माझे पुष्कळ वाईट केले; त्याची ‘फेड त्याच्या
कृत्यांप्रमाणे प्रभू करील;’ [15] त्याच्याविषयी तूहि जपून राहा, कारण तो
आमच्या बोलण्यास फार आडवा आला होता.**




# राज्याची स्थापना करणारे

# 5
# राज्याची स्थापना करणाऱ्यांची जीवनशैली

## 5.1 आमचे ध्येय खिस्ताची समानता

इफिस. 4:13–15

**[13] देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या व तत्संबंधी परिपूर्ण ज्ञानाच्या एकत्वाप्रत, प्रौढ मनुष्यपणाप्रत, खिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा वृद्धीच्या मर्यादेप्रत आपण सर्व येऊन पोहंचू तोपर्यंत दिले; [14] ह्यासाठी की, आपण ह्यापुढे बाळांसारखे असू नये, म्हणजे माणसांच्या धूर्तपणाने, भ्रांतीच्या मार्गास नेणाऱ्या युक्तीने, प्रत्येक शिकवणरूपी वाऱ्याने हेलकावणारे व फिरणारे असे होऊ नये; [15] तर आपण प्रीतीने सत्याला धरून मस्तक असा जो खिस्त त्याच्याप्रत सर्व प्रकारे वाढावे.**

## 5.2 चारित्र्य महत्वाचे आहे

### 5.2.1 चारित्र्य काय आहे?

- स्वभाव, गुण, प्रवृत्ती, व्यक्तिमत्व, नैतिक जडणघडण.
- मी व्यक्तीगतरित्या जो आहे, तेच माझे चारित्र्य आहे.
- इतरांपुढे जे बनण्याचा मी प्रयत्न करतो, ते माझे चारित्र्य नाही. इतर लोक मला जे समजतात, ते माझे चारित्र्य नाही.
- व्यक्ती म्हणून जे माझे चारित्र्य आहे, तोच मी आहे. माझ्या आचरणाद्वारे हे दिसून येते.
- कठीण व अनपेक्षित परिस्थितीत माझ्या क्रिया व प्रतिक्रियांवरून माझे चारित्र्य दिसून येते.
- माझ्या गुप्त निवडीद्वारे माझे चारित्र्य दिसून येते.

- माझे शब्द, दृष्टीकोन यावरून माझे चारित्र्य दिसून येते.
- माझ्याद्वारे घेतल्या जाणाऱ्या निर्णयावर माझ्या आचारमूल्यांचा प्रभाव पडतो.

## *योसेफ*

उत्पत्ती 39:1—13

**[1] इकडे योसेफास मिसरात नेले तेव्हा ज्या इश्माएली लोकांनी त्यास तेथे
नेले होते त्यांजपासून त्यास पोटीफर नांवाच्या एका मिसऱ्याने विकत
घेतले, तो फारोचा एक अंमलदार असून गारद्यांचा सरदार होता. [2]
परमेश्वर योसेफाबरोबर असल्याकारणाने तो यशस्वी पुरुष झाला, तो
आपल्या मिसरी धन्याच्या घरी असे. [3] परमेश्वर त्याजबरोबर असल्याकारणाने
जे काही तो हाती घेतो त्यास परमेश्वर यश देतो असे त्याच्या धन्याला
दिसून आले. [4] योसेफावर त्याची कृपादृष्टि झाली, योसेफ त्याची सेवा
करू लागला, आणि त्याने त्याला आपल्या घरचा कारभारी नेमून आपले
सर्व काही त्याच्या ताब्यांत दिले [5] आणि त्याने त्याच्या स्वाधीन आपले
घरदार व सर्व काही केले, तेव्हापासून योसेफासाठी परमेश्वराने त्या
मिसऱ्याच्या घरादाराचे कल्याण केले, आणि त्याचे घरदार आणि शेतीवाडी
या सर्वांस परमेश्वराने आशीर्वाद दिला. [6] त्याने आपले सर्व काही
योसेफाच्या हवाली केले होते, म्हणून तो अन्न खाई त्यापलीकडे आपले
काय आहे याचे त्याला भान नसे. योसेफ हा बांधेसूद व देखणा होता. [7]
यानंतर असे झाले की योसेफाच्या धन्याची पत्नी त्याजवर नजर ठेवून
त्यास म्हणाली, मजपाशी नीज; [8] पण तो राजी झाला नाही, तो आपल्या
धन्याच्या पत्नीस म्हणाला, हे पाहा, घरात माझ्या ताब्यात काय आहे याचे
माझ्या धन्यास भानसुद्धा नाही, आपले सर्व काही त्याने माझ्या हाती दिले
आहे. [9] या घरात माझ्यापेक्षा ते मोठे नाहीत; आणि तुम्ही त्यांची पत्नी
केवळ म्हणून तुमच्याखेरीज त्यांनी माझ्यापासून काही दूर ठेवलेले नाही,
असे असता एवढी मोठी वाईट गोष्ट करून मी देवाच्या विरुद्ध पाप कसे
करू? [10] तरी ती रोज रोज योसेफाशी बोलत असताहि तिच्यापाशी
निजावयास किंवा तिच्याजवळ असावयास तो तिचे ऐकेना. [11] एके दिवशी**

**असे झाले की तो आपले काही कामकाज करावयास घरात गेला, त्यावेळी घरातल्या माणसापैकी कोणीही मनुष्य तेथे घरात नव्हता. [12] तेव्हा तिने त्याचे वस्त्र धरून म्हटले, मजपाशी नीज; पण तो आपले वस्त्र तिच्या हाती सोडून बाहेर पळून गेला. [13] ते वस्त्र आपल्या हाती सोडून तो बाहेर पळाला असे तिने पाहिले.**

"नाही" म्हणण्याचे सामर्थ्य एका दृढ नैतिक चारित्र्याद्वारे प्राप्त होते (वचन 8).

आपला विवेक आपणास परमेश्वराप्रत त्यावेळी देखील जवाबदारीने वागण्यास बाध्य करील जेव्हा आपल्याकडे पाहणारे कोणी नसेल (वचन 9).

दृढ चारित्र्य कमकुवत होत नाही आणि सतत येणाऱ्या परीक्षेस बळी पडत नाही (वचन 10).

जेव्हा मोह सतत पुढे असतो, तेव्हा "नाही" म्हणण्याची पात्रता, केवळ अशावेळी शक्य होते जेव्हा आपल्याजवळ दैवी चारित्र्य असते.

## 5.2.2 चारित्र्याचा विकास कसा घडून येतो?

व्यक्तीच्या चारित्र्य विकासावर कोणत्या गोष्टींचा प्रभाव पडतो अथवा कोणत्या गोष्टी चारित्र्य घडवून आणतात?

*दानीएल:*

चारित्र्यवान व्यक्तीचे दुसरे मोठे उदाहरण:

- बालपणापासूनच चारित्र्याचा विकास सुरू होतो.
- व्यक्तीचे मित्र त्याच्या चारित्र्यावर प्रभाव टाकतात.

दानीएल 2:17

**17 यावर दानीएलाने आपल्या घरी जाऊन आपले सोबती हनन्या, मीशाएल व अजऱ्या यांस ही हकीकत कळविली.**

1 करिंथ. 15:33

**33 फसूं नका, कुसंगतीने नीति बिघडते.**

- दृढ नैतिक चारित्र्य शिस्त व सरावाद्वारे निर्माण होते.

दानीएल 6:10

**10 ह्या फर्मानावर सही झाली आहे असे दानीएलाने ऐकले तेव्हा तो आपल्या घरी गेला; त्याच्या खोलीतल्या खिडक्या यरुशलेमेच्या दिशेकडे असून उघड्या होत्या; त्याने आपल्या नित्यक्रमाप्रमाणे दिवसांतून तीनदा गुडघे टेकून प्रार्थना केली व आपल्या देवाचा धन्यवाद केला.**

- दृढ नैतिक चारित्र्य संकटात आणखी मजबूत होते.

रोम. 5:3,4

**3 इतकेंच नाही, तर संकटांचाहि अभिमान बाळगितो, कारण आपल्याला ठाऊक आहे की संकटाने धीर,
4 धीराने शील व शीलाने आशा निर्माण होते.**

## 5.2.3 चारित्र्य महत्वाचे का आहे?

*(अ) दैवी चारित्र्य सेवेसाठी पूर्वपात्रता आहे.*

1 तीमथ्य. 3:1—15

**1 कोणी अध्याक्षाचे काम करू पाहतो तर तो चांगल्या कामाची आकांक्षा धरितो, हे वचन विश्वसनीय आहे.
2 अध्यक्ष अदूष्य, एका स्त्रीचा पति, नेमस्त, स्वस्थचित्त, सभ्य, अतिथिप्रिय, निपुण शिक्षक असा असावा.
3 तो मद्यपी व मारका नसावा; तर सौम्य, भांडण न करणारा, द्रव्यलोभ न ध ारणारा,
4 आपल्या घरची व्यवस्था चांगली ठेवणारा, आपल्या मुलांबाळांना**

**भीडमर्यादेचे वळण लावून त्यांना स्वाधीन ठेवणारा असा असावा; 5 ज्याला
आपल्या घरची व्यवस्था चांगली ठेवता येत नाही, तो देवाच्या मंडळीचा
संभाळ कसा करील? 6 त्याने गर्वाने फुगून जाऊन सैतानाप्रमाणे शिक्षेंत
पडू नये म्हणून तो नवशिका नसावा. 7 त्याची निंदा होऊ नये व त्याने
सैतानाच्या पाशांत सांपडू नये म्हणून त्याच्याविषयी बाहेरच्या लोकांनीहि
चांगली साक्ष दिलेली असावी. 8 तसेच सेवकहि गंभीर असावे; दुतोंड्ये,
मद्यपानासक्त व अनीतीने पैसा मिळविणारे नसावे; 9 विश्वासाचे रहस्य
शुद्ध विवेकभावाने राखणारे असावे. 10 त्यांचीहि अगोदर पारख व्हावी;
आणि अदूष्य ठरल्यास त्यांनी सेवकपण करावे. 11 तसेच, स्त्रिया गंभीर
असाव्या, चहाड नसाव्या, नेमस्त व सर्व गोष्टींविषयी विश्वासू असाव्या. 12
सेवक एका स्त्रीचा पति असावा; ते आपल्या मुलांबाळांची व घरची व्यवस्था
चांगली ठेवणारे असावे. 13 कारण ज्यांनी सेवकपण चांगले चालविले ते
आपणांसाठी चांगली योग्यता आणि ख्रिस्त येशूवरील विश्वासांत फार ध
ैर्य मिळवितात. 14 तुझ्याकडे लवकर येण्याची आशा धरून हे तुला लिहिले
आहे; 15 तरीपण मला उशीर लागल्यास सत्याचा स्तंभ व पाया अशी जी
जिवंत देवाची मंडळी आहे तींत म्हणजे देवाच्या घरांत कसे वागले
पाहिजे, हे तुला समजावे.**

तीतास पत्र 1:5–9

**5 मी तुला क्रेतांत ह्यासाठी ठेवून आलो की, तू अपुऱ्या राहिलेल्या
गोष्टींची व्यवस्था करावी, आणि मी तुला आज्ञा केल्याप्रमाणे तू प्रत्येक
नगरांत वडील नेमावे. 6 ज्याला नेमावयाचे तो अदूष्य, एका स्त्रीचा पति
असावा; त्याची मुले विश्वास ठेवणारी असावी. त्यांच्यावर बेतालपणा
केल्याचा आरोप आलेला नसून ती अनावर नसावी. 7 अध्यक्ष हा देवाचा
कारभारी आहे म्हणून तो अदूष्य असला पाहिजे; तो स्वच्छंदी, रागीट,
मद्यपी, मारका, अनीतीने पैसे मिळविणारा नसावा; 8 तर अतिथिप्रिय,
चांगुलपणाची आवड धरणारा, मर्यादशील, नीतिमान्, पवित्र संयमी. 9
आणि दिलेल्या शिक्षणानुसार जें विश्वसनीय वचन त्याला धरून राहणारा
असा असावा; ह्यासाठी की, त्याने सुशिक्षणाने बोध करावयास व उलट
बोलणाऱ्यांना कुंठित करावयासहि समर्थ व्हावे.**

1 पेत्र 5:1—4

**[1] तुम्हातील वडिलांना, जो मी सोबतीचा वडील, ख्रिस्ताच्या दुःखांचा साक्षी व प्रगट होणाऱ्या गौरवाचा वांटेकरी तो मी असा बोध करितोः [2] तुम्हामधील देवाच्या कळपाचे पालन करा; करावे लागते म्हणून नव्हे, तर देवाच्या इच्छेप्रमाणे संतोषाने त्याची देखरेख करा; द्रव्यलोभाने नव्हे तर उत्सुकतेने करा; [3] तुमच्या हाती सोपविलेल्या लोकांवर धनीपण करणारे असे नव्हे, तर कळपाला कित्ते व्हा; [4] मग जेव्हा मुख्य मेंढपाळ प्रगट होईल तेव्हा तुम्हास गौरवाचा व न कोमेजणारा हार प्राप्त होईल.**

सेवेचा पाया — आपल्या सेवेचे खरे बळ म्हणजे आपला अभिषेक नव्हे, तर आपले चारित्र्य होय.

मत्तय 9:17

**[17] तसेच कोणी नवा द्राक्षारस जुन्या बुधल्यांत घालीत नाहीत; घातला तर बुधले फुटून द्राक्षारस सांडतो आणि बुधले बिघडतात; तर नवा द्राक्षारस नव्या बुधल्यांत घालितात म्हणजे दोन्ही नीट राहतात.**

द्राक्षरस आपला अभिषेक होय; आपले चारित्र्य द्राक्षरस ठेवणारे बुधाले आहे. जर बुधले टाकाऊ, ठिसूळ असेल, किंवा गळत असेल, तर अभिषेक वाया जाईल.

जेथे आपले चारित्र्य आपणास ठेवू शकत नाही, तेथे आपले कृपादान आपणास घेऊन जाईल.

*(ब) आपले नैतिक चारित्र्य आपले खरे बळ आहे.*

मनुष्याचे खरे बळ म्हणजे त्याचे नैतिक चारित्र्य.

आपले आंतरिक बळ — आपले नैतिक चारित्र्य परीक्षा, दोषारोपण, छळ, मोह, लबाड गोष्टी व इतर दबावांस तोंड देण्याची आपली पात्रता ठरविते.

*(क) आपले चारित्र्य आपल्याद्वारे प्रचार करण्यात येणाऱ्या सर्वात महत्वपूर्ण संदेशास आकार देईल.*

1 थेस्सल. 1:5,6

**[5] कारण आमची सुवार्ता केवळ शब्दाने नव्हे, तर सामर्थ्याने, पवित्र आत्म्याने व पूर्ण निर्धाराने तुम्हाला कळविण्यात आली; तसेच तुमच्याकरिता आम्ही तुमच्या बरोबर असतांना कसे वागलो हे तुम्हास ठाऊक आहे. [6]तुम्ही फार संकटांत असतांना पवित्र आत्म्याच्या आनंदाने वचन स्वीकारून आमचे व प्रभूचे अनुकरण करणारे झाला.**

आपले जीवन बोलते. ज्याप्रकारचे जीवन आपण जगलो आहोत, तोच आपला सर्वात मोठा संदेश असेल. "मनुष्य संदेशापेक्षा श्रेष्ठ आहे. आपला संदेश विश्वसनीय आहे, कारण आपण विश्वसनीय आहात. जेव्हा व्यक्ती विश्वसनीय नसतो, तेव्हा त्याचा संदेश संशयास्पद असतो" (डॉ. एड कोल).

*(ड) चारित्र्य आपला टिकाऊपणा ठरविते*

"प्रसिद्धी एका क्षणात येते, पण खरा मोठेपणा वयाबरोबर वाढत जातो" (डॉ. एड कोल).

"थोर पुरुष अनेक वर्षे आपली महत्कृत्ये टिकवून ठेवतात, मग येणाऱ्या वर्षांत काहीही का घडेना" (डॉ. एड कोल).

- आपल्या जीवनाचे कपटपूर्ण वासनांपासून रक्षण करा (पैसा, अनैतिकता आणि यश).

## 5.3 आत्मिकतेऐवजी आध्यात्मिक पूर्णतेकडे लक्ष द्या

आत्मिक पूर्णता काय आहे? आध्यात्मिकरित्या पूर्ण होण्याचा काय अर्थ आहे? आपण खरोखर आध्यात्मिकरित्या पूर्ण आहोत काय या गोष्टीचे मूल्यमापन आपण कसे करणार? आध्यात्मिक परिपूर्णतेच्या संदर्भात नव्या करारात बहुधा तीन ग्रीक शब्दांचा उपयोग केला जातो :

(ग्रीक) टेलिओस श्जमसमपवेश त्र परिपूर्ण – पूर्ण वयाचा, सिद्ध किंवा परिपक्व प्रौढ व्यक्ती.

याचा खरा अर्थ आहे पूर्ण वयात येणे, प्रौढ़ बनणे. हे बहुधा पूर्णतेच्या बाबतीत उपयोगात येते. पूर्ण वयाचा, सिद्ध किंवा परिपक्व प्रौढ व्यक्ती.

हे मानसिक व नैतिक चारित्र्याचा विकास करण्याबाबत उल्लेख करते.

(ग्रीक) प्लीरो श्चसममतवश त्र भरणे, ने युक्त होणे, पसरणे, च्या प्रभावात असणे.

याचे भाषांतर परिपूर्ण या अर्थाने देखील होते, परंतु याचा शब्दशः अर्थ आहे, भरणे.

(ग्रीक) कॅटार्टिज़ो शंजंतजप्रवश त्र पूर्णपणे भरणे, पूर्णपणे सुसज्जित.

मत्तय 5:48

**48 ह्यास्तव जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे 'तुम्ही पूर्ण व्हा.' ;जमसमपवेद्ध**

येशू आम्हास आव्हान देतो की आम्ही पूर्णत्वाप्रत वाढत जावे, आम्ही परिपूर्ण व प्रौढ बनावे कारण परमेश्वर असा आहे! परमेश्वर पोरकट नाही!

कलस्सै. 1:28–29

**28 आम्ही त्याची घोषणा करितो, सर्व प्रकारच्या ज्ञानाने प्रत्येक माणसाला बोध करितो व प्रत्येक माणसाला शिकवितो; अशासाठी की, प्रत्येक माणसाला ख्रिस्ताच्या ठायी पूर्ण असे उभे करावे. 29 ह्याकरिता त्याची जी**

**शक्ति माझ्या ठायी जोराने कार्य चालवीत आहे तिच्या मानाने मी झटून श्रम करीत आहे.**

आमचे ध्येय माणसाला ख्रिस्ताच्या ठायी पूर्ण ;जमसमपवेद्ध असे उभे करणे हे आहे.

### 5.3.1 आध्यात्मिक परिपूर्णतेची सात वैशिष्ट्ये

*(अ) ख्रिस्ताची समानता*

इफिस. 4:13

**13 देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या व तत्संबंधी परिपूर्ण ज्ञानाच्या एकत्वाप्रत, प्रौढ मनुष्यपणाप्रत, ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा वृद्धीच्या मर्यादेप्रत आपण सर्व येऊन पोहंचू तोपर्यंत दिले.**

आम्ही सर्व बाबतीत त्याच्याठायी वाढावायाचे आहे (इफिस. 4:15).

हे ख्रिस्ती सेवेचे ध्येय आहे – प्रत्येक व्यक्तीस परिपक्व व प्रौढ असे तयार करणे.

*(ब) आपल्या जीवनासाठी परमेश्वराच्या संपूर्ण इच्छेत अथवा संकल्पात पूर्ण व सिद्ध होणे.*

प्रत्येक क्षेत्रात आपण परमेश्वराच्या इच्छेशी पूर्णपणे जुळलेले आहात.

कलस्सै. 4:12

**12 ख्रिस्त येशूचा दास एपफ्रास जो तुमच्यांतलाच आहे तो तुम्हास सलाम सांगतो; तो आपल्या प्रार्थनांमध्ये सर्वदा तुम्हांसाठी जीव तोडून विनंती करीत आहे की, देवाच्या संपूर्ण इच्छेनुसार तुम्ही परिपूर्ण व दृढनिश्चयी असे स्थिर राहावे.**

येथे दोन शब्दांचा वापर करण्यात आला आहे, सिद्ध त्र जमसमपवे; पूर्ण त्र चसममतव

*(क) आपणास प्रत्येक प्रकारच्या सत्कार्याचे फळ देण्यासाठी सुसज्ज करण्यात आले आहे, जे करण्यासाठी परमेश्वराने आपणास नेमिले आहे*

2 करिंथ. 13:9,11

**[9] जेव्हा आम्ही दुर्बळ असून तुम्ही सबळ असता तेव्हा आम्ही आनंद करतो; व तुम्ही परिपूर्ण ;ंजंतजप्रवद्ध व्हावे ह्यासाठीहि प्रार्थना करितो.**
**[11]बंधुजनहो, आता इतकेच म्हणतो, तुमचे कल्याण असो; तुम्हास पूर्णता ;ंजंतजप्रवद्ध लाभो; समाधान मिळो; तुम्ही एकचित्त व्हा; शांतीने राहा म्हणजे प्रीतीचा व शांतीचा देव तुम्हासह राहील.**

इब्री. 13:20,21

**[20] आतां ज्या शांतीच्या देवानें 'सर्वकाळच्या कराराच्या रक्तानें मेंढरांचा' महान् 'मेंढपाळ' आपला प्रभु येशू ह्याला मेलेल्यांतून 'वर आणिलें,'**
**[21] तो देव आपल्या दृष्टीने जे आवडते ते आपणामध्ये येशू ख्रिस्ताच्या द्वारे करो व तो आपल्या इच्छेप्रमाणे करण्यास तुम्हाला प्रत्येक चांगल्या कामात सिद्ध ;ंजंतजप्रवद्ध करो; त्या येशू ख्रिस्ताला युगानुयुग गौरव असो. आमेन.**

लूक 6:40

**[40] शिष्य गुरूपेक्षां श्रेष्ठ नाहीं; पूर्ण ;ंजंतजप्रवद्ध झालेला प्रत्येक शिष्य आपल्या गुरूसारखा होईल.**

इफिस. 4:11,12

**[11] आणि त्यानेच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे 'नेमून दिले;'**
**[12] तें ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांस सेवेच्या कार्याकरिता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरिता सिद्ध ;ंजंतजप्रवद्ध व्हावे.**

*(ड) आपण जड अन्न घेऊ शकता.*

इब्री. 5:11—14

[11] **ह्याविषयी आम्हास पुष्कळ सांगावयाचे आहे, ते तुम्हाला समजावून
सांगणे कठीण आहे, कारण तुम्ही ऐकण्यांत मंद झाला आहा. [12] वास्तविक
इतक्या काळात तुम्ही शिक्षक व्हावयास पाहिजे होता पण तुम्हांला
देवाच्या वचनांची मूळाक्षरे पुन्हा कोणींतरी शिकविण्याची जरूरी आहे,
आणि तुम्हाला दुधाची गरज आहे, जड अन्न चालत नाही, असे तुम्ही
झाला आहा. [13] कारण दुधावर राहणारा नीतिमत्त्वाच्या वचनाशी अपरिचित
असतो; कारण तो बाळक आहे; [14] पण ज्यांच्या ज्ञानेंद्रियांना वहिवाटीने
चांगले आणि वाईट समजण्याचा सराव झाला आहे अशा प्रौढांसाठी
;जमसमपवेद्ध जड अन्न आहे.**

इब्री. 6:1—3

[1] **ह्यास्तव निर्जीव कृत्यांबद्दलचा पश्चात्ताप, देवावरचा विश्वास, [2] आणि
बाप्तिस्म्यांचे, हात वर ठेवण्याचे, मृतांच्या पुनरूत्थानाचे व सार्वकालिक
न्यायाचे शिक्षण, हा पाया पुन्हा न घालता, आपण ख्रिस्ताविषयींच्या
प्राथमिक बाबींसंबंधी बोलत राहण्याचे सोडून प्रौढतेप्रत जाण्याच्या नेटाने
प्रयत्न करू या. [3] देव होऊ देईल तर हे आपण करू.**

1 करिंथ. 2:6,7

[6] **तथापि जे पोक्त आहेत त्यांना आम्ही ज्ञान सांगतो; पण ते ज्ञान ह्या
युगाचे नव्हे, आणि ह्या युगाचे नाहीसे होणारे जे अधिकारी त्यांचेहि नव्हे;
[7] तर देवाचे गूढ ज्ञान आम्ही सांगतो; ते गुप्त ठेविलेले होते, ते देवाने
युगांच्या पूर्वी तुमच्या आमच्या गौरवाकरिता नेमिले होते.**

*(इ) या ज्ञानेंद्रियांना वहिवाटीने चांगले आणि वाईट समजण्याचा सराव देऊन परिपूर्ण करण्यात आले आहे.*

इब्री. 5:14

**[14] पण ज्यांच्या ज्ञानेंद्रियांना वहिवाटीने चांगले आणि वाईट समजण्याचा सराव झाला आहे अशा प्रौढांसाठी जड अन्न आहे.**

*(फ) आता आपण पोरपणाच्या गोष्टी सोडून देता.*

आता आपण समज, विचार व बोलण्याच्या बाबतीत पोरपणाच्या गोष्टी सोडून देता.

1 करिंथ. 13:11

**[11] मी मूल होतों तेव्हां मुलासारखा बोलतं असें, मुलासारखी माझी बुद्धी असे, मुलासारखे माझे विचार असत; आतां प्रौढ झाल्यावर मीं पोरपणाच्या गोष्टी सोडून दिल्या आहेत.**

1 करिंथ. 3:1–4

**1 बंधुजनहो, जसे आध्यात्मिक माणसांबरोबर बोलावे तसे तुमच्याबरोबर मला बोलता आले नाही, तर जसे दैहिकांबरोबर, जसे ख्रिस्तांतील बाळकांबरोबर, तसे मला बोलावे लागले. [2] मी तुम्हास दूध पाजले, जड अन्न दिले नाही; कारण त्या वेळेस तुम्हाला तेवढी शक्ति नव्हती आणि अजूनहि नाही. [3] कारण तुम्ही अजूनहि दैहिक आहा; ज्या अर्थी तुमच्यामध्ये हेवा व कलह आहेत, त्या अर्थी तुम्ही दैहिक आहा की नाही? व मानवी रीतीने चालता की नाही? [4] कारण जेव्हा एखादा म्हणतो, मी पौलाचा आहे; दुसरा म्हणतो, मी अपुल्लोसाचा आहे; तेव्हा तुम्ही मानवच आहा की नाही?**

हम अपने विचारों, समझ और शब्दों में बचकाने नहीं बने रह सकते।

आम्ही आपले विचार, समज आणि शब्दांच्या बाबतीत पोरकट राहू शकत नाही.

दैहिक असण्याचा अर्थ पोरकटपणा हा आहे. कलह, हेवा, फूट, स्पर्धा आणि स्वार्थी महत्वाकांक्षा सर्व पोरकटपणाच्या वागणूकीची वेगवेगळी रूपे आहेत.

*(ग) आपले संपूर्ण शरीरावर व जीभेवर नियंत्रण आहे*

याकोब 3:2

**[2] कारण आपण सगळेच पुष्कळ चुका करितो. कोणी जर बोलण्यांत चुकत नाहीं तर तो मनुष्य पूर्ण होय, तो सर्व शरीरहि कह्यांत ठेवण्यास समर्थ आहे.**

आध्यात्मिक परिपक्वता एक प्रक्रिया आहे. पण ही लगेच प्राप्त होत नाही.

यासाठी वेळ लागतो. आपणास आपले कर्तव्य पार पाडावयाचे आहे, हे स्वतःहून घडून येत नाही.

परमेश्वराचा सेवक या नात्याने आपणास आध्यात्मिक परिपक्वतेत सतत प्रगती करीत राहिले पाहिजे.

## 5.4 आम्ही कारभारी आहोत

1 करिंथ. 4:1,2

**[1] आम्ही ख्रिस्ताचे सेवक देवाच्या रहस्यांचे कारभारी आहो असे प्रत्येकाने आम्हाला मानावे. [2] कारभारी म्हटला की, तो विश्वासू असला पाहिजे.**

आम्ही परमेश्वराच्या रहस्यांचे कारभारी आहोत. परमेश्वराद्वारे आम्हास देण्यात आलेल्या कृपादानांचे व कृपचे आम्ही कारभारी आहोत.

1 पेत्र 4:10

**10 प्रत्येकाला जसे कृपादान मिळाले आहे तसे देवाच्या नानाविध कृपेच्या चांगल्या कारभाऱ्यांप्रमाणे ते एकमेकांच्या कारणीं लावा.**

तीतास पत्र 1:7

**7 अध्यक्ष हा देवाचा कारभारी आहे म्हणून तो अदूष्य असला पाहिजे; तो स्वच्छंदी, रागीट, मद्यपी, मारका, अनीतीने पैसे मिळविणारा नसावा.**

## 5.4.1 परमेश्वराचा कारभारी होण्याचा अर्थ काय?

कारभारी (ग्रीक) Oikonomos = घर, संपत्तीची देखरेख करणारा, प्रशासक, खजीनदार.

जे आपले नाही, त्यावर ज्यास जवाबदार ठरविण्यात आले आहे, तो व्यक्ती.

ज्यास व्यवस्थापनाची जवाबदारी सोपविण्यात आली आह

Oikonomos = घराचा व्यवस्थापक

Oikos = घर

nomos = व्यवस्था

लूक 16:2–4; 1 करिंथ. 9:17; कलस्सै. 1:25; इफिस. 3:2,9; आणि 1 तीमथ्य. 1:4 या वचनांत उपयोगात आणलेला आहे.

`कारभारी, व्यवस्थापक, देखरेख करणारा, सांभाळणारा – ज्यास दुसऱ्या व्यक्तीच्या संपत्तीची देखरेख करण्याची जवाबदारी सोपविण्यात आली आहे.

आपण खात्री करून घ्यावी की :

- सर्व काही सुरळीत चालले आहे.

- सर्व काही लाभदायक आहे.
- सर्व बाबींचा हिशेब राखण्यात येत आहे (रोम. 16:23).
- जे काही त्याच्या देखरेखीखाली देण्यात आले आहे, त्याचे त्यास रक्षण करावयाचे आहे.
- त्यास सातत्याकडे लक्ष दिले पाहिजे, म्हणजे वारसदारास तयार करावयाचे आहे (गलती. 4:1–2).

### 5.4.2 परमेश्वराचा दास या नात्याने, मी कोणत्या गोष्टींचा कारभारी आहे?

- आपणास देण्यात आलेली कृपादाने (1 पेत्र 4:10,11).
- शुभवर्तमान (1 करिंथ. 9:16,17).
- विशिष्ट कामासाठी परमेश्वराची कृपा जी आपणास देण्यात आली आहे (इफिस. 3:1,2).
- परमेश्वराचे रहस्य (इफिस. 3:9; 1 करिंथ. 4:1; कलस्सै. 1:26–29; 1 करिंथ. 2:7; 2 करिंथ. 2:17; 4:1,2).

आपणास सोपविण्यात आलेल्या सेवेचे कारभारी या नात्याने, आपण खालील गोष्टींसाठी जवाबदार आहात :

- आपल्या सेवाकार्याच्या योग्य संचालनासाठी – प्रत्येक बाबतीत कुठल्याही प्रकारचा दोष दिसता कामा नये, सर्व काही सुरळीत असावे (2 करिंथ. 6:3,4).
- लाभदायकता – आपण फलद्रूप असले पाहिजे (योहान 15:8).
- उत्तरदायित्व (2 करिंथ. 5:9,10).
- संरक्षण – आपल्या सेवेचे रक्षण करा.
- सातत्य – परमेश्वराने आपणास जे दिले आहे ते इतरांस सोपवावे.

### 5.4.3 उत्तम कारभाऱ्याची वैशिष्ट्ये

लूक 12:41—48

**[41] तेव्हा पेत्राने म्हटले, प्रभुजी, हा दाखला आपण आम्हांलाच सांगता की
सर्वांना? [42] तेव्हा प्रभु म्हणाला, आपल्या परिवाराला योग्य वेळी शिध
ासामुग्री द्यावयास धनी ज्याला नेमील असा विश्वासू व विचारशील
कारभारी कोण? [43] त्याचा धनी येईल तेव्हा जो दास तसे करतांना
आढळेल तो धन्य. [44] मी तुम्हास खरे सांगतो की, त्याला तो आपल्या
सर्वस्वावर नेमील. [45] परंतु आपला धनी येण्यास उशीर लागेल असे
आपल्या मनांत म्हणून तो दास चाकरांस व चाकरिणींस मारहाण करू
लागेल, आणि खाऊन पिऊन मस्त होईल, [46] तर तो वाट पाहत नाही
अशा दिवशी व त्याला ठाऊक नाही अशा घटकेस त्या दासाचा धनी
येऊन त्याला कापून टाकील, आणि अविश्वासू लोकांबरोबर त्याचा वांटा
नेमील. [47] आपल्या धन्याची इच्छा काय आहे हे माहीत असता ज्या दासाने
तयारी केली नाही किंवा त्याच्या इच्छेप्रमाणे केले नाही त्याला पुष्कळ
फटके मिळतील, [48] परंतु ज्याने फटके मिळण्याजोगी कृत्ये माहीत नसता
केली त्याला थोडे मिळतील. ज्या कोणाला पुष्कळ दिले आहे त्याच्याजवळून
पुष्कळ मागण्यांत येईल, आणि ज्याच्याजवळ पुष्कळ ठेवले आहे
त्याच्याजवळून पुष्कळच अधिक मागतील.**

वचन 42: विश्वासू व विचारशील

1 तीमथ्य. 1:12

**[12] ज्याने मला शक्ति दिली त्या आपल्या प्रभु खिस्त येशूचे मी आभार
मानितो.**

लूक 16:1—12

**[1] मग त्याने शिष्यांनाहि म्हटले, एक श्रीमंत मनुष्य होता व त्याचा एक
कारभारी होता; त्याच्यावर हा तुमचे द्रव्य उडवितो, असा त्याच्याजवळ
आरोप करण्यांत आला. [2] तेव्हा त्याने त्याला बोलावून म्हटले, तुझ्याविषयी
मी हे काय ऐकतो? तू आपल्या कारभाराचा हिशेब दे; कारण ह्यापुढे तुला**

**कारभार पाहावयाचा नाही. [3] मग कारभाऱ्याने आपल्या मनांत म्हटले, माझा धनी माझ्यापासून कारभार काढून घेणार आहे. तर मी आता काय करू? खणण्याची मला शक्ति नाही; भीक मागण्याची लाज वाटते. [4] तर कारभारावरून काढल्यावर लोकांनी मला आपल्या घरांत घ्यावे म्हणून काय करावे हे आता मला सुचले. [5] मग त्याने आपल्या धन्याच्या प्रत्येक देणेकऱ्यास बोलाविले आणि पहिल्याला, म्हटले, माझ्या धन्याचे तुला किती देणे आहे? [6] तो म्हणाला, शंभर मण तेल. त्याने त्याला म्हटले, हा तुझा रोखा घे आणि लवकर बसून ह्यावर पन्नास मांड. [7] नंतर दुसऱ्याला म्हटले, तुला किती देणे आहे? तो म्हणाला, शंभर खंड्या गहूं. तो त्याला म्हणाला, हा तुझा रोखा घे व ऐंशी मांड. [8] अन्यायी कारभाऱ्याने शहाणपण केले ह्यावरून धन्याने त्याची वाहवा केली; कारण ह्या युगाचे लोक आपल्या सारख्यांविषयी प्रकाशाच्या लोकांपेक्षा शहाणे असतात. [9] आणखी मी तुम्हास सांगतो, अनीतिकारक धनाने तुम्ही आपणांसाठी मित्र जोडा; ह्यासाठी की, ते नाहीसे होईल तेव्हा त्यांनी तुम्हास सार्वकालिक वस्तीत घ्यावे. [10] जो अगदी थोडक्याविषयी विश्वासू तो पुष्कळाविषयीहि विश्वासू आहे; आणि जो अगदी थोडक्याविषयी अन्यायी तो पुष्कळाविषयीहि अन्यायी आहे. [11] ह्यास्तव तुम्ही अनीतिकारक धनाविषयी विश्वासू झाला नाही तर जे खरे धन ते तुम्हाला कोण सोंपवून देईल? [12] आणि जे दुसऱ्यांचे त्याविषयी तुम्ही विश्वासू झाला नाही तर जे आपले आहे ते तुम्हाला कोण देईल?**

- लहान बाबतीत विश्वासू राहावे – परमेश्वर आपणास अनेक स्थानी नेमणूक करील.
- पैशांबाबत विश्वासू राहावे – परमेश्वर आपणास खरे धन देईल.
- जे इतरांचे आहे त्याबाबत विश्वासू राहावे – परमेश्वर आपणास आपले स्वतःचे देईल.

जे काही परमेश्वराने आम्हास दिले आहे, त्यात आम्ही विश्वासू व विचारशील कारभारी असावे!

उत्तम कारभारी बनावे!




# राज्याची स्थापना करणारे

# 6
# सहकार्य – राज्यात सहकारी बनावयास शिकणे

सहकार्याद्वारे परमेश्वराच्या राज्याच्या वाढीसाठी जगात बरेच काही साध्य करता येते.

## 6.1 आपसात फूट पडलेले राज्य दुर्बळ व कमकुवत असते

मार्क 3:24

**24 आपसांत फूट पडलेले राज्य टिकत नाही. एकमेकांशी सहभाग करण्याच्या आमच्या अनिच्छेमुळे बरेच काम करणे बाकी आहे.**

एकमेकांशी सहभाग करण्याच्या आमच्या अनिच्छेमुळे राज्याच्या प्रगतीमध्ये अडखळण निर्माण झाले आहे.

## 6.2 आम्हास आत्म्यात ऐक्य राखावयास पाचारण करण्यात आलेले आहे

इफिस. 4:3

**3 आत्म्याच्याद्वारे घडून आलेले ऐक्य शांतीच्या बंधनाने राखावयास झटत जा.**

फिलिप्पै. 2:1

**2 ह्यावरून ख्रिस्ताच्या ठायी काही आश्वासन, प्रीतीचे काही सांत्वन, आत्म्याची काही सहभागिता, काही कळवळा व करुणा ही जर आहेत.**

लूक 9:49,50

**[49] योहानाने म्हटले, गुरूजी, आम्ही एका माणसाला तुमच्या नांवाने भुते काढतांना पाहिले; तेव्हा आम्ही त्याला मनाई केली, कारण तो आमच्यातला अनुयायी नव्हता. [50] येशूने त्याला म्हटले, त्याला मनाई करू नका; कारण जो तुम्हाला प्रतिकूल नाही तो तुम्हाला अनुकूल आहे.**

## 6.3 राज्याची मनोवृत्ती असणारे बनणे

अनुवाद 22:10

**[10] बैल व गाढव ह्यांची जोडी जुंपून जमीन नागरू नको.**

आमोस 3:3

**3 पूर्वसंकेत केल्याशिवाय दोघे जण एकमेकांबरोबर चालतील काय?**

1 करिंथ. 1:10

**[10] बंधुजनहो, आपला प्रभु येशू ख्रिस्त ह्याच्या नांवाने मी तुम्हास विनंती करितो की, तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे; म्हणजे तुमच्यामध्ये फुटी पडू नयेत; तुम्ही एकचित्ताने व एकमताने जोडलेले व्हावे.**

आम्ही सर्व कोणत्या बाबतीत सम्मत होऊ शकतो, आम्ही सर्व या बाबतीत एकमत होऊ शकतो – की जे काही आम्ही करीत आहोत, त्यात आम्ही ख्रिस्ताच्या राज्याच्या वाढीकडे लक्ष पुरवितो.

आम्ही सर्व राज्यधारिणे म्हणजे राज्याची मनोवृत्ती राखणारे बनू शकतो.

आम्हास आपल्या चित्तवृत्तीमध्ये, दृष्टिकोणात बदल घडवून आणण्याची गरज आहे. ही आपल्या किंवा माझ्या सेवेची बाब नाही – परंतु देवाच्या राज्याची बाब आहे.

## 6.4 आम्हास एकमेकांशी जुळून राहणे व एकमेकांसोबत काम करणे शिकावयाचे आहे

### 6.4.1 भागीदारी अथवा सहकार्य करण्याप्रीत्यर्थ रचण्यात आलेले

1 करिंथ. 12:18

**18 तर देवाने आपल्या इच्छेप्रमाणे शरीरामध्ये प्रत्येक अवयव लावून ठेविला आहे.**

खिस्ताची मंडळी अथवा देह यासाठी घडविण्यात आला आहे की लोकांनी त्यांत सहकार्याने, आपसात मिळून मिसळून कार्य करावे.

इफिस. 4:16

**16 त्याच्यापासून पुरवठा करणाऱ्या प्रत्येक सांध्याच्या योगे, सबंध शरीराची जुळवणूक व जमवाजमव होत असते, आणि प्रत्येक अंग आपआपल्या परिमाणाने कार्य करीत असता आपली रचना प्रीतीमध्ये होण्यासाठी शरीर आपली वृद्धि करून घेते.**

प्रत्येक सांध्यास पुरवठा करण्याचे काम पार पाडावयाचे आहे.

भागीदारी अथवा सहकार्य म्हणजे एकमेकाशी प्रतिस्पर्धा नव्हे, तर एकमेकास पूरक ठरणे आहे. आम्हास एकमेकांचे पूरक म्हणून बनविण्यात आले आहे.

येणाऱ्या संजीवनासाठी देवास आमची गरज आहे आणि त्यासाठी आम्हास कृपादाने देण्यात आलेली आहेत. आम्हा प्रत्येकास परमेश्वराच्या कुटूंबात आपले योग्य स्थान ग्रहण करावयाचे आहे. मंडळीस बलवान बनविण्यासाठी आणि पवित्र जनांस त्यांच्या कृपादानांत व पाचारणात योग्य ठिकाणी स्थानापन्न करता यावे म्हणून परमेश्वराने पाच प्रकारची सेवादाने लाभलेल्या सेवकांस तयार केले आहे, मग ते स्थानिक मंडळीत असो वा विश्वव्यापी खिस्ती मंडळीत असोत. जेव्हा प्रत्येक जण योग्य

स्थान ग्रहण करील, तेव्हा आमची मंडळी परिपूर्ण होईल व प्रभावीरित्या कार्य करू लागेल.

योहान 4:37,38

**37 एक पेरितो व एक कापितो, अशी जी म्हण आहे ती ह्या बाबतीत खरी**
**आहे. 38 ज्यासाठी तुम्ही श्रम केले नव्हते ते कापावयास मी तुम्हास**
**पाठविले; दुसऱ्यांनी श्रम केले होते व तुम्ही त्यांच्या श्रमांचे वांटेकरी**
**झाला आहा.**

1 करिंथ. 3:6

**6 मी लाविले, अपुल्लोसाने पाणी घातले, पण देव वाढवीत गेला.**

परमेश्वर ह्याच पद्धतीने कार्य करतो. परमेश्वर बहुधा एका व्यक्तीचा उपयोग बी पेरण्यासाठी, दुसऱ्याचा पाणी देण्यासाठी, करतो, आणि तिसऱ्या व्यक्तीस तो हंगामाची कापणी करण्यासाठी पाठवितो.

आम्ही हे जाणून घेतले पाहिजे की आम्ही कोठे आपले स्थान ग्रहण करावे असे परमेश्वरास वाटते, तो आमच्याकडून काय करवू इच्छितो, आणि केव्हा करवू इच्छितो.

2 करिंथ. 10:13

**13 आम्ही प्रतिष्ठा मिरविली तर ती आपल्या मर्यादेबाहेर न मिरविता देवाने**
**आम्हाला लावून दिलेल्या मर्यादेच्या आंतच मिरवू, ती मर्यादा तुमच्यापर्यंत**
**येऊन पोहंचली आहे.**

परमेश्वराने प्रत्येकासाठी प्रभावक्षेत्र ठरविले आहे. आम्हास त्या प्रभावक्षेत्राची ओळख करून घेतली पाहिजे, जे परमेश्वराने आमच्यासाठी ठरविले आहे आणि आम्हास त्यात टिकून राहिले पाहिजे. जसे परमेश्वरास योग्य वाटते, त्यानुसार तो आमच्या प्रभावक्षेत्राचा विस्तार करतो. जेव्हा परमेश्वर असे करतो, तेव्हा आम्हास त्याच्यासोबत पुढे वाढावयाचे आहे,

यासाठी की आम्ही ज्यांची सेवा करावी असे त्याला वाटते, त्यांच्या जीवनास आम्हास स्पर्श करता यावा.

### 6.4.2 पौलाचे सहकारी

रोम. 16:7

**7 माझे नातेवाईक व सोबतीचे बंदिवान् अंद्रोनीक व युनिया ह्यांना सलाम सांगा; ते प्रेषितांमध्ये नामांकित आहेत व माझ्यापूर्वीच ते ख्रिस्तामध्ये होते.**

रोम. 16:21

**21 माझा सहकारी तीमथ्य व माझे नातेवाईक लूक्य, यासोन व सोसिपतेर**

2 करिंथ. 8:23

**23 तीताविषयी कोणी विचारील तर तो माझा साथी व तुमच्याकरिता माझा सहकारी साथी आहे; आमच्या बांधवांविषयी म्हणाल तर ते मंडळ्याचे जासूद, ख्रिस्ताचे भूषण असे आहेत.**

फिलिप्पै. 4:3

**3 आणि तसेच हे माझ्या खऱ्या सोबत्या, मी तुलाहि विनवितो की, ह्या ज्या स्त्रियांनी माझ्याबरोबर, आणि क्लेमेंत व ज्यांची नांवे 'जीवनाच्या पुस्तकांत' आहेत असे माझे बाकीचे सहकारी ह्यांच्याबरोबर सुवार्तेच्या कामी श्रम केले, त्यांना साहाय्य कर.**

कलस्सै. 1:7

**7 एपफ्रास, आमच्या सोबतीचा प्रिय दास, तुमच्या वतीनें ख्रिस्ताचा विश्वासू सेवक, त्याच्यापासून तुम्ही ती कृपा अशीच शिकला.**

कलस्सै. 4:7,10,11

**7 प्रिय बंधु तुखिक, प्रभूमधील विश्वासू सेवक व माझ्या सोबतीचा दास
हा माझ्याविषयी सगळे काही तुम्हास कळवील. 10 माझ्या सोबतीचा
बंदिवान् अरिस्तार्ख तुम्हाला सलाम सांगतो, आणि बर्णबाचा भाऊबंद
मार्क हाहि तुम्हाला सलाम सांगतो, (त्याच्याविषयी तुम्हास आज्ञा मिळाल्या
आहेत; तो तुम्हाकडे आला तर त्याचा स्वीकार करा;) 11 युस्त म्हटलेला
येशू तुम्हाला सलाम सांगतो; सुंता झालेल्यांपैकी हेच मात्र देवाच्या
राज्याकरिता माझे सहकारी आहेत व त्यांच्याद्वारे माझे सांत्वन झाले आहे.**

1 थेस्सल. 3:2

**2 आणि आम्ही आपला बंधु तीमथ्य, ख्रिस्ताच्या सुवार्तेत देवाचा सेवक, ह्याला ह्यासाठी पाठविले की, त्याने तुम्हाला स्थिर करावे, आणि तुमच्या विश्वासाच्या वृद्धीसाठी बोध करावा.**

**फिलेमोन. 1:1,2, 23,24**

**1 आमचा प्रिय सहकारी फिलेमोन ह्यासः तुला, आमची बहीण अफिया
हिला, आमचा सहसैनिक अर्खिप्प ह्याला,व तुझ्या घरांत जमणाऱ्या मंडळीला;
2 ख्रिस्त येशूचा बंदिवान् पौल व आपला बंधु तीमथ्य ह्यांच्याकडूनः
23ख्रिस्त येशूमध्ये माझा सहबंदिवान् एपफ्रास, 24 आणि माझे सहकारी
मार्क, अरिस्तार्ख, देमास व लूक हे तुला सलाम सांगतात.**

प्रेषितांच्या कृत्यांमध्ये व पत्रांमध्ये अनेक ठिकाणी आम्ही पौलाच्या सहाकाऱ्यांविषयी वाचतो. स्वतः पौलाने आपल्या सहकाऱ्यांची यादी तयार केली आहे. बर्णबा, सिलास, लूक्य, अन्द्रोनीक, जुनिया, तीमथ्य, एपफ्रास, लुशियस, जेसन, सोसिपेतर, तीत, क्लेमेंत, तुखिक, अरिस्तार्ख, मार्कस, युस्त, फिलेमोन, अफिया, अर्खिप्प, देमास, आणखी काही "बांधव," "ह्या स्त्रियां ज्यांनी माझ्याबरोबर सुवार्तेसाठी श्रम केले" आणि "ज्यांची नांवे 'जीवनाच्या पुस्तकांत' आहेत असे माझे बाकीचे सहकारी" या लोकांचा उल्लेख पौल "सहबंदिवान," "सहकारी," "सहसैनिक," "सहकारी व सहायक" म्हणून करतो.

## 6.5 आम्ही इतरांस दोष देता कामा नये

इतर दासांची स्वतःशी तुलना करता कामा नये.

परमेश्वराच्या इतर दासांना दोष देऊ नका, त्यांचे प्रतिफळ ठरविण्याचा प्रयत्न करू नका.

मत्तय 20:1—16

**[1] म्हणून स्वर्गाचे राज्य कोणाएका घरधन्यासारखे आहे; तो आपल्या
द्राक्षमळ्यांत मोलाने कामकरी लावावयास मोठ्या पहाटेस बाहेर गेला; [2]
आणि त्याने कामकऱ्यांना रोजचा रूपया ठरवून त्यांना आपल्या द्राक्षमळ्यांत
पाठविले. [3] मग तो तिसऱ्या तासाच्या सुमारास बाहेर गेला आणि त्याने
बाजारपेठेत कित्येकांना रिकामे उभे राहिलेले पाहिले. [4] तो त्यांना
म्हणाला, तुम्हीहि द्राक्षमळ्यांत जा, जे योग्य ते मी तुम्हाला देईन; आणि
ते गेले. [5] पुनः सहाव्या व नवव्या तासाच्या सुमारास त्याने बाहेर जाऊन
तसेच केले. [6] मग अकराव्या तासाच्या सुमारास तो बाहेर गेला, तेव्हा
आणखी कित्येक उभे राहिलेले त्याला आढळले. त्यांना त्याने म्हटले,
तुम्ही सारा दिवस येथे रिकामे का उभे राहिला आहा? [7] ते त्याला
म्हणाले, आम्हास कोणी कामावर घेतले नाही म्हणून, त्याने त्यांस म्हटले,
तुम्हीहि द्राक्षमळ्यांत जा. [8] मग संध्याकाळ झाल्यावर द्राक्षमळ्याचा धनी,
आपल्या कारभाऱ्याला म्हणाला, कामकऱ्यांना बोलाव आणि शेवटल्यांपासून
आरंभ करून पहिल्यांपर्यंत त्यांना मजुरी दे. [9] तेव्हा जे अकराव्या
तासाच्या सुमारास लाविले होते ते आल्यावर त्यांना रूपया रूपया
मिळाला. [10] मग जे पहिले आले त्यांना आपल्याला अधिक मिळेल असे
वाटले, तरी त्यांनाहि रूपया रूपयाच मिळाला. [11] तो त्यांनी घेतल्यावर
घरधन्याविरूद्ध कुरकुर करीत म्हटले; [12] ह्या शेवटल्यांनी एकच तास काम
केले, आम्ही दिवसभर उन्हातान्हांत कष्ट केले आणि आम्हास व त्यांस
आपण सारखे लेखिले. [13] तेव्हा त्याने त्यांतील एकाला उत्तर दिले, गड्या,
मी तुझा अन्याय करीत नाही; तू माझ्याबरोबर रूपयाचा ठराव केला की
नाही? [14] तू आपला रूपया घेऊन चालायाला लाग; जसे तुला तसे ह्या**

**शेवटल्यालाहि द्यावे अशी माझी इच्छा आहे; [15] जे माझे आहे त्याचे मी आपल्या मर्जीप्रमाणे करावयास मुखत्यार नाही काय? अगर मी उदार आहे हे तुझ्या डोळ्यांत सलते काय? [16] ह्याप्रमाणे शेवटले ते पहिले व पहिले ते शेवटले होतील.**

रोम. 14:4

**[4] दुसऱ्याच्या चाकराला दोष लावणारा तू कोण आहेस? तो स्थिर राहिला काय किंवा त्याचे पतन झाले काय, तो त्याच्या धन्याचा प्रश्न आहे. त्याला तर स्थिर करण्यांत येईल; कारण त्याला स्थिर करण्यास त्याचा धनी समर्थ आहे.**

1 करिंथ. 4:5

**[5] ह्यास्तव त्या समयापूर्वी म्हणजे प्रभूच्या येण्यापूर्वी तुम्ही न्यायनिवाडा करूंच नका; तो अंधारांतील गुप्त गोष्टी प्रकाशांत आणील आणि अंतःकरणांतील संकल्पहि उघड करील; आणि मग प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणे देव त्याची वाहवा करील.**

## 6.6 प्रत्येकास वेगवेगळी कृपादाने लाभलेली आहेत

लक्षात ठेवा, प्रत्येकास वेगवेगळे कृपादान लाभले आहे. परमेश्वर प्रत्येकाद्वारे ज्या पद्धतीने कार्य करतो, त्याचा मान राखावा.

1 करिंथ. 12:5—7

**[5] सेवा करण्याचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी प्रभु एकच आहे, [6] आणि कार्याचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी सर्वांत सर्व कार्ये करणारा देव एकच आहे. [7] तथापि आत्म्याचे प्रगटीकरण सार्वजनिक हितासाठीं एकेकाला होते.**

अशा प्रकारच्या विविधतेमुळे तूट पडू देऊ नका.

## 6.7 लहानसहान बाबींकडे लक्ष देता कामा नये

रोम. 14:1—5

**[1] जो विश्वासाने दुर्बळ आहे त्याला जवळ करा, पण शंकाकुशंकांचा निर्णय लावण्याकरिता करू नका. [2] एखाद्याचा विश्वास असा असतो की, त्याला कसलेहि खाद्य चालते; परंतु दुर्बळ शाकभाजीच खातो. [3] जो खातो त्याने न खाणाऱ्याला तुच्छ मानू नये, आणि जो खात नाही त्याने खाणाऱ्याला दोष लावू नये; कारण देवाने त्याला जवळ केले आहे. [4]दुसऱ्याच्या चाकराला दोष लावणारा तू कोण आहेस? तो स्थिर राहिला काय किंवा त्याचे पतन झाले काय, तो त्याच्या धन्याचा प्रश्न आहे. त्याला तर स्थिर करण्यांत येईल; कारण त्याला स्थिर करण्यास त्याचा धनी समर्थ आहे. [5] कोणी माणूस एखादा दिवस दुसऱ्या दिवसापेक्षा अधिक मानितो. दुसरा कोणी सर्व दिवस सारखे मानितो. तर प्रत्येकाने आपल्या मनाची पूर्ण खातरी करून घ्यावी.**

काही गोष्टी वाद घालण्यायोग्य नसतात. अशा क्षुल्लक गोष्टींमुळे आपसात फूट पडू देता कामा नये.

## 6.8 राज्यात सहकार्याचे मोल

### 6.8.1 व्यवहारिकदृष्ट्या सहकार्य म्हणजे ऐक्य

स्तोत्र. 133:1—3

**[1] पाहा, बंधूनो, ऐक्याने एकत्र राहणे किती चांगले व मनोरम आहे! [2] ते मस्तकावर ओतलेल्या, अहरोनाच्या दाढीवर उतरलेल्या, त्याच्या वस्त्राच्या कांठापर्यंत ओघळलेल्या बहुमोल तेलासारखे आहे; 3 सीयोन डोंगरावर उतरणाऱ्या हर्मोन पर्वताच्या दहिवरासारखे ते आहे, कारण तेथे परमेश्वराने आशीर्वाद म्हणजे अनंतकालिक जीवन देण्याचे ठरविले आहे.**

ऐक्य अभिषेक व आशीर्वादाचे ठिकाण होय. सहकार्य, देवाच्या राज्यासाठी मिळूनमिसळून कार्य करणे ऐक्यात नांदण्याची व्यावहारिक पद्धत होय

### 6.8.2 सहकार्याद्वारे बल प्राप्त होते

उपदेशक 4:12

**[12] जो एकटा असतो त्याला कोणी माणूस भारी झाला तर त्याचा प्रतिकार दोघांना करिता येईल; तीनपदरी दोरी सहसा तूटत नाही.**

### 6.8.3 सहकार्याद्वारे देवाच्या राज्याची वाढ होते

जे काही सांप्रत साध्य होत आहे, त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक सहकार्याद्वारे साध्य करता येते.

## 6.9 राज्याच्या सहकार्यात अडखळण आणणाऱ्या गोष्टी

### 6.9.1 'मी व माझे' ही प्रवृत्ती

### 6.9.2 'यात माझ्यासाठी काय आहे?' ही प्रवृत्ती

### 6.9.3 तुलना व प्रतिस्पर्धा करणे

### 6.9.4 जानबुजून किंवा नकळत फूट पाडण्याचा प्रयत्न करणे

नीतिसूत्रे 6:16–19

**[16] परमेश्वर ज्यांचा द्वेष करितो अशा सहा गोष्टी आहेत, नव्हे, त्याला
अशा सात गोष्टींचा वीट आहे; [17] उन्मत्त दृष्टि, लबाड बोलणारी जिव्हा,
निर्दोष रक्त पाडणारे हात, [18] दुष्ट योजना करणारे अंतकरण, दुष्कर्म
करण्यास त्वरेने धांवणारे पाय, [19] लबाड बोलणारा खोटा साक्षी, व
भावाभावांत वैमनस्य उत्पन्न करणारा मनुष्य, ह्या त्या होत.**




# राज्याची स्थापना करणारे

# 7
# राज्याच्या सेवेसाठी पुढील पढीस तयार करणे

देवाने आम्हास स्वाभाविक तसेच आध्यात्मिक या दोन्ही क्षेत्रात उत्पन्न करण्याची पात्रता दिली आहे.

1 करिंथ. 4:14,15

**14 तुम्हाला लाजविण्यासाठी मी हे लिहीत नाही; तर माझ्या प्रिय मुलांप्रमाणे तुम्हास बोध करण्यासाठी लिहितो. 15 कारण तुम्हास ख्रिस्तामध्ये दहा हजार गुरू असले तरी पुष्कळ बाप नाहीत; मी तर तुम्हास ख्रिस्त येशूमध्‍ ये सुवार्तेच्या योगाने जन्म दिला आहे.**

पण जेव्हा आम्ही उत्पन्न करतो, तेव्हा आम्ही झेरॉक्स प्रतिलिपी तयार करीत नाही. ज्यांस आम्ही जन्मास घालतो, त्यांचे आपले व्यक्तिमत्व व ओळख असते.

जर आपण वारस तयार करणार नाही, तर सेवेतील आपले यश अपूर्ण आहे.

ज्या दिवशी आपण सुरूवात करता (कोणतीही सेवा) , त्याच दिवशी आपण आपल्या जाण्याची योजना आखावयास सुरूवात करावी.

यशया 59:21

**21 परमेश्वर म्हणतो, माझा तर त्यांच्याशी हाच करार, तुजवर असलेला माझा आत्मा, तुझ्या मुखात घातलेली माझी वचने तुझ्या संतानाचे जे संतान त्याच्या मूखांतून आतापर्यंत पुढे सर्वकाळ निघून जावयाची नाहीत, असे परमेश्वर म्हणतो.**

देवाची अशी इच्छा आहे की एका पिढीस देण्यात आलेला अभिषेक व प्रकटीकरण पुढच्या पिढीस पोहोचवावा. पुढच्या पिढीला त्यांच्या काळात जे काही करावयाचे आहे, ते करण्याचे सामर्थ्य त्यांस प्राप्त व्हावे म्हणून त्यास तो नव्या अभिषेकाची व नव्या प्रकटीकरणाची जोड देईल.

1 करिंथ. 4:17

**[17] ह्या कारणास्तव मी तीमथ्याला तुमच्याकडे पाठविले आहे; तो माझा प्रिय व प्रभूच्या ठायी विश्वास पुत्र असा आहे; मी सर्वत्र प्रत्येक मंडळीत शिकवितो त्याप्रमाणे ख्रिस्तांतील माझ्या शिक्षणपद्धतीची आठवण तो तुम्हास देईल.**

- जर वर्तमान कार्य पुढे वाढविण्यासाठी 'तीमथ्य' नसले, तर आज जो पाया घातला जाता आहे, तो अवशेष बनून राहील.
- आजचे 'तीमथ्य' उद्याचे पौल बनणार.
- आम्हास पुढच्या पिढीला तयार करावयाचे आहे, अन्यथा सांप्रत पिढी गेल्यावर हे कार्य पुढे वाढविण्यासाठी कोणीही नसेल.
- कित्येकदा मंडळीत सर्व लक्ष वर्तमान पिढी आपल्याकडे खेचून घेते व पुढच्या पिढीकडे दुर्लक्ष केले जाते.
- प्रत्येक पिढीचे हे कर्तव्य आहे की जे तिला मिळाले आहे, ते तिने पुढच्या पिढीला द्यावे.
- सांप्रत पिढीस जे मिळाले आहे, ते सर्व काही पुढच्या पिढीस मिळाले पाहिजे.

## तीमथ्यास कसे तयार करावे : 'पौल–तीमथ्याच्या' संबंधाद्वारे शिकवण

2 तीमथ्य. 1:2

**[2] देवपिता व ख्रिस्त येशू आपला प्रभु ह्यांच्यापासून कृपा, दया व शांति असो.**

## 7.1 दैवी संबंध

प्रे. कृत्ये 16:1–3

**[1] मग तो दर्बे व लूस्त्र येथे खाली आला; आणि पाहा, तेथे तीमथ्य नांवाचा कोणीएक शिष्य होता; तो विश्वास ठेवणाऱ्या कोणाएका यहूदी स्त्रीचा मुलगा होता; पण त्याचा बाप हेल्लेणी होता.[2] त्याला लुस्त्रांतले व इकुन्यांतले बंधु नांवाजीत होते. [3] त्याने आपणांबरोबर यावे अशी पौलाची इच्छा होती; तेव्हा त्या ठिकाणी जे यहूदी होते त्यांच्याखातर त्याने त्याला घेऊन त्याची सुंता केली; कारण त्याचा बाप हेल्लेणी आहे हे सर्वांना ठाऊक होते.**

देव आपल्या जीवनात जे 'दैवी संबंध' जोडणार आहे, त्यांच्या बाबतीत संवेदनशील राहावे. देव आपल्या जीवनात 'तीमथ्यास' पाठवू शकतो अथवा आपणास इतरांच्या जीवनात 'पौल' म्हणून पाठवू शकतो.

अशा गोष्टींनी सुरूवात करा ज्याद्वारे आपल्या तीमथ्याच्या भविष्यास मदत मिळेल. आपल्या तीमथ्यास आपल्यासोबत ठेवा, त्याला आपल्यासोबत काम करू द्या.

तीमथ्याला पौलासोबत त्याच्या सेवेत सोबत प्रवास करण्याची विशेष संधी मिळाली होती.

प्रे. कृत्ये 17:14–15

**[14] त्यावरून बंधुजनांनी पौलाला समुद्राकडे जाण्यास लागलेच पाठविले; आणि सीला व तीमथ्य हे तेथेच राहिले. [15] तेव्हा पौलाला पोहंचविणाऱ्यांनी त्याला अथेनैपर्यंत नेले, आणि सीला व तीमथ्य ह्यांनी आपणांकडे होईल तितके लवकर यावे अशी त्याची आज्ञा घेऊन ते निघाले.**

प्रे. कृत्ये 18:5

**[5] सीला व तीमथ्य हे मासेदोनियाहून आले तेव्हा, येशू हाच ख्रिस्त आहे, अशी यहूद्यांना साक्ष देऊन वचन सांगण्यांत पौल गढून गेला होता.**

प्रे. कृत्ये 20:1—4

**[1] नंतर गलबला निवाल्यावर पौलाने शिष्यांना बोलावून त्यांस बोध केला,
व त्यांचा निरोप घेऊन तो मासेदोनियास जाण्यास निघाला. [2] त्या
प्रांतांतून जातांना तेथल्या लोकांना पुष्कळ बोध करून तो हेल्लास
प्रांतांत गेला. [3] तेथे तीन महिने राहिल्यावर तो सूरिया देशांत तारवांतून
जाणार होता, पण यहूदी लोकांनी त्याच्याविरूद्ध कट केला, तेव्हा त्याने
मासेदोनियांतून परत जाण्याचा बेत केला. [4] पुर्राचा मुलगा, सोपत्र
बिरूयाकर, थेस्सलनीकाकरांतले अरिस्तार्ख व सकूंद, गायस दर्बेकर,
तीमथ्य आणि आशिया प्रांतांतील तुखिक व त्रफिम हे त्याच्याबरोबर
अशियापर्यंत गेले.**

फिलिप्पै. 2:22

**[22] पण त्याचे शील तुम्हाला माहीत आहे की, जसा मुलगा बापाची सेवा करितो तशी त्याने सुवार्तेसाठी माझ्याबरोबर सेवा केली आहे.**

2 तीमथ्य. 2:2

**[2] ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांसमक्ष माझ्यापासून ऐकल्या, त्या इतरांना शिकविण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून दे.**

- आपल्या ‘तीमथ्याची’ निवड मोठ्या सावधपणे करा.
- विश्वासूपणा पात्रतेपेक्षा अधिक महत्वाचा आहे.
- अंतःकरणाची दशा कृपादानांपेक्षा जास्त महत्वाची आहे.

## 7.2 विशेष नाते

1 तीमथ्य. 1:2

**[2] देवपिता व ख्रिस्त येशू आपला प्रभु ह्यांच्यापासून कृपा दया व शांति असो.**

2 तीमथ्य. 1:2

**² देवपिता व ख्रिस्त येशू आपला प्रभु ह्यांच्यापासून कृपा, दया व शांति असो.**

1 करिंथ. 4:7

**⁷ तुला निराळेपण कोणी दिले? आणि जे तुला दिलेले नाही असे तुझ्याजवळ काय आहे? तुला दिलेले असता, दिलेले नाही असा अभिमान तू का बाळगितोस?**

पौल व तीमथ्य यांच्यात एक विशेष संबंध होता – त्यांच्यात एक विशिष्ट नाते होते. पौलाने तीमथ्याला आपला आध्यात्मिक पुत्र मानले होते व तीमथ्य पौलाकडे पिता म्हणून पाहत असे.

## 7.3 विशेष समीपता व पारदर्शित्व

2 तीमथ्य. 3:10,11

**[10] तू माझे शिक्षण, आचार, संकल्प, विश्वास, सहनशीलता, प्रीति, धीर माझा झालेला छळ, माझ्यावर आलेली संकटे ही ओळखून आहेस; [11] मला अंत्युखियांत, इकुन्यांत व लुस्त्रांत जे काही झाले ते व मी जो छळ सहन केला तो तू ओळखून आहेस; त्या सर्वांतून प्रभूने मला सोडविले.ो निकटता और पारदर्शिता थी, उसके द्वारा तीमुथियुस पौलुस वास्तव में कौन है, यह देख सका और जान सका। जो कुछ तीमुथियुस ने पौलुस में देखा, उसका उसने अनुसरण किया या खुद को उसके अनुसार ढाला।**

पौलाच्या स्वभावात जी जवळीक व पारदर्शित्व होते, त्याद्वारे पौल खरोखर कोण आहे हे तीमथ्य पाहू व समजू शकला. तीमथ्याने जे काही पौलामध्ये पाहिले, त्याचे त्याने अनुसरण केले व स्वतःस त्यानुरूप घडविले.

## 7.4 विशिष्ट आज्ञांची देवाणघेवाण

1 तीमथ्य. 1:18

**[18] माझ्या मुला तीमथ्या, तुझ्याविषयी पूर्वीच झालेल्या संदेशांनुसार ही आज्ञा मी तुला सांगून ठेवितो, तू त्याच्या द्वारेच सुयुद्ध कर.**

1 तीमथ्य. 6:20

**[20] हे तीमथ्या, तुझ्या स्वाधीन केलेली ठेव संभाळ; अधर्माच्या रिकाम्या वटवटींपांसून आणि जिला विद्या हे नांव चुकीने दिले गेले आहे तिच्या विरोधी मतांपासून दूर राहा.**

पौलाने तीमथ्यास शिकविले, काय करावे व काय करू नये, कोणत्या चुका टाळाव्या इत्यादी गोष्टी त्याने त्याला शिकविल्या (1 आणि 2 तीमथ्य.).

## 7.5 प्रोत्साहन, उपदेश व सुधारणा यांची देवाणघेवाण

पौलाने तीमथ्यास सकारात्मक प्रोत्साहन दिले.

1 तीमथ्य. 6:12

**[12] विश्वासासंबंधींचे जे सुयुद्ध ते कर, युगानुयुगाच्या जीवनाला बळकट धर; त्यासाठीच तुला पाचारण झाले आहे, आणि तू पुष्कळ साक्षीदारांदेखत तो चांगला पत्कर केला.**

सेवेत सर्वात कठीण काम म्हणजे सुधारणा घडवून आणणे. पण हे काम आपण मोठ्या प्रेमाने, सकारात्मक पद्धतीने व प्रोत्साहन देऊन करावयास शिकले पाहिजे. जर आपण आपल्या ‘तीमथ्यास’ सुधरविणार नाही, तर ज्या गोष्टीची आपण त्याला मोकळीक द्याल, ती गोष्ट कर्करोग बनून त्याचे जीवन नष्ट करील. सुधारणा म्हणजे आध्यात्मिक शल्यचिकित्सा होय – दुःख तर होणारच, परंतु त्याचे सकारात्मक परिणाम आहेत.

## 7.6 खऱ्या किंमतीची देवाणघेवाण

येथे खऱ्या किंमतीची देवाणघेवाण होती, देवाच्या सेवेसाठी एक किंमत चुकवावयाची होती. पौलाने तीमथ्याशी सौम्यतेचे बोलणे केले नाही. त्याने सर्व काही स्पष्ट शब्दांत त्याच्यापुढे मांडले. त्याने तीमथ्यास त्याच्या दुःखात सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले.

2 तीमथ्य. 1:8

**8 म्हणून आपल्या प्रभूविषयींच्या साक्षीची आणि मी जो त्याचा बंदिवान् त्या माझी तू लाज धरू नये; तर देवाच्या सामर्थ्याच्या परिमाणाने सुवार्तेसाठी माझ्याबरोबर दुःख सोसावे.**

2 तीमथ्य. 2:3–5

**3 ख्रिस्त येशूचा चांगला शिपाई ह्या नात्याने माझ्याबरोबर दुःख सोस.**
**4शिपाईगिरी करणारा माणूस संसाराच्या कार्यांत गुंतत नाही; ह्यासाठी की, ज्याने त्याला सैन्यांत दाखल करून घेतले त्याला त्याने संतुष्ट करावे.**
**5 जर कोणी मल्लयुद्ध करितो, तर ते नियमाप्रमाणे केल्यावांचून त्याला मुकुट घालीत नाहीत.**

## 7.7 आदरयुक्त संभाषण

1 तीमथ्य. 6:11

**11 हे देवभक्ता, तू ह्यांपासून पळ, आणि नीतिमत्त्व, सुभक्ति, विश्वास, प्रीति, धीर व सौम्यता ह्यांच्या पाठीस लाग.**

2 करिंथ. 1:1

**1 करिंथ येथील देवाच्या मंडळीस व तिच्यासुद्धा संपूर्ण अखयांतील सर्व पवित्र जनांस देवाच्या इच्छेने ख्रिस्त येशूचा प्रेषित झालेला पौल व आपला बंधु तीमथ्य ह्यांच्याकडून.**

फिलेमोन 1:1

**[1] देव प्राचीन काळी अंशाअंशानी व प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांच्या द्वारे पूर्वजांशी बोलला.**

रोम. 16:21

**[21] माझा सहकारी तीमथ्य व माझे नातेवाईक लूक्य, यासोन व सोसिपतेर हे तुम्हाला सलाम सांगतात.**

पौल मोठ्या आदराने तीमथ्यास सम्बोधित करीत असे. तो तीमथ्यास 'देवभक्त' म्हणतो. त्याने तीमथ्याचे खरे मोल, त्याचे पाचारण, त्याची कृपादाने व त्याचा अभिषेक ओळखला.

## 7.8 प्रतिनिधित्व

पौलाने तीमथ्यास एका विशिष्ट कामासाठी पाठविले होते. पौलाने मोठ्या विश्वासाने तीमथ्याला ही जबाबदारी सोपविली होती.

1 करिंथ. 4:17

**[17] ह्या कारणास्तव मी तीमथ्याला तुमच्याकडे पाठविले आहे; तो माझा प्रिय व प्रभूच्या ठायी विश्वास पुत्र असा आहे; मी सर्वत्र प्रत्येक मंडळीत शिकवितो त्याप्रमाणे ख्रिस्तांतील माझ्या शिक्षणपद्धतीची आठवण तो तुम्हास देईल.**

फिलिप्पै. 2:19

**[19] तुमच्यासंबंधींच्या गोष्टी ऐकून मलाहि धीर यावा म्हणून तीमथ्याला मी तुम्हाकडे लवकर पाठवीन अशी मला प्रभु येशूमध्ये आशा आहे.**

1 थेस्सल. 3:1,2

**[1] आमच्याने आणखी दम धरवेना, तेव्हा आम्ही अथेनैतच एकटे मागे**
**राहावे, हे आम्हास बरे वाटले; [2] आणि आम्ही आपला बंधु तीमथ्य,**

**ख्रिस्ताच्या सुवार्तेत देवाचा सेवक, ह्याला ह्यासाठी पाठविले की, त्याने तुम्हाला स्थिर करावे, आणि तुमच्या विश्वासाच्या वृद्धीसाठी बोध करावा.**

## 7.9 सकारात्मक अनुमोदन

1 करिंथ. 16:10

**[10] तीमथ्य आल्यास त्याने तुमच्याजवळ निर्भयपणाने राहावे म्हणून खबरदारी घ्या; कारण माझ्याप्रमाणे तोहि प्रभूचे कार्य करीत आहे.**

फिलिप्पै. 2:19—23

**[19] तुमच्यासंबंधींच्या गोष्टी ऐकून मलाहि धीर यावा म्हणून तीमथ्याला मी**
**तुम्हाकडे लवकर पाठवीन अशी मला प्रभु येशूमध्ये आशा आहे. [20] तुमच्या**
**बाबींसंबंधी खरी काळजी करील असा दुसरा कोणी समान वृत्तीचा**
**माझ्याजवळ नाही; [21] कारण सर्वजण स्वतःच्याच गोष्टी पाहत असतात;**
**ख्रिस्त येशूच्या पाहत नसतात; [22] पण त्याचे शील तुम्हाला माहीत आहे**
**की, जसा मुलगा बापाची सेवा करितो तशी त्याने सुवार्तेसाठी माझ्याबरोबर**
**सेवा केली आहे. [23] ह्यास्तव माझे काय होणार आहे हे समजताच त्याला**
**रवाना करिता येईल अशी मला आशा आहे.**

पौलाने जेव्हा त्याला पाठविले, तेव्हा मोठ्या उत्साहाने व सकारात्मक भावनेने त्याची सिफारीश केली. तीमथ्य हा आपला सहकर्मी व सेवेत बरोबरीचा सोबती आहे असे पौलाने सांगितले.

## 7.10 त्याच्या पाचारणात मोकळे केलेले

शेवटी पौलाने तीमथ्याला इफिस मंडळीच्या देखरेखीसाठी पाठविले.

1 तीमथ्य. 1:3

**[3] मी मासेदोनियास जातांना तुला इफिसात राहावयाची विनंती केली, ह्यासाठी की, तू कित्येक लोकांना ताकीद द्यावी की, अन्य शिक्षण देऊ नका.**

व्यावहारिक प्रशिक्षणाद्वारे, तीमथ्य देवाचा सेवक म्हणून तयार झाला.

जेव्हा मुलगा मोठा होत नाही अथवा जेव्हा पित्यास वाटते की मुलाने 'सोबतीचे वारीस' होण्याऐवजी 'मूल' बनून राहावे, तेव्हा समस्या उत्पन्न होतात.

जेव्हा आपण वयोवृद्ध व्हाल व आपले केस पिकतील

स्तोत्र. 71:17,18

**[17] हे देवा, माझ्या तरुणपणापासून तू मला शिकवीत आला आहेस; आणि मी आजपर्यंत तुझी अद्‌भुत कृत्ये वर्णिली आहेत, [18] मी भावी पिढीला तुझे बाहुबल विदित करीपर्यंत पुढच्या पिढीतील सर्वांस तुझ्या पराक्रमाचे वर्णन करीपर्यंत, मी वयोवृद्ध होऊन माझे केस पिकले तरी, हे देवा, मला सोडू नको.**

देवाचे शक्तीसामर्थ्य प्रगट करीत राहा. देवाचा अभिषेक वयाने कमी होत नाही.

यशया 46:4

**[4] तुमच्या वृद्धापकाळापर्यंतही मीच तो आहे; तुमचे केस पिकत तोपर्यंत मी तुम्हास वागवीन, निर्माणकर्ता मीच आहे, वागविणारा मीच आहे, मी खांद्यावर वागवून तुमचा बचाव करीन.**

*(अ) देवाचे ज्ञान इतरांस द्या.*

*(ब) आपला अभिषेक ताजा राखून ठेवा. पुन्हा प्रज्वलित व्हा! विझू नका!*

स्तोत्र. 92:10

**[10] पण माझे शिंग तू रानबैलाच्या शिंगाप्रमाणे उन्नत केले आहे, मला ताज्या तेलाचा अभ्यंग झाला आहे.**

*(क) फळ देत राहा.*

स्तोत्र. 92:14

**14 वृद्धपणाती ते फळ देत राहतील, ते रसभरित व टवटवीत असतील.**

*(ड) कृपेने जा.*

1 इतिहास 29:28

**28 आयुष्य, धन व मान यांनी संपन्न होऊन आणि चांगला वृद्ध होऊन तो मृत्यू पावला, त्याचा पुत्र शलमोन त्याच्या जागी राजा झाला.**

## किंगडम बिल्डर्स महासभाचे आयोजक बना

प्रिय पाळक/सहसेवक :

आमची अंत'करणापासून ही इच्छा आहे की ह्या पुस्तकात मांडण्यात आलेल्या सत्य गोष्टी आम्हास परमेश्वराच्या जितक्या सेवकांस सांगता येतील तितक्या सेवकांस सांगाव्या. या पुस्तकाद्वारे आपण ज्या गोष्टी शिकला आहात, त्यांचा प्रचार करा व त्या शिकवा.

आम्हास विश्वास आहे की किंगडम बिल्डर्स महासभेत वैय्यक्तिकरित्या सहभागी होण्याद्वारे आपल्यात मोठा बदल घडून येऊ शकतो. आम्ही आपणास उत्तेजन देऊ इच्छितो की आपण या सभांत भाग घ्यावा.

आम्ही आपणास प्रोत्साहन देऊ इच्छितो की आपण आपल्या क्षेत्रातील पाळकांसोबत किंगडम बिल्डर्स महासभेचे आयोजन करावे. जास्तीत जास्त पाळकांस या सभेसाठी आमंत्रित करावे, यासाठी की त्यांच्या अंतःकरणात व मनात परिवर्तन घडून यावे. आम्ही मोठ्या आनंदाने ह्या सभेत सेवा करण्यासाठी आपली टीम घेऊन येऊ.

जर आपण किंगडम बिल्डर्स महासभेचे आयोजन करू इच्छित असाल, तर ह्या पुस्तकाच्या पुढील पानावर देण्यात आलेल्या माहितीचा उपयोग करून आमच्याशी संपर्क साधावा. बहुतेकदा आमचे आयोजक पाळक/सेवक किंगडम बिल्डर्स महासभेच्या आयोजनाचा सर्व खर्चभार स्वतः उचलतात. आम्ही आपला प्रवासखर्च व राहण्याचा खर्च स्वतः देऊ.

आपल्या पत्राची वाट पाहत,

**आशीष रायचूर**

# बाइबल कॉलेज

ऑल पीपल्स चर्च ॲण्ड वर्ल्ड आऊटरीच, बँगलोर, भारताने आपल्या सेवकार्याचा विस्तार केला आहे. ऑगस्ट 2005 मध्ये या सेवासंस्थेद्वारे बाइबल कॉलेज व मिनिस्ट्री ट्रेनिंग सेन्टर (APC - BC& MTC) ची स्थापना करण्यात आली.

PC - BC& MTC भारतद्वारे तसेच इतर राष्ट्रांतील गावांस, नगरांस व शहरांस येशू ख्रिस्तासाठी प्रभावित करण्यासाठी विश्वासू स्त्री व पुरुषांस तयार व प्रशिक्षित करण्यात येते व सेवेसाठी पाठविण्यात येते.

APC - BC& MTC यात तीन कार्यक्रम योजण्यात आले आहेत :

- दोन आणि तीन वर्षांचा बाइबल कॉलेज अभ्यासक्रम पूर्णकालीन विद्यार्थ्यासाठी आहे आणि उत्तम शिकवणीसोबतच आध्यात्मिक व व्यावहारिक सेवा प्रशिक्षण देण्यात येते. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांस परमेश्वराचे पाचारण यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी तयार करण्याच्या निमित्ताने व त्यांस समर्थ बनविण्याच्या हेतूने करण्यात आला आहे. दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांस **डिप्लोमा इन थियॉलॉजी ॲण्ड क्रिश्चियन मिनिस्ट्री** (Dip. Th.& CM) देण्यात येईल. तीन वर्षीय अभ्यासक्रमाद्वारे त्यांस बॅचलर्स डिग्री इन थियोलॉजी ॲण्ड क्रिश्चियन मिनिस्ट्री (B.Th.& CM) ही पदवी देण्यात येईल.

- **स्कूल ऑफ मिनिस्ट्री** कार्यक्रम नोकरी करणाऱ्यांसाठी आहे. हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांस **डिप्लोमा इन क्रिश्चियन मिनिस्ट्री** (Dip. Th.& CM) दिला जाईल.

- प्रॅक्टिकल मिनिस्ट्री ट्रेनिंग बायबल कॉलेज अशा पदवीधरांसाठी आहे जे व्यवहारिक प्रशिक्षण प्राप्त करू इच्छितात. एक किंवा दोन वर्षे पूर्ण करणाऱ्यांस सर्टिफिकेट इन प्रॅक्टिकल मिनिस्ट्री दिले जाईल ज्यात त्यांच्या प्रशिक्षणकाळाचा उल्लेख असेल.

वर्ग इंग्रजी भाषेत असतील. आमच्याजवळ प्रशिक्षित व अभिषक्त शिक्षक आहेत. सर्व शिक्षक व विद्यार्थी ए.पी.सी. शिक्षण केन्द्र व वाचनालय ै(ब्—स्) यांचा लाभ घेऊ शकतात. यांत पुस्तके, टीचिंग टेप्स, विडियो, विसीडी / डिवीडी आणि गीतगायन सीडी यांचा संग्रह आहे.

## ऑल पीपल्स चर्च द्वारा प्रकाशित पुस्तके

राज्याची स्थापना करणारे

आपल्या जीवनासाठी परमेष्वराच्या हेतू पूर्ण करणे

# ऑल पीपल्स चर्चविषयी

**ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत बँगलोर शहरात मीठ व प्रकाश बनणे, व भारत देशात व जगातील देशासाठी एक आवाज बनणे आहे.**

आमच्याकडून हे तुम्हासाठी एक बक्षिस आहे! हे बक्षिस विनामूल्य आहे!

आमचा असा विश्वास आहे की हे पुस्तक वाचण्याद्वारे आपणास आशीर्वाद लाभेल.

आपल्या अनेकांस या पुस्तकाच्या हजारो प्रती विनामूल्य देण्यात येतात. आमची अशी इच्छा आहे की आपण आर्थिकरित्या आमचे भागीदार बनावे जेणेकरून अनेकांस देवाचे वचन देण्यास आम्हास सहकार्य प्राप्त व्हावे. जसे परमेश्वर आपले मार्गदर्शन करतो, त्याप्रमाणे ऑल पीपल्स चर्चचे भागीदार बना. आपण आपली दाने चेक/डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डरद्वारे "ऑल पीपल्स चर्च, बँगलोर," च्या नावाने पाठवू शकता.

पत्र लिहितांना कृपा करून यादीत दिलेली इतर पुस्तके मागवावी. या पुस्तकाद्वारे आपणास कशी मदत लाभली हे कृपया आम्हास कळवावे, तसेच आपल्या प्रार्थना विनंत्या व आपले विचार आम्हास लिहून कळवा.

कृपया खालील पत्त्यावर आमच्याशी संपर्क करावा :


**All Peoples Church & World Outreach**
2nd Floor, No. 7M, 2nd Block,
HRBR Layout, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-65970617
Email: contact@apcwo.org
Website: www.apcwo.org

# भारत में ऑल पीपुल्स चर्च की शाखाऐं

वर्तमान में ऑल पीपुल्स चर्च नीचे दिये पतों पर स्थित हैं।

ऑल पीपुल्स चर्च –बंगलौर (कर्नाटक)

ऑल पीपुल्स चर्च –थोक्कोट्टु, मंगलौर (कर्नाटक)

ऑल पीपुल्स चर्च –कल्याण, मुम्बई (महाराष्ट्र)

ऑल पीपुल्स चर्च –विशाखापट्नम (आन्ध्र प्रदेश)

ऑल पीपुल्स चर्च –ब्रम्हपुर (उड़ीसा)

ऑल पीपुल्स चर्च –नागपुर (महाराष्ट्र)

ऑल पीपुल्स चर्च –रायचूर (कर्नाटक)

समय–समय पर नयी कलीसियाओं की स्थापना हो रही है। वर्तमान सूची ऑल पीपुल्स चर्च के साथ सम्पर्क करने या अधिक जानकारी के लिए कृपया आप हमारी वेबसाइट www.apcwo.org में जायें, अथवा contact@apco.org पर ई–मेल भेजें।

# काय आपण त्या परमेश्वरास जाणता जो आपणावर प्रीती करतो?

सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी, परमेश्वर ह्या जगात मानव म्हणून आला. त्याचे नाव येशू आहे. त्याने पूर्णतया पापरहित जीवन घालविले. येशू देहधारी देव होता, जे काही त्याने म्हटले व केले त्याद्वारे देव आम्हावर प्रगट झाला. जे शब्द तो बोलला, ते देवाचे शब्द होते. जी कार्ये त्याने केली, ती देवाची कार्ये होती. या पृथ्वीतलावर असतांना येशूने अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यास व दुखितांस बरे केले. त्याने अंधांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि सर्व प्रकारच्या रोग्यांस व आजाऱ्यांस बरे केले. त्याने चमत्कारिकत्यिा भारी व दोन मासे बहुगुणित करून भुकेल्यांस अन्न चारले, त्याने वादळ शांत केले व इतर अनेक अद्‌भुत कृत्ये केली.

**ही सर्व कामे हे सिद्ध करतात की परमेश्वर चांगला आहे, ज्याची इच्छा आहे की लोकांनी आरोग्यवान, सुदृढ व आनंदी असावे. परमेश्वर आपल्या लोकांच्या गरजा पुरवू इच्छितो.**

म्हणून, परमेश्वराने मनुष्य बनून आमच्या जगात पाऊल टाकण्याचा निध ार का केला? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे व आम्हास उत्पन्न करणाऱ्या परमेश्वरासमोर अस्वीकारणीय अशी कृत्ये केली. पापाचे परिणाम आहेत. पाप हे एका परमेश्वर व मनुष्यामधील एका भिंतीप्रमाणे आहे जिस ओलांडता येत नाही पाप आम्हास परमेश्वरापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले त्यास जाणून घेण्यापासून व त्याच्याबरोबर अर्थपूर्ण नाते ठेवण्यापासून ते आम्हास रोखते. म्हणूनच, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींद्वारे ही पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापाचा दूसरा परिणाम म्हणजे परमेश्वरापासून सदाकाळसाठी दूर केले जाणे. देवाच्या न्यायालयात पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू म्हणजे नरकात परमेश्वरापासून सर्वकाळसाठी वेगळे होणे.

**परंतु सुवार्ता ही आहे की आपण पापापासून मुक्ती प्राप्त करून परमेश्वरासोबत समेट करू शकतो. पवित्र शास्त्र म्हणते, (रोम. 6:23). जेव्हा येश वधस्तंभावर मरण पावला तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापाचे मोल दिले. त्यानंतर तीन दिवसांनी तो मरणांतून उठला आणि त्याने अनेकांस दर्शन देऊन आपण जीवंत असल्याचे दाखवून दिले आणि त्यानंतर तो स्वर्गास निघून गेला.**

परमेश्वर प्रेम व दया यांनी युक्त असा परमेश्वर आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही नरकात जावे. आणि म्हणूनच पापांपासून व त्याच्या स्थायी परिणामांपासून मानवजातीस सुटका प्राप्त व्हावी म्हणून मार्ग दाखविण्यासाठी तो आला. तो पाप्यांस वाचविण्यासाठी आला, तुमच्या व माझ्यासारख्या लोकांस पाप व सार्वकालिक मृत्यूपासून मुक्त करण्यासाठी तो आला.

पापांपासून विनामूल्य क्षमा मिळविण्यासाठी पवित्र शास्त्र आम्हास केवळ एकच कार्य करावयास सांगते – जे काही येशूने वधस्तंभावर केले आहे त्याचा स्वीकार करणे व संपूर्ण अंतःकरणाने त्याचा स्वीकार करणे.

**" त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नांवानें पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयीं देतात."** (प्रेषितांची कृत्ये 10:43).

**"येशू प्रभु आहे असें जर 'तूं आपल्या मुखानें' कबूल करिशील आणि देवानें त्याला मेलेल्यातूंन उठविलें असा 'आपल्या अंतःकरणांत' विश्वास ठेवशील तर तुझें तारण होईल"** (रोम. 10:9).

जर आपण प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवाल, तर आपणही आपल्या पापांची क्षमा व पापांपासून शुद्धता प्राप्त करू शकता.

खाली आपणासाठी एक सोपी प्रार्थना दिलेली आहे जी आपणास प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास व जे काही त्याने आपणासाठी केले त्यावर विश्वास ठेवण्यासाठी निर्णय घेण्यात मदत करील. जे काही येशू ख्रिस्ताने केले

आहे त्याचा स्वीकार करून आपल्या पापांपासून क्षमा व शुद्धता मिळविण्यास ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शिका आहे. आपण आपल्या शब्दांतसुद्धा प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभू येशू, जे काही तू वधस्तंभावर कले ते मला आज समजले आहे. तू माझ्यासाठी मेलास, आपले अनमोल रक्त तो माझ्यासाठी वाहिलेस आणि माझ्या पापांची शिक्षा तू सहन केलीस, यासाइी की मला क्षमा प्राप्त व्हावी. पवित्र शास्त्र म्हणते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्यास त्याच्या पापांची क्षमा मिळेल.*

*आज, मी तुजवर विश्वास करण्याचा व वधस्तंभावर मरण्याद्वारे च मेलेल्यांतून जीवंत होण्याद्वारे तू जे काही माझ्यासाठी केले आहेस त्याचा स्वीकार करण्याचा मी निर्णय घेतो. मला हे काहीत आहे की मी उत्तम कृत्त्यांद्वारे स्वतः वाचवू शकत नाही. कोणी मनुष्यही मला वाचवू शकत नाही. मी आपल्या पापांची क्षमा विकत घेऊ शकत नाही.*

*आज, मी अंतःकरणापासून विश्वास धरतो व आपल्या मुखाने हे कबूल करतो की तू साझ्यासाठी आपला प्राण दिलास, माझ्सया पापांची किंमत चुकविलीस. तू माझ्यासाठी पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुजवर विश्वास करण्याद्वारे मला पापांची क्षमा व शुद्धता मिळू शकली.*

*धन्यवाद येशू. तुजवर प्रीती करण्यास व तुला अधिक जाणून घेण्यास व तुजविषयी विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.*

नोट्स